




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार २५ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







दिल्लीच्या राजकारणात मोठा भूकंप

# ‘आप’च्या दोन-तृतीयांश खासदारांसह भाजपमध्ये प्रवेशाची घोषणा



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीच्या आणि राष्ट्रीय राजकारणात आज एक अत्यंत मोठी घडामोडी घडली आहे. आम आदमी पक्षाचे संस्थापक सदस्य आणि आक्रमक राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी शुक्रवारी पक्षाचा राजीनामा देउन भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याची घोषणा केली. विशेष म्हणजे, त्यांनी एकट्यानेच नव्हे, तर राज्यसभेतील आपच्या दोन-तृतीयांश खासदारांसह भाजपमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला मोठा धक्का बसला आहे.

राघव चड्ढा यांनी एका पत्रकार परिषदेत आपल्या पदाचा आणि पक्षाचा राजीनामा दिला. त्यांच्यासोबत संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांसारख्या ज्येष्ठ खासदारांनीही भाजपची वाट धरली आहे. चड्ढा यांनी दावा केला आहे की, त्यांच्याकडे राज्यसभेतील आपच्या खासदारांचे आवश्यक बहुमत (दोन-तृतीयांश) आहे, ज्यामुळे पक्षांतरबंदी कायद्याची अडचण न येता ते भाजपमध्ये विलीन होउ शकतील. यात हरभजन सिंह आणि स्वाती मालीवाल यांसारख्या नेत्यांचाही समावेश असल्याचे समजते. राजीनामा देताना राघव चड्ढा म्हणाले की, ज्या पक्षाला मी रक्ताचे पाणी करून १५ वर्षे दिली, तो आता आपल्या मूळ विचारांपासून आणि मूल्यांपासून पूर्णपणे भरकटला आहे. पक्षात आता फक्त गुदमरल्यासारखे वाटत होते. राघव चड्ढा आणि पक्षातील नेतृत्व यांच्यात गेल्या काही काळापासून मतभेद सुरू होते. २ एप्रिल रोजी पक्षाने त्यांना राज्यसभेतील उपनेतेपदावरून हटवले होते, तेव्हापासूनच ते नाराज असल्याची चर्चा होती. पत्रकार परिषदेत ते म्हणाले अनेकांना वाटत होते की मी चुकीच्या पक्षात असलेला योग्य माणूस आहे. मी माझ्या देशाच्या हितासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय घेतला आहे.या निर्णयामुळे राज्यसभेत आम आदमी पक्षाचे संख्याबळ आता नगण्य होणार असून, भाजपची ताकद वाढणार आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही घटना आपसाठी अस्तित्वाचे संकट निर्माण करणारी ठरू शकते.

**या सात जणांचा समावेश**

१. राघव चड्ढा
२. स्वाती मालीवाल
३. हरभजन सिंह
४. संदीप पाठक
५. अशोक मित्तल
६. राजिंदर गुप्ता
७. विक्रम साहनी

## सत्ता आणि पैशाच्या लालसेपोटी नेते पक्ष बदलत आहेत, जे चुकीचे आहे -अण्णा हजारे



**राळेगणसिध्दी/प्रतिनिधी :** सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी राजकीय नेत्यांवर तीव्र शब्दांत टीका केली असून, नेते आता समाज आणि देशाचा विचार सोडून केवळ सत्ता आणि पैशाच्या मागे धावत असल्याचे म्हटले आहे. आंदोलनातून उभा राहिलेला 'आम आदमी पक्ष' आता फुटत असून, स्वार्थामुळे नेते पक्ष सोडून जात आहेत, अशी खंत त्यांनी व्यक्तकेली. पक्ष बदलण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी संसदेत कडक कायदा होणे गरजेचे आहे, असे अण्णा हजारेंनी प्रतिपादन केले. लोकांनी निवडून देताना चारित्र्यशील उमेदवाराला मतदान करावे, जेणेकरून देशहिताचे काम होईल. अण्णा हजारे यांनी समाज आणि देश डोळ्यासमोर ठेवून काम करण्यावर भर दिला आहे. राळेगणसिद्धी येथे त्यांनी हे मत व्यक्तकेले. आम आदमी पक्षा'चे खासदार राघव चढ्ढा यांनी इतर ७ खासदारांसह अनपेक्षितपणे भाजपमध्ये प्रवेश केला आहे. या प्रवेशापूर्वी राघव चढ्ढा यांनी पत्रकार परिषद घेउन राज्यसभेतील 'आप'च्या गटाचे भाजपमध्ये ,सामील झाले आहे.

# विधानपरिषद निवडणूक; हालचालींना वेग

### भाजपने नावे पाठवली; मविआतर्फे उद्धव ठाकरे?

**मुंबई/प्रतिनिधी :** बारामती, राहुरी पोटनिवडणुकीचे मतदान आटोपले असताना आता विधान परिषदेच्या १० जागांसाठीच्या निवडणूक हालचालींना वेग आला आहे. भाजपच्या कोअर कमिटीने एकास पाच फॉर्म्युल्याने केंद्रीय भाजपकडे नावे पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारीला काँग्रेसने आधीच समर्थन दिलेले असताना खा. सुप्रिया सुळे यांनीही ठाकरे यांना गळ घातली आहे. आमदारकीसाठी एक नाव ठरविताना राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाची मोठीच कसरत होणार आहे.

केंद्रीय भाजपशी चर्चा करून नावे अंतिम करण्याचा अधिकार वर्षावरील बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांना देण्यात आला. डॉ. राजीव पोतदार, संजय केणेकर, सुनील कर्जतकर, माजी आमदार प्रज्ञा सातव, राजा राउत, प्रशांत परिचारक, राम सातपुते, सुरेश हळवणकर, निलय नाईक, प्रकाश पाटील देवसरकर तसेच माजी मंत्री अनंतराव देशमुख. याशिवाय गणेश हाके, नीता केळकर, राजेश पांडे, डॉ. आरती फुसाटे, अतुल काळसेकर, माधव भंडारी, माधवी नाईक, विजय चौधरी, लक्ष्मण सावजी, सुरेश बनकर, अर्चना पाटील चाकूरकर आणि दयाशंकर तिवारी.



उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर निवडून जाण्याची शक्यता वाढली आहे. काँग्रेसने आधीच त्यांना पाठिंबा दिलेला होता. राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) नेत्या खा. सुप्रिया सुळे यांनी, ठाकरे यांनीच विधान परिषद लढावी, ही आमच्या पक्षाची आग्रहाची विनंती आहे. ते राज्यातील अनुभवी आणि ज्येष्ठ नेते आहेत. त्याचा फायदा राज्याला आणि सभागृहाला नेहमीच होत राहील, असा आमचा विश्वास आहे. मविआने त्यांच्या नावाचा सकारात्मक विचार करावा, असे एक्स पोस्टवर म्हटले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मातोश्रीवर जावून उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केली.

**पवार गटाकडे जागा एक, इच्छुक अनेक**-आमदारकीचा एक उमेदवार ठरविताना इच्छुकांच्या गर्दीमुळे अजित पवार गटाच्या अध्यक्ष व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व पक्षातील प्रमुख नेत्यांची डोकेदुखी वाढणार आहे. दादानिष्ठ उमेदवारच द्यावा, असा पक्षात सूर आहे. या एका जागेसाठी प्रयत्न करत असलेल्यांमध्ये राजेंद्र जैन, अनिकेत तटकरे, आनंद परांजपे, सुनील टिंगरे, उमेश पाटील, विक्रम संजय काकडे यांचा समावेश आहे.

**टिंगरेही मैदानात**-माजी आमदार राजेंद्र जैन हे प्रफुल पटेल यांचे कट्टर समर्थक आहेत. तर अनिकेत तटकरे हे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे चिरंजीव आधीही विधान परिषदेवर होते. पुण्यातील पोर्शे कार अपघातप्रकरणी वादग्रस्त ठरलेले आणि विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेले सुनील टिंगरेही या जागेसाठी प्रयत्नशील आहेत.


**संधी मिळतेच असे नाही**-भाजपच्या प्रदेश कोअर कमिटीने जी नावे दिल्लीला पाठविली त्यापेक्षा वेगळेच नाव दिल्लीहून दिले जाउ शकते, असा अनुभव आहे. त्यामुळे कोअर कमिटीने दिलेल्या नावांमधूनच सहा नावे येतील याची शाश्वती नाही. मात्र, सहापैकी तीन नावे ही प्रदेशाने सुचविलेल्यांतून असू शकतील.

## तिहेरी खून प्रकरणातील मुख्य आरोपी गजाआड

**नांदेड :**शहरात दि.४ एप्रिल रोजी घडलेल्या दोन टोळ्यातील गँगवॉरमध्ये तिघांची हत्त्या करण्यात आली होती. या प्रकरणातील मुख्य आरोपी साईलाला याच्यासह अन्य एकास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २२ एप्रिल रोजी उत्तर प्रदेशातील वाराणसी येथून अटक केली आहे. शहरातील ई-स्क्वेअर जवळ ४ एप्रिल रोजी रात्री २ टोळीत गँगवार झाले होते. त्यात अर्जितसिंह चव्हाण, सय्यद आवेज, मोहम्मद अरबाज यांचा खून झाला होता. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा व भाग्यनगर पोलिसांनी सोनू राउत, साहेर, शाहरुख उर्फ कबूतर शेख अजगर, शेख उबेद शेख अजगर यांना अटक केली होती. फरार आरोपींना पकडण्यासाठी नांदेड जिल्हा, सोलापूर, पुणे येथे स्थानिक गुन्हे शाखेचे विविध पथके शोध घेत होती.दरम्यान २१ एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुनील भिसे यांना फरार आरोपी साईलाला दीपकसिंग गहेरवार(रा. बालाजी मंदिर, सिडको) नितेश परमेश्वर इंगळे (रा. शिवनगर, महाराणा प्रताप चौक ) उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार सुनील भिसे व त्यांच्या पथकाने २२ एप्रिल रोजी वाराणसी स्थानिक पोलिसांची मदत घेत उपरोक्त २ आरोपींना शिताफीने पकडले.

# नेपाळमध्ये भारतीय भाविकांच्या बसला अपघात

### 21 जण जखमी, 6 वर्षांच्या चिमुरडीसह एका महिलेचा मृत्यू



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**नेपाळमधील प्युठान जिल्ह्यात भाविकांच्या बसला झालेल्या एका भीषण अपघातात दोन भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला असून २१ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये ३५ वर्षीय महिला आणि एका ६ वर्षांच्या चिमुरडीचा समावेश आहे. हे सर्व भाविक उत्तर प्रदेशातील रहिवासी असल्याचे समोर आले आहे. या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तातडीने मदत जाहीर केली आहे.

भारतीय भाविकांना घेउन जाणारी ही बस प्युठान जिल्ह्यातील डोंगराळ भागात असताना चालकाचा ताबा सुटल्याने हा अपघात झाला. या अपघातात निर्मला (३५) आणि काव्या (६) या दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. बसमध्ये चालकासह एकूण २३ जण होते, त्यापैकी १९ जण गंभीर जखमी आहेत. सर्व जखमींना नेपाळमधील बुटवल येथील लुंबिनी सिटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच उत्तर प्रदेशातील महाराजगंज जिल्हाधिकारी आणि नेपाळच्या रुपनदेही जिल्हा प्रशासनामध्ये तातडीने समन्वय साधण्यात आला. भारताकडून १० रुगणवाहिकांसह 'ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट' टीम तात्काळ नेपाळमध्ये पाठवण्यात आली. नौतनवाचे उपविभागीय दंडाधिकारी नवीन प्रसाद यांना घटनास्थळी रवाना करण्यात आले असून, सोनौली सीमेवर एडीएम दर्जाचे अधिकारी तळ ठोकून आहेत.

**मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची मोठी घोषणा** -या हृदयद्रावक घटनेवर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तीव्र दुःख व्यक्तकेले आहे. मृतांच्या कुटुंबीयांना उत्तर प्रदेश सरकारकडून प्रत्येकी २ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच, जखमींच्या उपचाराचा संपूर्ण खर्च सरकार उचलणार असून, सर्व जखमींना भारतात परत आणण्यासाठी आणि उपचारासाठी जिल्हा रुग्णालय आणि मेडिकल क?लेजला हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे. नेपाळ प्रशासनानेही या संकटकाळात भारताला पूर्ण सहकार्य केले असून, जखमींच्या कुटुंबीयांना नेपाळला जाण्यासाठी सीमेवर विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## 7 महिन्यांच्या गर्भवती अल्पवयीन मुलीला गर्भपाताची परवानगी

### सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी आपल्या एका महत्त्वाच्या निर्णयात सात महिन्यांपेक्षा जास्त गर्भवती असलेल्या १५ वर्षांच्या अल्पवयीन मुलीला वैद्यकीय गर्भपाताची (अबॉर्शनची) परवानगी दिली. मुलीने स्पष्टपणे सांगितले होते की तिला गर्भधारणा सुरू ठेवायची नाही. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुईया यांच्या खंडपीठाने म्हटले, हा जन्म घेणा-या बाळाचा प्रश्न नाही. महत्त्वाचे हे आहे की महिलेला काय हवे आहे. जर महिलेला बाळाला जन्म द्यायचा नसेल, तर तिला जबरदस्ती केली जाउ शकत नाही. जरी बाळाला जन्मानंतर दत्तक देण्याचा पर्याय उपलब्ध असला तरी. सुनावणीदरम्यान सालिसिटर जनरल तुषार मेहता यांनी वैद्यकीय अहवालाचा संदर्भ देत म्हटले होते की, (पान २ वर)

## ‘कोरेगाव भीमा’ दंगलीस फडणवीसांना जबाबदार धरावे



**पुणे/प्रतिनिधी :**कोरेगाव भीमा येथील दंगलीसंदर्भात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दिलेल्या पत्रानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या दंगलीस जबाबदार धरावे अशी मागणी करणारा अर्ज वंचित बहुजन विकास आघाडीचे संस्थापक ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वतीने कोरेगाव भीमा चौकशी आयोगाकडे करण्यात आला आहे. आंबेडकर यांच्या वतीने ॲड. किरण कदम यांनी हा अर्ज दाखल केला असून आयोगाने राज्य सरकारला म्हणणे मांडण्याचे आदेश दिला आहे.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी कोरेगाव भीमा दंगलीसंदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना २०२० मध्ये पत्र दिले होते. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे आयोगाकडे दाखल करण्याची मागणी आंबेडकर यांनी केली होती. ही दंगल म्हणजे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा कट होता. कोरेगाव भीमा दंगलीवेळी फडणवीस (पान २ वर)

## नाशिकच्या ‘टीसीएस’ प्रकरणाची मुंबईत पुनरावृत्ती

**मुंबई:** नाशिकमधील टीसीएस कंपनीत महिला कर्मचा-यांच्या लैंगिक शोषणाचे प्रकरण ताजे असतानाच, आता मुंबईतही तसाच धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका टेलिकालिंग कंपनीत काम करणा-या तरुणीने नोकरी सोडल्यानंतर तिला अश्लील मेसेज पाठवून त्रास देणा-या आरोपीला मुंबई पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी मुंबईतील एका नामांकित टेलिकालिंग फर्ममध्ये काम करत होती. काही वैयक्तिक कारणांमुळे आणि कामाच्या ठिकाणच्या वातावरणामुळे तिने काही दिवसांपूर्वी आपली नोकरी सोडली होती. मात्र, नोकरी सोडल्यानंतरही तिचा त्रास संपला नाही.

पीडितेने नोकरी सोडल्यानंतर त्याच कंपनीत काम करणा-या एका आरोपीने तिला व्हाट्सएप आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून अश्लील मेसेज पाठवण्यास सुरुवात केली. आरोपी तिला सतत फोन करून अश्लील मागणी करत होता. पीडितेने सुरुवातीला याकडे दुर्लक्ष केले, मात्र आरोपीचा त्रास वाढल्याने आणि त्याने तरुणीचे काही खासगी फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्याने तिने पोलीस ठाण्यात धाव घेतली. तरुणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी तातडीने तपास चक्र फिरवली. (पान २ वर)

## सरकारी कर्मचा-यांचा संप अखेर मागे!

### सुधारित पेन्शन योजनेसंदर्भात 15 दिवसांत अधिसूचना काढणार; सरकारचे आश्वासन



**मुंबई/प्रतिनिधी :** सुधारित निवृत्ती वेतन योजनेसह १८ मागण्यांसाठी राज्यभरातील १८ लाख सरकारी कर्मचा-यांनी पुकारलेला संप अखेर चौथ्या दिवशी सरकारने दिलेल्या आश्वासनानंतर मागे घेण्यात आला आहे. सुधारित निवृत्ती योजनेसंदर्भात १५ दिवसांत अधिसूचना काढली जाईल, निवृत्तीचे वय ६० करण्याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन तसेच अन्य मागण्यांबाबत सरकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने हा संप मागे घेण्यात आल्याचे सरकारी निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने जाहीर केला.

राज्यभरातील सरकारी कर्मचारी २१ एप्रिलपासून संपावर होते. या संप आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पुढाकार घेउन दिनांक २२ एप्रिल रोजी मागण्यांवर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकीत १ मार्च २०२४ पासून राज्याची सुधारित राष्ट्रीय वेतन योजना लागू करण्यात आली आहे. परंतु या संदर्भातील कार्यपद्धती व नियम तसेच बाबत आवश्यक असणारे अधिसूचना प्रस्तुत करण्यात आली नव्हती त्यामुळे एक मार्च २०२४ पासून सेवानिवृत्त झालेल्या ६५०० कर्मचारी शिक्षकांना तात्पुरत्या निवृत्तीवेतनाचे लाभ मिळालेला नाही. सबब संबंधित कर्मचा-यांची मोठी आर्थिक कुचुंबणा हो असल्याची बाब निदर्शनास आणल्यानंतर याविषयीची अधिसूचना (पान २ वर)

बंगालमध्ये मोदी म्हणाले

## TMC चा दिवा विझणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी कोलकाता येथील दमदममध्ये रॅली घेतली. ते म्हणाले की, टीएमसीचा दिवा विझणार आहे. विझणारा दिवा फडफडतो. बंगालमध्ये परिवर्तनाची लाट आहे. पहिल्या टप्प्यातील मतदानाने यावर शिक्कामोर्तब केले आहे.पंतप्रधानांनी महिला आरक्षणावर बोलताना सांगितले की, भाजप मुलींची स्वप्ने चिरडू देणार नाही. महिलांची सुरक्षा आमचे प्राधान्य असेल. ४ मे रोजी भाजप सरकार स्थापन झाल्यानंतर महिलांवर झालेल्या अत्याचारांच्या फाईल्स उघडल्या जातील. ही मोदींची हमी आहे. यापूर्वी गृहमंत्री अमित शहा यांनी आज पत्रकार परिषद घेतली होती. ते म्हणाले की, बंगालमधील विक्रमी मतदान ही भीतीतून विश्वासाकडे जाणारी यात्रा आहे. भाजप पहिल्या टप्प्यातील १५२ जागांपैकी ११० जागा जिंकत आहे. राज्यात ४ मे रोजी आमचे सरकार स्थापन होईल. पुढील मुख्यमंत्री बंगालचाच असेल. तो फक्त तुमचा भाचा नसेल, तर भाजपचा कार्यकर्ता असेल. बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात १५२ जागांवर विक्रमी ९२.७२% मतदान झाले आहे. दुस-या टप्प्यात २९ एप्रिल रोजी मतदान होईल. निकाल ४ मे रोजी लागतील.



पश्चिम बंगालमधील जगतबल्लभपूर येथे टीएमसी नेते अभिषेक बॅनर्जी म्हणाले, पूर्वी चोर, दरोडेखोर, खुनी आणि बलात्कारी गुन्हे करून तुरुंगात जायचे. आता ते भाजपमध्ये सामील होतात. तुमच्या आजूबाजूला पाहा; एकही सुसंस्कृत किंवा सभ्य व्यक्ती भाजपला पाठिंबा देत नाही. एकही सुशिक्षित किंवा प्रतिष्ठित व्यक्ती भाजपसोबत नाही. सर्व चोर, भ्रष्ट लोक, गुंड, दारुडे, व्यसनी, देशद्रोही आणि अप्रामाणिक लोक भाजपमध्ये आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, प्रत्येक योजनेत महिलांचा सहभाग वाढावा अशी आमची इच्छा आहे. मात्र, काही दिवसांपूर्वी टीएमसी आणि त्यांच्या मित्रपक्षांनी संसदेत महिला आरक्षणाला विरोध केला. राजकारणात महिलांचा सहभाग वाढावा (पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## धोकादायक शस्त्रांसह आरोपी अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत एका तरुणाला घातक शस्त्रांसह अटक केली आहे. ही कारवाई राजूरा मार्डी रोडवरील विद्यापीठ परिसरातील प्रियांशु पान मंदिरजवळ करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अभिषेक गोविंदराव जाधव (वय २५, रा. गजानन नगर, राहुल नगर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडून एक कोयता, एक स्टीलचा चाकू तसेच एक हीरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलिस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे अधिकारी संदीप चव्हाण यांच्या देखरेखीखाली पार पडली. पोलिस उपनिरीक्षक गजानन सोनूने यांच्या नेतृत्वात हेड कॉन्स्टेबल दीपक सुंदरकर, सुनील लासुरकर, जहीर शेख, सचिन बहाले, अतुल संभे, सूरज चौहान, राजिक रायलीवाले आणि योगेश पवार यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण केली. सदर आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपासासाठी त्याला फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## चारचाकीच्या धडकेत महावितरण कर्मचाऱ्याचा जागीच मृत्यू -बोराळा रेल्वे फाटकाजवळील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार–अमरावती मार्गावर बोराळा रस्ता परिसरातील रेल्वे फाटकाजवळ गुरुवारी उशिरा रात्री झालेल्या भीषण अपघातात महावितरणच्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. सचिन पळसकर (वय ४५, रा. साईनगर, अमरावती) असे मृताचे नाव असून ते शिराळा येथील वीज वितरण केंद्रात प्रधान तंत्रज्ञ म्हणून कार्यरत होते. मिळालेल्या माहितीनुसार, सचिन पळसकर यांनी घटनेच्या दिवशी शिराळा येथील ३३ केव्ही वीज वाहिनीच्या दुरुस्तीचे काम पूर्ण केले होते. त्यानंतर चांदूरबाजार येथील १३२ केव्ही केंद्रात कामाची परवानगी (परमिट) परत करण्यासाठी ते दुचाकीने निघाले होते. दरम्यान, बोराळा रस्त्यावरील रेल्वे फाटकाजवळ पोहोचताच पाठीमागून येणाऱ्या भरधाव चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात पळसकर यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित चारचाकी वाहनचालकाने घटनास्थळावरून पळ काढल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. घटनेची माहिती मिळताच महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघाताची बातमी समजताच परिसरात मोठी गर्दी झाली होती. कर्तव्य बजावत असताना एका प्रामाणिक कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याने वीज कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र शोककळा पसरली आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी चांदूरबाजार उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

## शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

**अमरावती, दि. २४ (जिमाका)** : शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. २७ एप्रिल ते ११ मेच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तातडीने घ्या

### राजीव गांधी पंचायतराज संघटनेची मागणी

**तिवसा/प्रतिनिधीः-**
राष्ट्रीय पंचायतराज दिवसाच्या निमित्ताने राजीव गांधी पंचायतराज संघटन व तिवसा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आज महाराष्ट्रातील प्रामुख्याने विदर्भातील बारा जिल्ह्यातील राहिलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका तातडीने घेत पंचायतराज व्यवस्थेचा खच्चीकरण थांबवावे अशा आशयाचे निवेदन तहसीलदार तिवसा यांचे मार्फत राज्य निवडणूक आयोग व मुख्यमंत्री यांना देण्यात आले.

महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांमधील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाच्या तांत्रिक आणि न्यायालयीन मुद्द्यांमुळे दीर्घकाळापासून रखडलेल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था हा लोकशाहीचा कणा आहे, मात्र निवडणुका न झाल्याने या व्यवस्थेची मोठी पायमल्ली होत आहे. स्थानिक संस्थांवर अनेक काळापासून 'प्रशासक' नियुक्त आहेत. निवडून आलेले लोकप्रतिनिधी नसल्यामुळे ग्रामीण भागातील सामान्य जनतेचे प्रश्न, शेतीविषयक समस्या आणि गावपातळीवरील विकासाची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. जनतेला आपल्या समस्या मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उरलेले नाही. प्रशासकीय राजवटीत केवळ कागदोपत्री कामकाज होत असून, जनहिताच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाहीये. निधीचे नियोजन आणि विनियोग यामध्ये लोकप्रतिनिधींचा अभाव असल्याने ग्रामीण जनतेत मोठा असंतोष निर्माण झाला आहे.ओबीसी आरक्षणाबाबतचा घटनात्मक पेच लवकरात लवकर सोडवून किंवा कायदेशीर मार्गाने तोडगा काढून या २२ जिल्ह्यांमधील निवडणुकांचा कार्यक्रम तात्काळ जाहीर करावा. पंचायत राज व्यवस्था बळकट करण्यासाठी प्रशासकीय राजवट संपुष्टात आणून लोकशाही पद्धतीने निवडणुका घेणे ही काळाची गरज आहे.तरी, शासनाने आणि निवडणूक आयोगाने या गंभीर विषयाची तात्काळ दखल घ्यावी आणि ग्रामीण भागातील जनतेला त्यांचा घटनात्मक हक्क मिळवून द्यावा अशी मागणी राजीव गांधी पंचायत राज संघटन व तालुका काँग्रेसने केली. यावेळी राजीव गांधी पंचायत राज संघटन अध्यक्ष वैभव वानखडे, खरेदी विक्री संघ अध्यक्ष सुरेश मेटकर, शहर अध्यक्ष सेतू देशमूख, महिला तालुका अध्यक्ष पूनम काळमेघ, महिला शहर अध्यक्ष रुपाली काळे, सावित्री वाघमारे, सरोज राजू सलामे, विशाल सावरकर, पांडुरंग खेडकर, विश्वजित बाखडे, किशोर गोरडे, सचिन सोटे, मुकुंद पुनसे, सुधीर लवणकर,गजानन भोंबे, अमोल पन्नासे, सचिन वानखडे, किसनराव मुंदाणे, संजय चौधरी, अनंत शेंद्रे, विशाल शेंडे, सुरेंद्र ढगे, शुभम बोके, रमेश गुडधे, गौरव चौधरी, पवन अर्मळ,आकाश मकेश्वर, विघ्ने दादा आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जास्त वीज लागणारी उपकरणे दिवसा वापरावी -दिवसा वीज स्वस्त, तर रात्रीची वीज महाग

**अमरावती/प्रतिनिधीः-** महावितरणला सौरऊर्जेमुळे मोठ्या प्रमाणात आणि स्वत वीज मिळत आहे. परंतू रात्रीच्या विजेसाठी महावितरणला पारंपरिक म्हणजेच कोळश्याच्या विजेवर अवलंबून रहावे लागते. पारंपरिक वीज ही महाग आणि सरासरी १० रूपये प्रमाणे विकत घ्यावी लागते,पर्यायाने त्या महाग विजेचा भुर्दंड अंतिमरित्या वीज ग्राहकांवरच पडतो. त्यामुळे वीज ग्राहकांनी जास्त वीज लागणाऱ्या उपकरणाचा वापर स्वस्त विजेच्या वेळेत म्हणजेच दिवसा करावा ,असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.

अमरावती परिमंडळात सुमारे २ लाख ५० हजार कृषी ग्राहक आहेत. परिमंडळात मोठ्या प्रमाणात मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेत सौर प्रकल्प स्थापित झाल्याने,सुमारे १.५ लाख कृषी ग्राहकांना दिवसा विज देण्यात येते. तसेच इतर वर्गवारीतील सुमारे १२ लाख ग्राहकापैकी ३% वीज ग्राहकांनी आपल्या घराच्या छतावर सौर प्रकल्प उभारले असून मोठ्याप्रमाणात एसी,व तत्सम उपकरणे वापरायला सुरूवात केली आहे. परंतू त्यांनीही दिवसा आणि रात्रिच्या वीज वापराचे गणित समजून घेत जास्तित जास्त वीज वापर दिवसा शिफ्ट करणे आवश्यक आहे.वीज ग्राहकांनी दिवसा वापरलेल्या विजेवर जुलै २०२५ पासून प्रति युनिट ८० पैशाची सवलत एप्रिल २०२६ पासून ८५ पैसे झाली आहे. परंतू महावितरणच्या या सवलतीच्या लाभ घेण्यासाठी वीज ग्राहकांनी स्मार्ट टिओडी मीटर लावणे गरजेचे असल्याचेही महावितरणने स्पष्ट केले.

**तर संपूर्ण फिडर अंधारात जाऊ शकते-** अमरावती परिमंडळात १४२ फिडर हे मिश्र स्वरूपाचे आहे, या फिडरवरून त्या फिडर परिसरातील गावांना आणि कृषी ग्राहकांना वीज पुरवठा होतो. मिश्र फिडर असल्याने या शेतकऱ्यांना २४ तास वीज उपलब्ध आहे. परंतू ४५° पार झालेल्या तापमानामुळे विजेचा वाढता वापर आणि रात्रीच्या महाग विजेचा भुर्दंड बघता, या फिडरवरील शेतकऱ्यांनी रात्री विजेचा वापर करू नये, असे झाल्यास अतिभारामुळे संपूर्ण फिडर हे अंधारात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या फिडरवरील शेतकऱ्यांनी दिवसाच विजेचा वापर करावा. असे महावितरणने आवाहन केले आहे.

## सार्वजनिक जाहीर नोटीस

ज्याअर्थी, माझे पक्षकार श्री. संदीप कृष्णराव गोडबोले, वय ६० वर्षे, व्यवसाय–धंदा/व्यापार, रा. प्रतापगड अपार्टमेंट, खापर्डे बगीचा, अमरावती यांनी श्री. सुरज नंदकिशोर ढेवले, वय २८ वर्षे, व्यवसाय–शेती, रा. कोडण्यपुर, ता. तिवसा, जि. अमरावती यांचे मालकीची व ताब्यातील खालील नमुद शेती जमीन खरेदी करण्याचे ठरविले आहे.

सदर शेती मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे: मौजे कौडण्यपुर, ता. तिवसा, जि. अमरावती येथील शेत भूमापन व उपविभाग क्र. २/१, भो. वर्ग-१, याचे एकूण क्षेत्र ३ हे. १० आर, यापैकी १ हे. ५५ आर, पोट खराब ०.०७, आ.रु. १२.०० पैसे खाता क्र. ५०२४९ चे शेत सालोम पूर्ण ताब्यात वस्तूसह ईतर झाड झुडपांसह माती गोटे सह आहे.

**या शेतीची चतुःसीमा :-**
पूर्वेस – वर्धा नदी
पश्चिमेस – कौडण्यपुर ते अंबिकापुर डांबर रोड
उत्तरेस – रामेश्वर ढेवले यांचे शेत
दक्षिणेस – श्री वासुदेव केवटे यांचे शेत

ज्याअर्थी, माझ्या पक्षकारांनी सदर मालमत्तेचा व्यवहार करण्यापूर्वी कोणत्याही तृतीय पक्षाचा हक्क, हिस्सा, ताबा, बोजा, तारण, कर्ज, वाद, न्यायालयीन प्रकरण, मृत्युपत्र, वारसा/उत्तराधिकार हक्क, करार किंवा इतर कोणताही दावा असल्यास तो जाहीर व्हावा या उद्देशाने ही नोटीस प्रसिद्ध केली आहे.

म्हणून, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील मालमत्तेबाबत कोणास काही हक्क/दावा/हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्या वकिलांकडे लेखी स्वरूपात कळवावे.

निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच, सदर मालमत्तेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधित सर्व खर्च व जबाबदारी संबंधित हरकतदार/दावेदार यांच्यावर राहील.

अन्यथा, कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार पुढील खरेदी खत व्यवहार पूर्ण करतील व त्याबाबत कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

दिनांक : २५/०४/२०२६
ठिकाण : अमरावती

**ॲड. निखिल पी. देशमुख**
**१२ बी, शिवप्रस्थ वृंदावन कॉलनी,**
**स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या मागे,**
**स्वामी समर्थ लेआउट, निंभोरा, अमरावती**

## जाहीर सुचना

दि.२४.४.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, मे. पॉवर इंजीनीयरिंग कॉरपोरेशन तर्फे प्रो. प्रा. श्री राहुल निरंजन केकान, यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे मलकापुर ता. जि. अकोला येथील सर्वे क्र २३/२ नझूल शीट नं ७० मधील, मंजूर लेआऊट प्लॉट क्र ४०, क्षेत्रफळ २८९.८५ चौ मी. वर बांधलल्या 'श्री राजराजेश्वर रेसिडेंसी नं २०, मधील चवथ्या मजल्यावरील फ्लॅट क्र ४-ए, क्षेत्रफळ १६६.७७ चौ. मी. सुपर बिल्ट अप एरिया बाबतचे दि २३.१२.२०१३, दस्त क्र. ५७९२ हे मुळ खरेदीखत हरवले/अनावधानाने गहाळ झाले आहे, व शोधुन सापडलेले नाही. त्याबाबत रीतसर कार्यवाही केली आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत वा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीलसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि

**आपला**
**शिशिर अरविंद देशपांडे**
**अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,**
**स्टेशन रोड, अकोला**
**मो: ९८२३०९१३७७**

पान १ व १० वरून

## 7 महिन्यांच्या गर्भवती अल्पवयीन

या टप्प्यावर गर्भपात करणे आई आणि बाळ दोघांसाठीही धोकादायक ठरू शकते. त्यांनी प्रसूतीनंतर बाळ दत्तक देण्याचा सल्ला दिला होता.

सालिसिटर जनरल म्हणाले की, सेंट्रल अडाप्शन रिसोर्स अथॉरिटीमार्फत मुलाला दत्तक देण्याची व्यवस्था केली जाउ शकते, ज्यामुळे मुलीची आणि तिच्या कुटुंबाची ओळख सुरक्षित राहील. त्यांनी अल्पवयीन मुलीला आर्थिक मदतीचीही ऑफर दिली. मात्र, न्यायमूर्ती नागरत्ना यांनी या युक्तिवादावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्या म्हणाल्या की, न्यायालय महिलांना वैद्यकीय गर्भपाताऐवजी एखाद्या व्यक्तीच्या आर्थिक मदतीवर किंवा दत्तक घेण्यासारख्या पर्यायांवर अवलंबून राहण्यास भाग पाडू शकत नाही.

याचिकाकर्त्याच्या वकिलांनी सांगितले की, या गर्भधारणेमुळे अल्पवयीन मुलीला गंभीर मानसिक ताण आला आहे आणि तिच्या अभ्यासावरही परिणाम झाला आहे.न्यायालयाला सांगण्यात आले की, अल्पवयीन मुलीमध्ये आधीच गंभीर मानसिक ताणाची लक्षणे दिसत आहेत. तिने आत्महत्येचा प्रयत्नही केला आहे.

**महिलांना प्रजननासंबंधी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य-** कोणत्याही महिलेला, विशेषतः अल्पवयीन मुलीला, तिच्या इच्छेविरुद्ध गर्भधारणा पूर्ण करण्यास भाग पाडणे तिच्या मानसिक, भावनिक आणि शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम करू शकते. म्हणून तिच्या इच्छेचा आदर करणे महत्त्वाचे आहे. न्यायालयाने म्हटले की प्रजननासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार वैयक्तिक स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचा भाग आहे. त्यामुळे दत्तक देण्याचा पर्याय कोणत्याही महिलेला जबरदस्तीने मुलाला जन्म देण्यास भाग पाडण्याचा आधार बनू शकत नाही.

**न्यायालय तेच करेल जे महिलेच्या हितासाठी सर्वोत्तम असेल-** न्यायालयाने म्हटले की, जर न्यायालये अनपेक्षित गर्भधारणा सुरू ठेवण्यावर भर देतील, तर महिलांना बेकायदेशीर गर्भपात केंद्रांचा आधार घ्यावा लागेल किंवा लपून गर्भपात करण्यास भाग पाडले जाउ शकते. यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर गंभीर धोका निर्माण होईल. सर्वोच्च न्यायालयाने यावर जोर दिला की, अशा प्रकरणांमध्ये संवैधानिक न्यायालयांनी हे पाहिले पाहिजे की गर्भवती महिलेच्या हितासाठी काय चांगले आहे, विशेषतः जेव्हा गर्भ स्पष्टपणे अनपेक्षित असेल. शेवटी न्यायालयाने अल्पवयीन मुलीचा एम्स दिल्ली येथे सर्व आवश्यक वैद्यकीय खबरदारी घेउन गर्भपात करण्याचा निर्देश दिला.

## 'कोरेगाव भीमा' दंगलीस

सरकारने सत्तेचा गैरवापर केला. सरकारने दंगलीच्या सूत्रधारांना पाठीशी घातले आणि राज्यातील जनतेची फसवणूक केली. दंगलीचे पुरावे पोलिसांनी मोडूनतोडून सादर केले. सरकारने पोलिसांच्या मदतीने कट रचला असा आरोप करून कोरेगाव भीमा दंगलीची विशेष तपास पथकाद्वारे (एसआयटी) चौकशी करण्याची मागणी शरद पवार यांनी पत्रात केली होती.

**आयोगाने बजावली होती नोटीस-** आयोगाने हे पत्र दाखल करण्याचे पवार यांना आदेश दिले होते. ते पत्र उपलब्ध नसल्याचे त्यांच्या वकिलांनी सांगितले आहे. या पत्रासंदर्भात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनाही आयोगाने नोटीस बजाविली होती. त्यावरील पत्र मुख्यमंत्री कार्यालयाकडे असेल, असे ठाकरे यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले होते. तसेच, मुख्यमंत्री आणि त्यांच्या कार्यालयानेही संबंधित पत्र सादर केलेले नाही, असे ॲड. कदम यांनी सांगितले.

एखादा पक्ष आवश्यक पुरावे सादर करीत नसेल तर न्यायालय किंवा आयोग त्या पक्षाविरोधात विपरीत निष्कर्ष (ॲडव्हर्स इनफरन्स) काढू शकतो. त्यानुसार आयोगाने विपरीत निष्कर्ष काढावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## नाशिकच्या 'टीसीएस'

तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आरोपीचे लोकेशन शोधून काढले आणि त्याला अटक केली. आरोपीवर विनयभंग आणि आयटी अक्टच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काही दिवसांपूर्वी नाशिकच्या टीसीएस कंपनीतही अशाच प्रकारे महिला कर्मचा-यांना टार्गेट केले जात असल्याचे उघड झाले होते. तिथेही अश्लील मेसेज, धर्मांतराचा दबाव आणि मानसिक छळाचे गंभीर आरोप झाले होते. मुंबईतील या नव्या घटनेमुळे कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## सरकारी कर्मचा-यांचा संप

पुढील पंधरा दिवसात काढण्याचे आश्वासन देण्यात आले. त्याचप्रमाणे अन्य प्रलंबित मागण्यांसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठकीचे आश्वासन देण्यात आले. अन्य १८ मागण्यांबाबत चर्चा झाली व त्या संदर्भातील गोषवारा असणारे लिखित इतिवृत्त संघटनेला देण्यात आल्यानंतर संप मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

**चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांची भरती-** चतुर्थ श्रेणी कर्मचारी व वाहन चालक यांची भरती प्रक्रिया सुरू केली जाईल असे आश्वासन देण्यात आले. चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या पाल्यांना भरती प्रक्रियेत प्राधान्य मिळावे यासाठी सकारात्मक विचार केला जाईल असे सरकारकडून देण्यात आलेल्या बैठकीच्या इतिवृत्तात स्पष्ट करण्यात आले. १०:२०:३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना टप्प्याटप्प्याने लागू करण्याचा विचार करण्यात येईल. राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपालिकांचा सन २००५ पासूनचा आकृतीबंध तयार करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल असे स्पष्ट आश्वासन देण्यात आले. सेवानिवृत्तीचे वय ६० करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे नमूद करण्यात आले आहे. १५ मार्च २०२४ चा संचमान्यतेच्या शासन निर्णयातील काही विशिष्ट मुद्द्यांबाबत अडचणी असल्यास त्या शासनाच्या निदर्शनास आणून द्याव्यात, त्यानुसार उपाययोजना करण्यात येतील, असेही आश्वाासन देण्यात आले.

या आश्वासनांच्या पार्श्वभूमीवर सरकारी कर्मचारी संघटनांसोबत समन्वय समितीच्या झालेल्या बैठकीत आश्वासनांसंदर्भात चर्चा करण्यात आली. राज्यस्तरावरील प्रतिनिधींनी या सभेत सहभाग घेतला. या सभेत २१ एप्रिलपासून सुरू असलेला बेमुदत संप आंदोलन उद्या २५ एप्रिलपासून संस्थगित करण्यात आल्याची घोषणा समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर निमंत्रक यांनी केली.

## TMC चा दिवा विझणार

अशी देशाची इच्छा आहे, पण टीएमसीला हे नको आहे.

आज, बंगालमधील आमचे कार्यकर्ते घरोघरी जाउन 'मातृशक्ती भरोसा कार्ड'चे वाटप करत आहेत. प्रत्येक भगिनीला दरमहा ३,००० रुपये किंवा वार्षिक ३६,००० रुपयांच्या मदतीचे आश्वासन दिले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, गेल्या १५ वर्षांत टीएमसी सरकारने बंगालची ओळख नष्ट केली आहे. घुसखोरांना येथे आणून स्थायिक केले जात आहे. ते बंगालच्या जमिनीवर कब्जा करत आहेत आणि स्थानिक लोकांची उपजीविका हिसकावून घेत आहेत. एकीकडे टीएमसीचा भ्रष्टाचार आहे, तर दुसरीकडे घुसखोरांकडून होणारा छळ आहे. बंगालच्या तरुणांना रोजगारासाठी आपली घरे सोडण्यास भाग पाडले जात आहे. टीएमसीचा पूर्णपणे पराभव होउन भाजप पूर्ण ताकदीने सत्तेवर आल्यावरच ही समस्या सुटेल. येथील टीएमसी सरकार वंचितांच्या विरोधात आहे आणि केंद्र सरकारच्या योजनांमध्ये अडथळा आणत आहे. मोदी सरकार आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंतचा वैद्यकीय खर्च उचलते, परंतु टीएमसीने बंगालमध्ये ही योजना रोखून धरली आहे. टीएमसी सरकार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत निधीचा अपहारही करत आहे.

## अंजनगाव सुर्जी कृषी

यांचे उल्लंघन झाल्याचे आदेशात नमूद आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ च्या नियम १०(१)(आय) नुसार सर्व १७ संचालक अपात्र ठरले आहेत. सहकारातील सत्ताधारी गटाचे राजकीय विरोधक शरद साबळे, सुधीर अढाऊ व विनायक वाघ यांनी संचालक मंडळाविरोधात तक्रारी दाखल केल्या होत्या. नियमबाह्य खर्च, कलमभंग आणि अर्थसंकल्पाबाबतचे आक्षेप यात घेण्यात आले होते. सहकार क्षेत्रात कमकुवत असलेल्या भाजपासाठी अंजनगाव सुर्जी बाजार समिती ही जिल्ह्यातील एकमेव सत्ता होती. युवा संचालक मंडळाने बाजार समितीला स्थापने नंतरची सर्वोच्च वाढ मिळवून देत कोटींची शिल्लक ठेवली होती. विकासकामांना गती दिली जात असतानाच हा आदेश धडकला.या निर्णयामुळे केवळ तालुकाच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यातील सहकार वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. भाजपच्या सहकारातील 'शुभारंभा'लाच सुरुंग लागल्याची भावना व्यक्त होत आहे. संचालक मंडळ बरखास्त झाल्याने आता बाजार समितीवर प्रशासक नेमला जाण्याची शक्यता आहे. या निर्णयाविरोधात संचालक मंडळ वरच्या न्यायालयात दाद मागणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान तालुक्यासह जिल्ह्यात सहकाराचे मैदानात पाळेमुळे रुजण्याआधीच ते कोमजल्याने भाजपाचे सहकार क्षेत्रात मुसंडी मारण्याचे उद्देशाला व धोरणाला खिळ बसला आहे. भाजपा ला बसलेला हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

## बँकेतच ज्येष्ठ नागरिकाची ५०

दरम्यान, ते त्याच बँकेत बसलेले असताना तेथे दोन अनोळखी महिला आल्या. त्यापैकी एका महिलेने देशमुख यांच्या पैशांच्या बॅगवर स्वतःजवळ असलेला स्कार्फ टाकला. या दरम्यान, संधी साधून दुसऱ्या महिलेने बॅगमधील ५० हजार रुपये काढून चोरून नेले. काही वेळानंतर देशमुख यांनी बॅग तपासली असता पैसे चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. या घटनेची तक्रार अशोक देशमुख यांनी चांदूर बाजार पोलिस ठाण्यात दिली असून अज्ञात महिलेविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## मालवाहू वाहनाच्या धडकेत

रस्त्यावर फेकल्या गेले. गंभीर दुखापत झाल्याने या तिघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला. लग्नासाठी घराबाहेर पडलेल्या कुटुंबाचा भीषण अपघातात अंत झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवले. मन हेलावून टाकणाऱ्या या घटनेमुळे परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## मेळघाटमध्ये अवैध वाळू

अंधाराचा फायदा घेत पोकलॅण्ड मशीन लपविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. यानंतर स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलिसांच्या मदतीने संयुक्त कार्यवाही करण्यात आली. यामध्ये पोकलॅण्ड आणि जेसीबी सह अवजड यंत्रसामग्री जप्त करण्यात आली तर काही मशीन सील करण्यात आल्या. या धाडीनंतर सोनाबर्डी घाट परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे. या कारवाईमुळे वाळू माफियामध्ये खळबळ उडाली आहे.

## अकोला, अमरावतीत सूर्याची

तिसऱ्या क्रमांकावर आहे. तर चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ शहरांमध्ये ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद आहे. नागपूर, गोंदिया, ब्रम्हपूरी या शहरातही तापमान ४३ अंश सेल्सिअसपलीकडे गेले आहे. वाढत्या तापमानामुळे दुपारच्या वेळी रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. नागरिकांना काही काम नसल्यास दुपारच्या वेळी घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मॉडल रेल्वे स्टेशनवर

बचाटे यांच्या मार्गदर्शनात बीडीडीएस निरीक्षक सोनाली गुल्हाने, उपनिरीक्षक नरवणे, एटीबी निरीक्षक सीमा दाताळकर, कोतवाली चे ठाणेदार मनोहर कोटनाके, उपनिरीक्षक गावंडे, रेल्वे प्रबंधक एम एस लोहकर, आरपीएफ निरीक्षक सुनील डोंगरे, सहायक निरीक्षक अर्चना गाढवे यांनी कारवाई मध्ये सहभाग घेतला.

## मालविय चौकातील दुचाकी

टळला. माहितीनुसार मालवीय चौकात डॉ. मुरके यांच्या रुग्णालयाच्या समोर शेख उस्मान व न्यामत खान बाबा खान यांची दुचाकींचे दुकान आहे. या दुकानात शुक्रवारी दुपारी ११.४५ वाजता सुमारास अचानक आग लागली. आगीची माहिती अग्निशमन विभागाला देण्यात आली. वालकट कंपाउंड येथील अग्निशमन विभागाच्या पथकाने वेळीच घटना स्थळावर पोहोचून आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. बाजूलाच हसंजीचे गॅस सिलेंडरचे गोदाम होते, जर आग तिथं पर्यंत पोहोचली असती तर भयानक परिस्थिती निर्माण झाली असती. आगीत तीन टू व्हीलर, दोन मोपेड, मोटर स्पेअर पार्ट सह ३ लाख ५० हजारांचा माल जळून खाक झाला आहे. शॉक सर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे.

## अलीम नगरात तरुणावर

मारले.यामध्ये त्यांचे पोट फाटून आतड्या बाहेर आल्या. हल्ल्या नंतर आरोपी तेथून पळाले. तेथे उपस्थित नागरिकांनी त्यांना गंभीर अवस्थेत जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच नागपूर गेट पोलीस तिथे पोहचले. त्यांनी जखमी शहजाद खान यांच्याकडून माहिती घेतली. प्रकृती गंभीर असल्यामुळे शहजाद खानला जिल्हा सामान्य रुग्णालयातून नागपूर रेफर करण्यात आले आहे. त्यांचे मोठे भाऊ रिजवान खान गौस खान (वय ३५) यांच्या तक्रारी वरून पोलिसांनी तिन्ही अल्पवयीन आरोपींविरुद्ध कलम १०९(१),३५२,३(५) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. दोन फरार आरोपींचा शोध घेतला जात आहे.

## भाजयुमोची पंचवटी चौकात

पंकज माटे, नगरसेविका सुरेखा लुंगारे, स्वाती कुळकर्णी ,बरखा बोजे ,प्रणिता शिरभाते, श्रेया काळे ,मीना श्रीरावसह इतरांचा सहभाग होता.

## जनगणनेच्या कार्यात नागरिकांना

केली जाईल. स्व-गणनेसाठी १ मे २०२६ ते १५ मे २०२६ हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. नागरिकांनी शासनाच्या अधिकृत https://se.census.gov.in या वेबपार्टलवर आपल्या मोबाईल किंवा संगणकावरून कुटुंबाची माहिती भरायची आहे. यासाठी आधार कार्ड किंवा मोबाईल नंबरच्या आधारे लॉगिन करून एकूण ३३ प्रश्नांची अचूक उत्तरे देणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय असून नागरिकांनी कोणत्याही क्यूआर (QR) कोड स्कॅन करू नये किंवा बँक खाते, पॅन कार्डचा तपशील कोणालाही देऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

अमरावती जिल्ह्याच्या नियोजनाबाबत सांगायचे झाले तर, ग्रामीण व शहरी भागात एकूण ४,४९९ घरयादी गट बनविण्यात आले आहेत. या कार्यासाठी ६८ क्षेत्र प्रशिक्षक, ४,६३९ प्रगणक आणि ८१३ पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून त्यांचे प्रशिक्षण सध्या सुरू आहे. जे नागरिक तंत्रज्ञान वापरू शकत नाहीत किंवा ज्यांनी स्व-गणना केलेली नाही, त्यांच्यासाठी प्रशिक्षित प्रगणक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रत्येक घरी भेट देऊन ॲपद्वारे माहितीची नोंद करतील. ज्यांनी आधीच स्व-गणना केली आहे, त्यांनी प्रगणकांना फक्त आपला 'SE ID' द्यावा.

जनगणनेतून मिळणारी आकडेवारी पुढील १० वर्षांसाठी शाळा, दवाखाने, पाणीपुरवठा आणि रोजगार यांसारख्या विविध विकास आराखड्यांचे नियोजन ठरवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी, विशेषतः सुशिक्षित तरुणांनी पुढाकार घेऊन या राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. काही तांत्रिक अडचण आल्यास स्थानिक तहसील कार्यालय किंवा नगरपालिका प्रशासनाशी संपर्क साधावा.

## नवविवाहित दाम्पत्याचा अपघात

जखमी झाली आहे. अपघाताची माहिती मिळताच चांदूरबाजार पोलीस स्टेशनचे पीएसआय शुभांगी ठाकरे, नितीन डोंगरे, राहुल गवरखेडे आणि रोशन चव्हाण यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी शुभांगीला तातडीने ग्रामीण रुग्णालय, चांदूरबाजार येथे दाखल करण्यात आले, मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने तिला पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलवण्यात आले आहे.

अवघ्या दोन महिन्यांपूर्वीच ज्या घरामध्ये लग्नाचे सनई-चौघडे वाजले होते, त्याच घरावर आज दुःखाचा डोंगर कोसळला आहे. लग्नाची हळदही नीट सुकली नव्हती तोच संसार उध्वस्त झाल्याने परिसरात दुःख व्यक्त केले जात आहे. पोलिसांनी या प्रकरणी घटनेचा पंचनामा करून गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## युवकाने घेतला

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार राजेश रमेश वाघमारे हा चाळीस वर्षीय इसम हमालीचे काम करून आपल्या कुटुंबांचा उदरनिर्वाह करीत होता. त्याला पत्नी व दोन मुले असून पत्नी काही दिवसापूर्वी माहेरी गेली होती ही. संधी साधून आज दि.२४ एप्रिल रोजी दुपारी दीड वाजताचे सुमारास राजेश याने आपल्या स्वतःच्या राहते घरी मायालीला गळफास लावून आत्महत्या केली.याबाबतची माहिती शिरखेड पोलिसांना देण्यात आली. लगेच शिरखेडचे ठाणेदार ईश्वर वरगे यांच्या मार्गदर्शनाखाली एक पोलीस अधिनस्त चमु घटनास्थळी जाऊन मृतकाचे प्रेत शवच्छेदनाकरिता उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे रवाना केले. दि.२५ एप्रिल रोजी शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार आहे. मृतक राजेश वाघमारे यांचेकडे पाच एकर सामूहिक शेती असून त्यांनी शेतीसाठी कर्ज घेतले होते तसेच हमाली करून घर चालविणे सुद्धा कठीण जात होते. या विवंचनेत ते राहत होते. त्यातूनच त्यांनी आत्महत्या केली असावी असा संशय व्यक्त केल्या जात असून पुढील तपास शिरखेड पोलीस करीत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला | वाशिम | बुलडाणा
■ शनिवार २५ एप्रिल २०२६ ■ मुल्य ३.०० ■ पृष्ठे ४
epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com

# राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ वरील वृक्षतोडी विरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल

■ प्रतिनिधी | वाशीम ■

वाशीम शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ वर सेवा रस्ता बांधकामाच्या नावाखाली शंभर वर्षांहून अधिक जुन्या वृक्षांची मोठ्या प्रमाणावर होणारी तोड थांबवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सागर शंकर कोकास यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये जनहित याचिका दाखल केली आहे. सदर याचिका अँड.डॉ मोहन एस. गवई यांनी याचिकाकर्त्यांचे वकील म्हणून दाखल केली आहे.

सामाजिक कार्यकर्ते सागर कोकास यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये दाखल केलेल्या जनहित याचिकेत वाशीम शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर १०० वर्षांहून अधिक जुनी झाडे तोडण्याचा निर्णय घेतला गेला. या झाडांना वाचविण्यासाठी व त्यांचे संवर्धन करण्यासाठी शहरातील पर्यावरण प्रेमी नागरिकांनी व सामाजिक संस्थांनी वारंवार हरकती घेतल्या . त्या हरकती विचारात घेतल्या गेल्या नाहीत या मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या १०९ झाडांचे वैज्ञानिक पद्धतीने पुनर्लागवड करण्याचा पर्याय उपलब्ध असतानाही प्रशासना कडून तो पर्याय दुर्लक्षित करण्यात आला. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी कायदेशीर प्रक्रिया व नैसर्गिक न्यायाचे तत्त्व पाळले नाही, असा आरोप या जनहित याचिकेत करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते सागर कोकास यांनी या जनहित याचिकेत 'त्या' १०९ झाडांच्या वृक्षतोडीला दिलेली परवानगी तात्काळ रद्द करण्यात यावी, सर्व वृक्षतोडीवर स्थगिती देण्यात यावी, पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य उपाय योजना करण्यात याव्यात अशी न्यायोचित मागणी केली आहे. या जनहित याचिके मध्ये नमूद केल्याप्रमाणे, स्वच्छ पर्यावरण व शुद्ध हवा हा भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत मूलभूत हक्क आहे आणि वृक्षतोड हा त्या हक्काचा भंग आहे. असा संवैधानिक मुद्दा सुद्धा मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला आहे.

'विकासाच्या नावाखाली शहराची हरित संपत्ती नष्ट करणे योग्य नाही. झाडे वाचवूनही विकास शक्य आहे. प्रशासनाने जनतेच्या भावना आणि पर्यावरणाचा विचार करावा.'
ही याचिका वाशीम शहरातील पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाची असून, नागरिकांच्या आरोग्य व भविष्यासाठी निर्णायक ठरणार आहे.
**- सागर कोकास सामाजिक कार्यकर्ते, वाशीम**

# रिसोडमध्ये आरोग्य सेवेला नवे बळ; जिजाऊ हॉस्पिटल नव्या जागेत सुरू

## आज स्थानांतरण व शुभारंभ; विविध मान्यवरांची उपस्थिती , सुसज्ज प्रसुती व महिला रुग्णालय

■ रिसोड | प्रतिनिधी ■







रिसोड शहरात मागील दहा वर्षांपासून अखंड रुग्णसेवा करून नावारुपास आलेल्या येथील जिजाऊ हॉस्पीटल प्रसुती व स्त्री रुग्णालयाचे स्थलांतरण व भव्य शुभारंभ २५ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता रिसोड शहरातील बसस्थानक समोर डॉ. साबू यांच्या हॉस्पीटल जवळ विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होत असून सदर कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ.अमोल रतन नरवाडे व डॉ.करुणा अमोल नरवाडे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा.अनंतराव देशमुख राहणार असून केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी खासदार रामराव वडकुते, खासदार अनुप धोत्रे, आमदार भावनाताई गवळी, आमदार अमित झनक, आमदार तान्हाजी मुटकुळे, आमदार शाम खोडे, आमदार किरणराव सरनाईक, माजी आमदार विजयराव जाधव, माजी आमदार संजय रायमुलकर, नगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर, वाशीम नगर पालिकेचे नगराध्यक्ष अनिल केंदळे, जिल्हा शल्यचिकित्सक अनिल कावरखे, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, उपजिल्हाधिकारी दिलीप बाजड, तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, दि. अकोला मध्यवर्ती जिल्हा बँकेचे डॉ. जयराज कोरपे, माजी उपाध्यक्ष वामनराव देशमुख, मुख्याधिकारी सतीष सेवदा, ठाणेदार रामेश्वर चव्हाण, जिल्हा पत्रकार संघाचे माधवराव अंभोरे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहेत. तरी, सदर कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. अमोल रतन नरवाडे व डॉ. करुणा अमोल नरवाडे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

**उपलब्ध सुविधा**
सुसज्य अंतररुग्ण विभाग, वेदनारहित प्रसुती, प्रसुतीपुर्व व नंतर तपासणी, वंधत्व निदान व उपचार, अत्याधुनिक प्रसुती गृह, दुर्बिनद्वारे लेप्रोस्कोपी शस्त्रक्रियेची सुविधा, नवजात शिशूसाठी सर्वो कंट्रोल वार्मर, एनएसटी सुविधा, मासिक पाळीच्या तक्रारीवर मार्गदर्शन, गर्भपिशवी, कॅन्सर निदान व उपचार आदी सुविधा उपलब्ध असून सदर सेवेचा रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ.नरवाडे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# क्षयरोग तपासणी , जागतिक हिवताप दिन साजरा

■ प्रतिनिधी | वाशीम ■




दि. २४ एप्रिल २६ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र शिरपूर येथे फिरते क्ष किरण वाहनाचे डिजीटल एक्स रे मशिनद्वारे संशयित क्षय रुग्णांची एक्स रे तपासणी करण्यात आली.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ अनिल कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ सतीश परभणकर, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ निरंजन शिंदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ अश्विनी खासबागे, वैद्यकिय अधिकारी डॉ संतोष बोरसे यांचे मार्गदर्शनाखाली क्ष किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी ५४ संशयिताचे एक्स रे काढले.

यावेळी उपस्थित डॉ अनिल लहाने, डॉ गजानन घुले, गीता देशमुख, निशिगंधा काळे,अर्चना पांडे, सीताराम लाखाडे, क्षितिज लांडगे, संतोष थोरात, स्वप्नील सरनाईक,आशिष मोहळे, गोपाल तायडे, रमेश सोमटकर, सय्यद मोसीन, प्रवीण इंगळे, शैलेश हिरपूरकर,नितीन अस्टोनकर, दिपिका उमरे, ओम भाटुडकर, सुरेखा मोरे, विलास कळमकर, गणेश राऊत, प्रशांत तूरक तसेच आशा कार्यकर्ती उपस्थित होत्या. यावेळी ३८ संशयितांचे स्पुटम गोळा केले.

शिबीराचे नियोजन जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी केले.सर्व उपस्थितांना क्षयरोग, डेंगू, हिवताप बाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले.

# अडोळी येथे विजेचा लपंडाव सुरू; गावकऱ्यांना गर्मीशी करावा लागतो सामना

■ प्रतिनिधी | वाशीम ■



तालुक्यातील अडोळी येथे गेल्या पंधरा दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू आहे.त्यामुळे येथील गावकऱ्यांना या कडक उन्हात गर्मीचा सामना करावा लागत आहे.

सविस्तर वृत्त असे की ,अडोळी हे गाव पाच हजार लोकवस्तीचे असून या गावात विज वितरण लि.कंपणीचे ३३ के.व्ही उपकेंद्र आहे.शिवाय सौर ऊर्जा प्रकल्प देखील आहे.अडोळी गावाअंतर्गत १५-१६ गावे येतात तरी देखील अडोळी येथील विजेचा लपंडाव सुरू आहे.या विजेच्या लपंडावामुळे गावातील छोटे छोटे उद्योगांना विजेच्या लपंडाची झळ पोहचत आहे.शिवाय गावातील व परिसरातील नागरिकांना सेतू केंद्रांमध्ये शालेय विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना विविध लाभ व शासनाचे ऑनलाईन कामे करण्यासाठी सेतू केंद्रांमध्ये विजेच्या लपंडावाने ऑनलाईन चे कामे देखील सुरळीतपणे चालू नसल्याने अडोळी व अडोळी परिसरातील नागरिकांना विजेच्या लपंडावाचा त्रास सहन करावा लागत आहे. विज वितरण लि.कंपणीने याकडे त्वरीत लक्ष घालून विजेचा सुरू असलेला लपंडाव बंद करून विजय सुरळीतपणे सुरू ठेवावी.अशी मागणी बहुजन रत्न पुरस्कार प्राप्त तथा समाजसेवक राजकुमार पडघान यांनी केली आहे.सुरळीत न केल्यास गावकऱ्यांच्या वतीने संबंधित कार्यालयांवर न्यायीक मार्गाने मागणी करावी लागेल.असे राजकुमार पडघान यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

# सोनखास येथील स्व. शेषराव अर्जुना सोमठकर यांचे मरणोत्तर नेत्रदान

■ प्रतिनिधी | वाशीम ■



तालुक्यातील सोनखास येथील रहिवासी माधव शेषराव सोमठकर यांचे वडिल स्व. शेषराव अर्जुना सोमठकर यांच्या वयाच्या ६६ व्या वर्षी दि.२३ एप्रिल रोजी दुपारी ०२.३० वाजता निधन झाले. सोमठकर कुंटुबातील सर्वात मोठे व सर्वाना सोबत घेऊन चालणारे तसेच समाजकार्याची आवड असलेला स्व. शेषराव अर्जुना सोमठकर यांचे निधन आल्याने संपुर्ण सोमठकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर उभा असताना सोमठकर कुंटुबीयांनी एवढया दुखामध्येही मुत्यनंतर दोन अंधाच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त करत मौजे सोनखास येथे एक आदर्श निर्माण केला.

त्यानूसार जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, नेत्र शल्यचिकित्सक, डॉ. आशिष बेदरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र चिकित्सा अधिकारी ज्ञानेश्वर पोटफोडे व नेत्रदान समुपदेशक श्री. रमेश ठाकरे यांनी स्व. शेषराव अर्जुना सोमठकर यांची नेत्र बुबुळे काढली व नेत्र बुबुळे त्याच दिवशी वैद्यकिय महाविद्यालय, अकोला येथे पाठविण्यात आली. तरी या नेत्रांच्या सहायाने दोष दृष्टि हिनांना पुन्हा प्रकाश पाहण्याची संधी उपलब्ध होणार असून सोमठकर कुटुबियाच्या निर्णयाचे सर्वत्र कौतूक होत आहे. कुटूर्बियानी जनतेला संदेश देताना सांगितले की, नेत्रदान हि अत्यंत पवित्र व मानवतावादी कृती असुन, मृत्य ुनंतरही एखादयाच्या आयुष्यात प्रकाश देण्याची संधी यातुन मिळते. भारतात दरवर्षी हजारो लोक नेत्र मिळण्याच्या प्रतिक्षेत असतात. मात्र नेत्र दाना बींबत जागरुकतेच्या अभावामुळे आवश्यक तेवढी नेत्र उपलब्ध होत नाहीत. नेत्रदान करणे म्हणजे एखादयाला नवजिवन देणे. अशा कार्यात अधिकाधिक लोकांनी सहभागी व्हावे. सदरील नेत्रदान करण्याकरीता गजानन प्रकाश कव्हर, अशोक राजाराम गोरे, मनोज गोरे, विजय तोतरे व सोमठकर कुंटुबांचे सहकार्य लाभले.तरी सर्व समाजातील गणमान्य व्यक्तींनी या नेत्रदान चळवळीत सक्रीय सहभाग घेवुन नेत्रदान चळवळ ही लोक चळवळ व्हावी. मृत्यूनंतर जवळच्या व्यक्तीचे त्वरीत नेत्रदान घडवून आणावे व नेत्रदाना नंतरच मृतावर अंतिम संस्कार करावे असे अवाहन जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. अनिल कावरखे यांनी केले असुन सोमठकर कुटूंबाचे आभार मानले आहेत. सोमठकर कुटूंबाचे आभार मानले आहेत.

# मालेगाव मधील ऐतिहासिक क्षण माऊली वृद्धाश्रमाचा अभिनव उपक्रम ;दत्तक मुलीचा भव्य विवाह सोहळा

■ प्रतिनिधी | मालेगाव



शहरातील माऊली वृद्धाश्रम येथे एका निराश्रित दत्तक मुलीचा विवाह नुकताच संपन्न झाला असून संपूर्ण परिसरामध्ये या विशेष ऐतिहासिक उपक्रमाची प्रशासनीय चर्चा सुरू आहे स्थानिक वृद्धाश्रमाचे संचालक प्रांजली पाध्ये व पंकज पाध्ये यांचे माध्यमातून माजी प्राचार्य प्रकाश कापुरे यांच्या संकल्पनेतून या वृद्धाश्रमाची संकल्पना २००८ मध्ये रुजविल्या गेली आणि शेवटी चार वर्षापासून अविरत प्रयत्नाने याची परिणीती उपक्रमात झाली.

आज हा वृद्धाश्रम खूप चांगल्या प्रकारे शहरांमध्ये चालू असून गोरगरीब निराश्रित वृद्धांना आधार देत आहे त्यांचा भोजनाचा दवाखान्याचा आणि निवासाचा खर्च करत आहे अगदी शुद्ध पाण्यापासून तर सर्व सुविधा या ठिकाणी उपलब्ध करून दिले आहेत जवळपास ३२ वृद्ध महिला आणि अठरा पुरुषांचा समावेश असल्यामुळे येथील संख्या ५० चे वर गेली आहे शहरातील अनेक नामांकित व्यक्तींनी या विशेष उपक्रमाची दखल घेऊन प्रशंसा केली आणि मदतही केली आहे संचालकांना पुढेही मदतीची अपेक्षा आहे नुकताच काही दिवसापूर्वी या ठिकाणी एक दत्तक घेतलेल्या योगेश्वरी नावाच्या मुलीचा कन्यादानाचा अर्थातच विवाहाचा कार्यक्रम भव्य स्वरूपात पार पडला सदर मुलीला योगेश्वरीला प्रांजली पाध्ये आणि पंकज पाध्ये यांनी दत्तक घेतले आणि उच्च घराण्यातील देखण्या योगेश नावाच्या मुलाशी तिचा विवाह योग जुळून आणला अगदी आई वडील जस मुलीला वाटी लावतात तसा देखणा सोहळा हा या ठिकाणी पार पडला या कार्यक्रमाला आयपीएस अधिकारी नवदीप अग्रवाल वाशिम, मालेगावच्या नायब तहसीलदार रंजना गोरे ,पाणीपुरवठा अधिकारी जिल्हा परिषद वाशिम कल्पना चौधरी , मालेगाव ठाणेदार राजेश खेरडे व त्यांची संपूर्ण टीम या परिसरातील भाजपचे नेते नकुल देशमुख शिरपूर येथील प्रसिद्ध व्यावसायिक नंदू उलेमाले डॉक्टर निवृत्ती जाधव ,तानाजी पाटील ,सुरेशराव मुंडे ,गणेश कुटे ,राजू सांगळे , संतोष तिखे , गजानन सारसकर , पिंटू भाला ,सुनील मुंदडा , संतोष सुरडकर , भुतडा सर विधीवत पार पडलेल्या या विवाह सोहळ्याचे प्रास्ताविक माजी प्राचार्य प्रकाश कापुरे यांनी अतिशय सूत्रबद्ध पद्धतीने करून वधू-वरास उपस्थित मान्यवरांना मंत्रमुग्ध केले मालेगाव शहरातील हा एक ऐतिहासिक क्षण ठरला असून या क्षणाचे मानकरी असणाऱ्या सर्वांनी वधू-वर यांना आशीर्वाद दिले येथे कोणीच एकमेकांचे सखे नातेवाईक नव्हते परंतु एखाद्या सख्या नातेसंबंधापेक्षाही चांगल्या प्रकारे एकमेकाला सहकार्य करून हा सोहळा सर्वांनी पार पाडला या विवाह सोहळ्यात वृद्धाश्रमाची सर्व आव्हान विरुद्ध व सर्व कॉलनी तसेच गावातील सर्व मान्यवरांची विशेष उपस्थिती होती सर्वांना त्यानंतर स्नेहभोज सुद्धा देण्यात आला.

# महावीर ब्रम्हचर्याश्रम मध्ये गुरुकुल शिक्षण प्रणाली संगोष्ठी संपन्न

■ प्रतिनिधी | कारंजा ■



**जैन संत समंतभ्रद महाराजांच्या प्रतिमेच अनावरण**

गुरुकुल शिक्षण प्रणाली हि भारतातील अतिशय प्राचीन अशी शिक्षण पध्दती होती आजच्या स्पर्धात्मक व आधुनिक काळात ही काही ठिकाणी अस्तित्वात आहे तर काही ठिकाणी काळाच्या ओघात नष्ट झाली राज्यात आज ज्या काही गुरुकुल शिक्षण प्रणाली अस्तित्वात आहे त्यापैकी जैन संत परम पूज्य १०८ श्री गुरुदेव समंतभ्रद महाराजांच्या प्रेरणेने जैन धर्मातील पावन समजल्या जाणाऱ्या अक्षय तृतीया च्या पावन पर्वावर १९१८ साली स्थापन झालेले जैन गुरुकुल जी आजही १४ शाखेसारख्या वटवृक्षात दिमाखदार पध्दतीने उभी आहे त्यापैकी कारंजा लाड येथे महावीर ब्रम्हचर्याश्रम शाखा असुन या संस्थेला १०८ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल भव्य तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .

प पू जैन गणाचार्य विरागसागरजी महाराज यांची मंगल प्रेरणा तर प पू पट्टाचार्य विशुद्ध सागरजी महाराजांचा शुभाशीर्वाद व त्यांचेच शिष्य प पू विशुद्ध रत्न श्रमण श्री सुप्रभसागरजी महाराज , प्रणतसागरजी महाराज व क्षुल्लक श्री. १०५ विप्रज्ञसागरजी महाराज यांच्या मंगल सानिध्यात गुरूदेव श्री समंतभ्रद प्रणीत गुरुकुल शिक्षण प्रणाली संगोष्ठी व पुतळा अनावरण सोहळा श्री महावीर ब्रम्हचर्याश्रम परिसरात दि. १७ ते १९ एप्रिल रोजी संपन्न झाला. दि १७ एप्रिल रोजी भगवान शांतीनाथ स्वामी पुजन पार पडले तद्नंतर म.ब आश्रम चे विश्वस्त राजाभाऊ डोणगावकर व हर्षल डोणगावकर यांच्याकडून भ. कुंदकुंददेव व आचार्य उमास्वामींच्या चरण पादुका विराजमान केल्या गेल्या दि. १८ एप्रिल रोजी प पू समंतभ्रद महाराज प्रणीत गुरुकुल शिक्षण प्रणाली संगोष्ठी व उदघाटन समारोहाचे आयोजन संपन्न झाले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून म ब्र आश्रम चे अध्यक्ष सतिश जी संगई तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीपाल सेठ बिलाला, दिनेशभाई गंगवाल व सुमितजी ठोले वेरुळ उपस्थित होते. प्रथम सत्रात श्री म ब्र आश्रम स्थापनेपूर्वीची धार्मिक आर्थिक ,राजकीय पार्श्वभूमी या विषयांवर मान्यवरांनी अतिशय अभ्यासपूर्ण माहिती विशद केली, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वाशिम येथील विद्यासागर गुरुकुल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विनोदजी गडेकर उपस्थित होते. तर प्रथम सत्राच्या दुसऱ्या टप्प्यात गुरुकुल व्यवस्थापन प्रणेते प पू गुरुदेव समंतभ्रद महाराज या विषयावर मार्मिक विवेचन पं श्री जितेंद्र जी राठी पुणे यांनी केले यावेळी अध्यक्ष म्हणून पं गुलाबचंद जी बोराळकर वेरुळ उपस्थित होते. व्दितीय सत्रात प पू गुरुदेव समंतभ्रद महाराजांचे शैक्षणिक विचार यावर प्रा डॉ पं नेमीनाथ शास्त्री संपादक सन्मति मासिक बाहुबली यांनी विचार मांडले, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा डॉ..महावीर मांगुळकर अकोला उपस्थित होते. दुसऱ्या टप्प्यात प पु गुरुदेव समंतभ्रद महाराजांची गुरुकुल शिक्षण पध्दती ऐतिहासिक अभ्यास या विषयांवर प्रा श्रध्दाताई पंकज खंडारे नांदेड यांनी आपले मत व्यक्त केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आदिकुमार बंड अमरावती उपस्थित होते तर समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राजाभाऊ डोणगांवकर तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ प्रेमचंदजी पाटणी वेरुळ उपस्थित होते. दि १९ एप्रिल रोजी सकाळी जेष्ठ जिनवर पूजा संपन्न झाल्यानंतर पुढील प पू मुनि महाराजांच्या पावन सानिध्यात व गुरुकुल चे माजी स्नातक व प्रमुख अतिथी विलासजी पाटणी, सतीशजी पेंढारी, अनिलजी झांझरी, मनोजजी कळमकर, जगदीशजी चवरे , अरुणजी आग्रेकर यांच्या हस्ते गुरुदेव समंतभ्रद महाराजांच्या प्रतिमेचे अनावरण संपन्न झाले कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सतीश संगई उपस्थित होते. म ब आश्रम हायस्कूल भुमिपुजन सोहळा ही मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. शेवटच्या टप्प्यात म ब्र आश्रम माजी स्नातक स्नेह संवाद व बक्षिस वितरण डॉ नेमीनाथ शास्त्री बाहुबली यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात सतीश जी संगई यांनी संस्थेच्या आजपर्यंत च्या विकासात्मक कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी उपस्थित मान्यवर व राजाभाऊ डोणगावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वस्त परिमल रुईवाले यांनी केले तर संचालन व आभार प्रदर्शन चिंतामण बुज, कविश गहाणकरी, पवन उखळकर, शुभांगी मरळे व रणजीत वाकळे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करीता विश्वस्त राजाभाऊ डोणगांवकर, सुहास चवरे ,भरत भोरे, प्रमोद चवरे , परिमल रुईवाले व उद्धर चवरे तसेच राहुल जैन व गुरुकुल चे शिक्षक वृंद , कर्मचारी वृंद व माजी स्नातक यांनी परिश्रम घेतले.

# अडोळी येथे पंचायतराज दिन साजरा

■ प्रतिनिधी | वाशीम



तालुक्यातील अडोळी येथील ग्रामपंचायत येथे राष्ट्रीय पंचायतराज दिन दिनांक २४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत प्रशासक सविताताई इढोळे होत्या.तर प्राथमिक आरोग्य उपकेंद्र अडोळीच्या डॉ.निता मापारी, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन,समाजसेवक राजकुमार पडघान, आरोग्य सेवक मारोती इंगळे, खंडोबा कंट्रक्शनचे संचालक परमेश्वर इढोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश इढोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.सुरुवातीला उपस्थित मान्यवरांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.नंतर ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांनी ग्रामसभेचे ठराव वाचून दाखवत उपस्थितीतांच्या सहमतीने गाव विकासाचे ठराव मंजूर करण्यात आले. यावेळी माझं गांव, आरोग्य संपन्न गाव अभियान यासंदर्भात चर्चा करून राज्यातील नागरिकांचे आरोग्य मान सुधारण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या माझं गांव, आरोग्य संपन्न गाव अभियानां तर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनेची अंमलबजावणी कशी करायची यासंदर्भात डॉ.निता मापारी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्यमान सुधारण्यासाठी त्यांवर उपाय कोणत्या पद्धतीने करावे . कुष्ठरोग, हिवताप, जलजन्य आजार, संसर्ग जन्य, असं संसर्ग,स्त्री, पुरुष समानता, स्वच्छता आणि पर्यावरण इत्यादी विषयांवर सखोल अशी माहिती दिली. याचवेळी ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, समाजसेवक राजकुमार पडघान, आरोग्य सेवक मारोती इंगळे यांनी देखील माझं गांव, आरोग्य संपन्न गाव याविषयी प्रकाश टाकला. यावेळी कार्यक्रमाला ग्राम पंचायत प्रशासकीय सदस्य, शिक्षक गावातील महीला पुरुष, आशा वर्कर्स, महीला बचत गटाच्या महीला, अंगणवाडी सेविका, यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांनी केले तर सुत्रसंचलन राजकुमार पडघान, आभार प्रदर्शन रोजगार सेवक दौलत पडघान यांनी केले.यावेळी ग्रामपंचायत कर्मचारी पंढरी इढोळे,रवि इढोळे, सुमेध खंडारे,सागर इढोळे यांची उपस्थिती होती.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १४८ ■ शनिवार, २५ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## वर्ध्यात तीन महिन्यांत ६ हत्या; चोरी-घरफोड्यांच्या १८१ घटना

### गुन्हेगारीचा आलेख वाढता; उष्णतेच्या व लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या सेवाग्रामच्या कार्यामुळे देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला दिशा देणारा वर्धा जिल्हा सध्या वाढत्या गुन्हेगारीमुळे चर्चेत आला आहे. जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीत जिल्ह्यात ६ हत्या, ११ हत्येचे प्रयत्न आणि जबरी चोरी, घरफोडी व चोरीच्या तब्बल १८१ घटना नोंदविण्यात आल्या आहेत. या वाढत्या गुन्हेगारीमुळे कायदा-सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त होत आहे.

उन्हाळा आणि लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने अनेक नागरिक घराला कुलूप लावून बाहेरगावी जात आहेत. या पार्श्वभूमीवर घरफोडी व चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे निरीक्षण आहे. पोलिसांकडून गस्त वाढविण्यात येत असली, तरी नागरिकांनीही सतर्क राहण्याची गरज अधोरेखित होत आहे.

जिल्ह्यातील १९ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत या कालावधीत हत्येचे ६ आणि हत्येच्या प्रयत्नांचे ११ गुन्हे दाखल झाले. या सर्व घटनांचा उलगडा करण्यात पोलिसांना १०० टक्के यश मिळाले आहे. गंभीर गुन्ह्यांमध्ये तपासाची गती समाधानकारक असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येते.

मात्र, मालमत्तेविरोधातील गुन्ह्यांमध्ये परिस्थिती तुलनेने चिंताजनक आहे. जबरी चोरीचे २, घरफोडीचे ३१ आणि चोरीचे १४८ गुन्हे नोंदविण्यात आले. त्यापैकी घरफोडीच्या केवळ ११ (३५.५ टक्के) आणि चोरीच्या ८५ (५७.४ टक्के) गुन्ह्यांचा उलगडा करण्यात आला आहे. उर्वरित प्रकरणांचा तपास सुरू आहे.

महिला अत्याचाराच्या प्रकरणांत बलात्काराचे २० आणि विनयभंगाचे ४१ असे एकूण ६१ गुन्हे नोंदविण्यात आले असून, या सर्व प्रकरणांचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे.

दरम्यान, जिल्ह्यात दारूबंदी असतानाही काही ठिकाणी अवैध दारूविक्री होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान दारूबंदी कायद्यान्वये १,५११ गुन्हे नोंदविण्यात आले असून, अंमलबजावणीचे आव्हान कायम असल्याचे चित्र आहे.

गुन्हेगारीचा वाढता आलेख लक्षात घेता पोलिसांनी गस्त, तपास आणि जनजागृती यावर अधिक भर देण्याची गरज व्यक्त होत आहे. त्याचबरोबर नागरिकांनीही घराची सुरक्षा, शेजारील संशयास्पद हालचालींची माहिती देणे आणि पोलिसांशी संपर्क ठेवणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## अल्पसंख्याक विकास विभागाच्या योजना जैन समाजापर्यंत पोहोचवा - अध्यक्ष ललित गांधी

### -जैन अल्पसंख्याकांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांचा आढावा

### जैन मंदीरांना तीर्थक्षेत्र दर्जा देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

**वर्धा जनमाध्यम :** अल्पसंख्याक विकास विभागाच्यावतीने अल्पसंख्याक समाजातील नागरिकांसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजना जैन समाजातील नागरिक, युवक, लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात श्री.गांधी यांनी जैन अल्पसंख्याकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला प्रभारी जिल्हाधिकारी संजय तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. श्री.सोमण यांनी सादरीकरणाद्वारे विविध विभागाच्यावतीने जैन बांधवांना देण्यात येत असलेला लाभ व योजनांची माहिती दिली.



जैन समाज शासकीय योजनांच्या लाभापासून कायम वंचित राहिला आहे. समाजामध्ये जनजागृतीचा अभाव हे देखील यामागील एक कारण आहे. योजनांच्या लाभाचा समाजात बॅकलॉग आहे. त्यामुळे या समाजात योजनांच्या जनजागृतीवर भर द्यावा. यासाठी समाजातील नागरिक व शासकीय यंत्रणेने पुढाकार घेणे आवश्यक आहे. विविध योजनेच्या लाभासाठी समाजातील पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज घेऊन त्यांना प्राधान्याने लाभ देण्यात यावा, असे श्री.गांधी म्हणाले.

जिल्ह्यात जुनी जैन मंदीरे आहेत. मंदीर विश्वस्तांनी या मंदीरांचे प्रस्ताव 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त करण्यासाठी सादर करावे. येत्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत दर्जा मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केले जावे. जुन्या जैन मंदीरांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. जैन अल्पसंख्याक शाळांना सुविधा देण्यासोबतच अशा काही शाळांचे प्रस्ताव असल्यास सादर करण्याच्या सूचना शिक्षण विभागास केल्या.

जैन समाजातील महिलांचा समावेश असलेले स्वयंसहायता बचतगट स्थापन करता येईल का? यादृष्टीने प्रयत्न व्हावे. जिल्हास्तरीय अल्पसंख्याक समिती स्थापन करून त्यात अल्पसंख्याक सर्व सहा समाजातील नागरिकांचा समावेश करण्यात यावा आणि या समितीच्या नियमित बैठका घेतल्या जाव्या. जैन समाजातील युवकांना मुख्यमंत्री, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा लाभ देण्यात यावा.

जैन साधुसंत पायदळ विहार करतात. त्यांना रस्त्यात कुठेतरी काही काळ विसावा घेता यावा यासाठी विहारधाम बांधण्याचे महामंडळाने ठरविले आहे. त्यासाठी जिल्ह्यात रस्त्यालगत चांगल्या जागा शोधा. शाळांच्या ठिकाणी जागा उपलब्ध होत असल्यास तेथे देखील विहारधाम बांधून देऊ. अन्यवेळी हे विहारधाम शाळांच्या उपयोगी पडेल. विहारधामसह जैन अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी होस्टेलचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश श्री.गांधी यांनी दिले.

बैठकीला जैन समाज बांधवांचे प्रतिनिधी तसेच जैन मंदीरांचे विश्वस्त उपस्थित होते. त्यांनी मांडलेले विषय यावेळी महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी समजून घेतले व आवश्यक सूचना केल्या.

## लक्ष्मी किराणा स्टोअर्सला पहाटे आग; लाखोंचे नुकसान, दोन तासांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात

**आर्वी जनमाध्यम :** शहरातील गजबजलेल्या नेहरू बाजार परिसरात शुक्रवारी (दि. २४) पहाटे लागलेल्या आगीत लक्ष्मी किराणा स्टोअर्स पूर्णतः जळून खाक झाले. या आगीत किराणा मालासह दुकानातील साहित्याची मोठ्या प्रमाणात हानी झाली असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक व्यापारी हरूमल सेठ ठाकूर यांच्या मालकीच्या या दुकानात पहाटे सुमारे ४ वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. सुरुवातीला धुराचे लोट परिसरात पसरल्याचे सकाळी फिरायला गेलेल्या काही तरुणांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ ही माहिती अग्निशामक दलाला दिली.

सूचना मिळताच पालिकेचे अग्निशामक पथक घटनास्थळी दाखल झाले. आगीने काही वेळातच उग्र रूप धारण केल्याने आग विझविण्याचे काम आव्हानात्मक ठरले. सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर अग्निशामक दलाने आगीवर नियंत्रण मिळवले. यामुळे शेजारील दुकानांपर्यंत आग पसरण्यापासून मोठा अनर्थ टळला.

दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. विद्युत शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असला, तरी अधिकृत कारण तपासाअंती स्पष्ट होणार आहे.

या घटनेची नोंद पोलिसांत करण्यात आली असून उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सतीश डेहणकर व पोलिस उपनिरीक्षक संतोष ठाकूर पुढील तपास करीत आहेत. या घटनेमुळे व्यापारी व नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असून, अग्निसुरक्षेबाबत अधिक काटेकोर उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

## जिल्हा पुन्हा तापला; ४४.४ अंशांवर पारा, नागरिकांची काहिली वाढली

**वर्धा जनमाध्यम :** दोन दिवसांच्या तुलनेने दिलासादायक वातावरणानंतर जिल्ह्यात पुन्हा एकदा उन्हाचा तडाखा वाढला आहे. शुक्रवारी (दि. २४) कमाल तापमान ४४.०४ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले असून उष्णतेच्या लाटेमुळे नागरिक हैराण झाले आहेत.

गेल्या काही दिवसांपूर्वी जिल्ह्याचे तापमान ४५ अंशांच्या पुढे गेल्याने परिस्थिती तीव्र झाली होती. उकाड्याच्या झळा सहन न झाल्याने शाळांना सुट्या जाहीर करण्यात आल्या होत्या, तर सकाळीच नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले होते. दुपारच्या सुमारास रस्ते ओस पडत होते आणि सायंकाळपर्यंत बाजारपेठांमध्ये शुकशुकाट दिसून येत होता.

दरम्यान, दोन दिवस तापमानात काही अंशांनी घट होऊन ते सुमारे ४२ अंशांवर आले होते. त्यामुळे नागरिकांना उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र हा दिलासा तात्पुरता ठरला. गुरुवारी (दि. २३) तापमान पुन्हा ४४ अंशांवर गेले आणि शुक्रवारी ४४.०४ अंशांवर पोहोचल्याने उकाड्याने पुन्हा डोके वर काढले आहे.

उन्हाच्या तीव्रतेमुळे दुपारच्या वेळेत नागरिकांनी बाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी पिणे आणि आवश्यक ती काळजी घेणे, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. उष्माघाताच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनी अधिक सावध राहण्याची गरज अधोरेखित होत आहे.

## वर्ध्यात एमडी ड्रग्स विक्रीवर एलसीबीची कारवाई; दोन आरोपी रंगेहाथ जेरबंद

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील अंमली पदार्थांच्या वाढत्या प्रकरणांवर अंकुश ठेवण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) कारवाई करत मेफेड्रॉन (एमडी ड्रग्स) विक्री करणाऱ्या दोन आरोपींना रंगेहाथ अटक केली. या कारवाईत अंमली पदार्थासह दुचाकी आणि मोबाईल असा एकूण २.८२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या निर्देशानुसार अंमली पदार्थांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत २२ एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे हनुमान नगर, बोरगाव मेघे येथील बंद जिनिंगमागील मोकळ्या परिसरात सापळा रचण्यात आला.

या कारवाईदरम्यान कार्तिक प्रमोद वाघमारे (वय २१) व रक्षक गौतम देशभ्रतार (वय २३) या दोघांना ॲक्सेस १२५ मोपेडवरून येऊन मेफेड्रॉनची विक्री करताना पकडण्यात आले. आरोपींच्या ताब्यातून ३ ग्रॅम ६३ मिलीग्रॅम मेफेड्रॉन, एक मोपेड आणि चार मोबाईल असा एकूण २ लाख ८२ हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी वर्धा शहर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, उपनिरीक्षक विजयसिंग गोमलाडू व पथकाने केली.

दरम्यान, शहरातील अंमली पदार्थांच्या साखळीवर आळा घालण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## 'जनमाध्यम'च्या बातमीची दखल जनतेच्या घामावर व्हीआयपींचा आराम

### खासदारांचा इशारा : आधी जनतेच्या जखमा भरा, मग आरामगृह उभारा

**वर्धा जनमाध्यम. :** जनतेच्या प्रश्नांकडे पाठ फिरवून व्हीआयपींसाठी उधळपट्टी सुरू असल्याचा आरोप करत खासदार अमर काळे यांनी राज्य सरकारला थेट धारेवर धरले आहे. २१ एप्रिल रोजी 'जनमाध्यम'मध्ये प्रसिद्ध झालेल्या जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारा दहा कोटींचा व्हीआयपी आराम या वृत्ताची गंभीर दखल घेत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवत वर्ध्यातील आलिशान शासकीय विश्रामगृह प्रकल्पावर तातडीने पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे.



राज्याची आर्थिक घडी विस्कटलेली असताना, शेतकरी कर्जबाजारीपणात होरपळत असताना आणि सर्वसामान्य नागरिक महागाईच्या चक्रात भरडला जात असताना, व्हीआयपींसाठी राजेशाही सोयी उभारणे ही जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखी बाब असल्याचा संताप काळे यांनी व्यक्त केला. जनतेचे अश्रू पुसायचे की व्हीआयपींचे सुख वाढवायचे असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

पालकमंत्री पंकज भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या असलेल्या विश्रामगृहाचे नूतनीकरण आणि नवीन इमारतीचे बांधकाम प्रस्तावित आहे. या प्रकल्पात ९ व्हीआयपी सूटचे आधुनिकीकरण, किचन-पॅन्ट्रीसाठी तब्बल ७.५ कोटी, तर नव्या ४ सुसज्ज सूटसाठी २.५ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. मात्र, दुसरीकडे गावागावातील खड्डेमय रस्ते, पाण्याची टंचाई, हमीभावासाठी झगडणारा शेतकरी आणि रखडलेल्या शासकीय योजना नागरिकांच्या जखमा अधिक खोल करत असल्याचे वास्तव त्यांनी मांडले.

महात्मा महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या साधेपणाच्या भूमीतच व्हीआयपी संस्कृतीचा हा दिखाऊ थाट उभारला जात असल्याने जनतेत संतापाची लाट उसळत आहे. जनतेचे प्रश्न की व्हीआयपींचा आराम हा प्रश्न आता चहाटळ्यांपासून राजकीय व्यासपीठापर्यंत घुमू लागला आहे.

आपल्या पत्रात काळे यांनी शिक्षण, आरोग्य, महिला कल्याण, शेतकरी मदत आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या मूलभूत क्षेत्रांना प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित केली. सार्वजनिक बांधकाम विभागातील कंत्राटदारांना देयके थकलेली असताना चैनीच्या प्रकल्पांना हिरवा कंदील देणे हे प्रशासनाच्या प्राधान्यक्रमांवर मोठे प्रश्नचिन्ह असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, हा निर्णय तातडीने मागे घेतला नाही तर जनतेचा रोष उफाळून येईल, असा इशारा देत निधी सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी वळवावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली. वर्ध्यातील 'आरामगृह' वादाने आता राजकीय वातावरण पेटले असून, येत्या काळात या प्रश्नावर संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

## बोरधरण पर्यटनाला नवा वेग


## बोरधरण पर्यटनस्थळाच्या विकासासाठी शासनाकडून नव्याने ४ कोटी मंजूर

### -पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून पर्यटनस्थळाचा विकास

**वर्धा जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील निसर्गरम्य बोर धरण परिसर पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी शासनाने नव्याने ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून या प्रकल्पाला गती मिळत असून, बोरधरण लवकरच राज्यातील महत्त्वाचे पर्यटन केंद्र म्हणून उदयास येण्याची चिन्हे आहेत.

बोर व्याघ्र प्रकल्पाच्या मध्यभागी वसलेले हे धरण निसर्ग, वन्यजीव आणि शांततेचा अद्वितीय संगम आहे. वाघाच्या दर्शनासाठी देशभरातून पर्यटक येथे येतात. आता धरण परिसराचा पर्यटनदृष्ट्या विकास केल्याने पर्यटकांना व्याघ्र दर्शनासोबतच बोटींग आणि अन्य सुविधा अनुभवता येणार आहेत.

पर्यटन विकासासाठी आतापर्यंत १० कोटी २३ लाख रुपयांची कामे मंजूर झाली आहेत. यात जेटी उभारणी, बोटींग व्यवस्था, सफारी वाहनांची सुविधा, तसेच राहाटी व ढगा गेट सुरू करून पर्यटकांसाठी प्रवेश सुलभ करण्यात आला आहे. याशिवाय, बोरधरण परिसरातील रिसॉर्टचा विकास, व्हीआयपी सूट, वसतिगृह, मीटिंग हॉल, फर्निचर व इंटेरियर कामेही हाती घेण्यात आली आहेत. या कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत ६ कोटी २३ लाखांचा निधी मंजूर आहे.



नव्याने मंजूर झालेल्या ४ कोटी रुपयांतून सौंदर्यीकरण, सोलर लाईटद्वारे विद्युतीकरण आणि आवश्यक पर्यटन सुविधा उभारल्या जाणार आहेत. या प्रकल्पामुळे पर्यटकांची संख्या वाढण्यासोबतच स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

बोरधरण हे निसर्गाच्या कुशीत वसलेले अद्वितीय स्थळ असून, येथील विकासकामांमुळे वर्धा जिल्ह्याच्या पर्यटनाला नवी ओळख मिळेल, असा विश्वास पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी व्यक्त केला.

## माजी ग्रामपंचायत सदस्यावर चाकूने वार; बोरगाव (मेघे) हादरले

**वर्धा जनमाध्यम :** नजीकच्या बोरगाव (मेघे) येथे जुन्या वादातून माजी ग्रामपंचायत सदस्यावर चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. २४) दुपारी १२ च्या दरम्यान घडली. या थरारक घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बोरगाव (मेघे) येथील वॉर्ड क्रमांक ५ मधील रहिवासी रविंद्र मधुकर दरवरे (वय ४८) हे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य आहेत. सुमारे दीड वर्षापूर्वी त्यांचा मंगेश भोसले (वय २९, रा. भिकाजीनगर गिट्टीखदान) याच्यासोबत वाद झाला होता. त्या वादात दरवरे यांनी भोसले याला मारहाण केल्याची माहिती पुढे आली आहे.

याच जुन्या रागातून पेटलेल्या वैराने अखेर रक्तरंजित वळण घेतले. शुक्रवारी दुपारी ग्रामपंचायत परिसरात दोघांमध्ये पुन्हा वाद झाला. वादाचा कडेलोट होताच मंगेश भोसले याने अचानक चाकू काढत दरवरे यांच्यावर सपासप वार केले. या हल्ल्यात दरवरे यांच्या मानेवर गंभीर जखम झाली असून ते रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. हल्ला करून आरोपी घटनास्थळावरून पसार झाला.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी दरवरे यांना तातडीने सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, या घटनेनंतर बोरगाव (मेघे) परिसरात तणावपूर्ण शांतता पसरली आहे. पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला असून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

## वर्ध्यात आज वाङ्मय पुरस्कार सोहळा

**वर्धा जनमाध्यम :** मारोतराव नारायणे स्मृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार प्रदान सोहळा आज (दि. २५) सायंकाळी ६ वाजता सार्वजनिक बजाज वाचनालयाच्या सभागृहात होणार आहे. या कार्यक्रमास राज्यातील विविध भागांतील साहित्यिक व रसिकांची उपस्थिती अपेक्षित आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंत महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. विलासराव देशमुख असतील. सुप्रसिद्ध साहित्यिक पद्मश्री लक्ष्मण माने यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार असून, ते 'आजचे समाजजीवन आणि साहित्यव्यवहार' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

प्रमुख पाहुणे म्हणून विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष प्रदीप दाते उपस्थित राहणार आहेत. या वेळी अकोल्याचे दिवाकर कृष्ण आचार्य, इस्लामपूरचे सूरज चैगुले, वसईचे सखाराम डाखोरे, कोल्हापूरचे आलोक जत्राटकर आणि मुंबईच्या डॉ. स्मिता दातार यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला पुरस्कार संयोजन समितीचे सदस्य श्रीकांत पेटकर, डॉ. संदीप भेले, किशोर पेटकर, सूर्यकांत पाटील व डॉ. प्रमोद शंभरकर यांचीही उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. प्रमोद नारायणे, सचिव हेमलता नारायणे, कोषाध्यक्ष अजय भस्मे व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.



# मध्य भारतातील रुग्णांना मिळणार अत्याधुनिक मल्टी स्पेशालिटी व सुपर स्पेशालिटी सुविधा

- डॉ. आबाजी थत्ते सेवा व अनुसंधान संस्थेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमीपूजन
- मुख्यमंत्री फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती
- जागतिक दर्जाच्या वैद्यकीय सुविधा; हेलीपॅड व एअर ॲम्बुलन्सची सुविधा








**नागपूर/प्रतिनिधी :** जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज अशा ४६१ बेडची सुविधा असलेल्या नॅशनल हेल्थ केअर इन्स्टिट्यूट या मध्य भारतातील अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी आणि सुपर स्पेशलिटी रु ग्णालयाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या उपस्थितीत झाले.

धरमपेठ येथील नॉर्थ अंबाझरी मार्गावरील डॉ. आबाजी थत्ते सेवा अनुसंधान संस्थेच्या वतीने हा वैद्यकीय प्रकल्प सुरू होत आहे. यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अर्थ राज्यमंत्री अड. आशिष जयस्वाल, महापौरनीता ठाकरे, माजी सरकार्यवाहक भैय्याजी जोशी, संस्थेचे अध्यक्ष अड. सुनील मनोहर, उपाध्यक्ष अजय संचेती, सचिव शैलेश जोगळेकर, कोषाध्यक्ष आनंद औरंगाबादकर आदी उपस्थित होते.

नॅशनल हेल्थ केअर इन्स्टिट्यूट ही मध्य भारतातील सर्वात मोठी आणि अत्याधुनिक मल्टी स्पेशलिटी व सुपर स्पेशलिटी संस्था म्हणून सुरू होत असून २३ मजली सुसज्ज इमारत असलेल्या या हॉस्पिटलमध्ये हेलिपॅडची सुविधा असून एअर अम्बुलन्ससुद्धा उपलब्ध होणार आहे. अत्याधुनिक उपचारांच्या सुविधांसोबतच अवयव प्रत्यारोपण व बर्न वार्ड राहणार असून ४६१ बेडची सुविधा तसेच रु ग्णांच्या सुविधेसाठी अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे संस्थेचे सचिव शैलेश जोगळेकर यांनी यावेळी सांगितले. अवयव प्रत्यारोपण सुविधेवर विशेष भर दिला जाणार आहे.

सिंगापूरच्या एस. के. या जागतिक दर्जाच्या वास्तू विशारद संस्थेतर्फे हा प्रकल्प तयार करण्यात आला आहे. येथे मेडिकल प्लॅनिंग आर्किटेकला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे.

नॅशनल हेल्थकेअर इन्स्टिट्यूट सुमारे पाच लाख चौरस फूट क्षेत्रावर उभारले जाणार असून नागपूर परिसर तसेच मध्य भारतातील रु ग्णांच्या गरजा लक्षात घेउन या प्रकल्पाची संकल्पना करण्यात आली आहे. येथे मल्टीस्पेशालिटी तसेच सुपर स्पेशलिटी अंतर्गत जेरियाट्रिक रू मेट्रोलाजी, हृदय व रक्तवाहिन्या, न्यूरोलाजी, नेफ्रालाजी, युरोलाजी, क्रीडा वैद्यक प्लास्टिक व पुनर्रचना आदी सुविधा राहणार आहेत. या संस्थेमध्ये पदव्युत्तर व सुपर स्पेशलिटी अभ्यासक्रमासाठी पूर्ण सुसज्ज शैक्षणिक सुविधा असतील अशी माहिती संस्थेचे सचिव शैलेश जोगळेकर यांनी दिली. स्वागत संस्थेचे अध्यक्ष अँड. सुनील मनोहर, सचिव शैलेश जोगळेकर यांनी केले. कार्यक्रमास वैद्यकीय क्षेत्रातील तसेच विशेष निमंत्रित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन मेघा दीक्षित यांनी केले.

## RBI कडून पेटीएमचा बँकिंग परवाना कायमचा रद्द

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आरबीआयने आपल्या आदेशात या कारवाईमागील स्पष्ट कारणे नमूद केली आहेत. बँकेचे कामकाज आणि व्यवस्थापन हे ठेवीदारांच्या हितासाठी नुकसानकारक असल्याचे आरबीआयला आढळून आले. पेमेंट बँक परवान्यासाठी आवश्यक असलेल्या अटींचे पालन करण्यात बँक वारंवार अपयशी ठरली.

**केवायसी आणि मनी लाँड्रिंग शंका** -यापूर्वी झालेल्या तपासात एकाच पॅन कार्डवर हजारो खाती उघडणे आणि केवायसी प्रक्रियेतील गंभीर त्रु टी समोर आल्या होत्या.

**ग्राहकांवर काय परिणाम होणार?-** ज्या ग्राहकांच्या खात्यात किंवा वॉलेटमध्ये आधीच रक्कम शिल्लक आहे, त्यांना ती काढण्यावर किंवा वापरण्यावर कोणतेही निर्बंध नाहीत. आता ग्राहकांना त्यांच्या पेटीएम बँक खात्यात, वालेटमध्ये



किंवा फास्टॅगमध्ये नवीन पैसे जमा करता येणार नाहीत.

**पेटीएम बँकेचा आतापर्यंतचा प्रवास:** ऑगस्ट २०१५ (परवाना प्राप्ती): विजय शेखर शर्मा यांच्या मालकीच्या 'वन ९७ कम्युनिकेशन्स'च्या पाठबळावर पेटीएमला बँकिंग परवाना मिळाला होता. या परवान्यानुसार त्यांना ठेवी स्वीकारण्याची परवानगी होती, मात्र थेट कर्ज देण्याचे अधिकार नव्हते. मार्च २०२२ (पहिली मोठी बंदी): ग्राहकांच्या पडताळणीत त्रु टी आढळल्याने आरबीआयने ११ मार्च २०२२ पासून नवीन ग्राहक जोडण्यावर बंदी घातली होती.जानेवारी २०२४ (ठेवींवर बंदी): नियमांचे उल्लंघन, निधीचा वापर आणि तांत्रिक पायाभूत सुविधांमधील त्रु टींमुळे आरबीआयने बँकेला नवीन ठेवी स्वीकारणे बंद करण्याचे आदेश दिले होते. एप्रिल २०२६ (परवाना रद्द): वारंवार दिलेल्या सूचनांनंतरही सुधारणा न झाल्यामुळे शेवटी आरबीआयने बँकिंग परवानाच रद्द करण्याचा टोकाचा निर्णय घेतला.

## देशात पेट्रोल-डिझेल महागणार?

**नवी दिल्ली:** गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर एक बातमी वा-यासारखी पसरत आहे की, काही राज्यांमधील विधानसभा निवडणुका संपल्यानंतर देशात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत २५ ते ३० रु पयांची मोठी वाढ होउ शकते. मात्र, केंद्र सरकारने या सर्व बातम्या फेटाळून लावल्या असून त्या पूर्णपणे बनावट असल्याचे म्हटले आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने गुरु वारी (२३ एप्रिल २०२६) स्पष्ट केले की, सरकारकडे इंधन दरवाढीचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. मंत्रालयाने आपल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवण्याबाबतच्या बातम्या दिशाभूल करणा-या आहेत. अशा अफवा केवळ नागरिकांमध्ये घबराट निर्माण करण्यासाठी पसरवल्या जात आहेत. जनतेने अशा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये.

## भटके-विमुक्तसमाजाच्या समस्या निवारणासाठी त्रिस्तरीय समित्या

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील भटके-विमुक्त समाजाच्या समस्या प्रभावीपणे सोडविणे, त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे तसेच या समाजावर होणा-या अमानवीय अत्याचारांच्या घटनांना आळा घालण्यासाठी त्रिस्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली.मंत्री अतुल सावे म्हणाले, राज्यस्तर, जिल्हास्तर आणि उपविभाग स्तरावर समित्यांच्या माध्यमातून भटके-विमुक्त समाजाच्या तक्रारींचे तातडीने निवारण, अत्याचारांच्या घटनांवर त्वरित कारवाई आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे. या निर्णयामुळे भटके-विमुक्त समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाला गती मिळेल. तसेच अत्याचारांच्या घटनांमध्ये घट होण्यास मदत होईल.

राज्यस्तारीय समितीच्या अध्यक्षपदी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री असतील, तर विभागाचे सचिव सदस्य म्हणून कार्य करतील. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. तसेच सह सचिव किंवा उप सचिव यांच्यासह भटके-विमुक्तसमाजासाठी कार्य करणा-या सहा अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यात किमान एका महिलेचा समावेश राहील.

जिल्हास्तारीय समिती जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत राहील. या समितीत पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा जात पडताळणी अधिकारी तसेच सहाय्यक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) यांचा समावेश असेल. याशिवाय भटके-विमुक्त समाजातील चार अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यात किमान एका महिलेचा समावेश राहील. उपविभाग स्तरावर उपविभागीय अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल. या समितीत उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षण अधिकारी तसेच संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी यांचा समावेश असेल. त्याचबरोबर भटके-विमुक्त समाजातील दोन अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे.

## पोलीस क्रीडा स्पर्धा महाराष्ट्राचे महा ऑलिंपिक-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### 36 व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा-2026 चा शुभारंभ

**मुंबई/प्रतिनिधी :**नेहमी कायदा-सुव्यवस्थेसाठी रस्त्यावर खंबीरपणे उभे राहणा-या पोलिसांना आज क्रीडांगणावर खेळाडूंच्या पोशाखात पाहून अभिमान वाटतो. महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा या ख-या अर्थाने महाराष्ट्राच्या महा ऑलिंपिक असून, या स्पर्धेतून पोलीस दलाची ताकद, शिस्त आणि क्रीडा कौशल्य जगासमोर यावे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत कलिना येथील सशस्त्र पोलीस मुख्यालयाच्या क्रीडांगणावर ३६ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२६ चा शुभारंभ झाला.राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या पोलीस अधिका-यांच्या आणि कर्मचा-यांच्या उपस्थितीत झालेल्या या समारंभात स्पर्धामध्ये सहभागी पथकांनी शिस्तबद्ध संचलन केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरु वात झाली. विलेपार्ले येथील पार्लेकर महिला ढोल ताशा पथकाने विशेष सादरीकरण केले. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, गृह राज्यमंत्री योगेश कदम, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा हे ख-या अर्थाने महाराष्ट्राचे महा ऑलिंपिक असून, पोलिसांनी आपल्या क्रीडा कौशल्याच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस हे सर्वोत्कृष्ट असल्याचे जगाला दाखवून द्यावे. नेहमी खाकी वर्दीत रस्त्यावर, मोर्चे-आंदोलन, सण-उत्सवात कर्तव्य बजावणारे पोलीस आज खेळाडूंच्या पोशाखात मैदानावर उतरलेले पाहून आनंद आहे. खेळात हार-जीत होणे हे स्वाभाविक आहे. सतत प्रयत्नशील राहणे महत्त्वाचे आहे. या स्पर्धांमुळे पोलीस दलातील संघभावना, खेळाडू वृत्ती आणि स्पर्धात्मक वृत्ती अधिक बळकट होईल, असे त्यांनी सांगितले.महाराष्ट्र पोलीस दलातील खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर, विशेषत: पोलीस क्रीडा स्पर्धांत सुवर्णपदकांसह अनेक पदके मिळवत राज्याची मान ऊंचावल्याबद्दल उपमुख्यमंत्र्यांनी कौतुक केले. पुढील काळात राष्ट्रीय पातळीबरोबरच ऑलिंपिक स्पर्धांमध्येही राज्यातील पोलिस खेळाडूंना संधी मिळावी, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.पोलिसांच्या सेवाभावाचा गौरव करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, कायदा-सुव्यवस्था राखताना पोलिसांवर सर्वाधिक ताण येतो, तरीही ते उन-वारा-पावसात, सण-उत्सवात, मोर्चा-आंदोलनात सतत रस्त्यावर असतात. अशा तणावपूर्ण कामाच्या पार्श्वभूमीवर या क्रीडा स्पर्धा पोलिसांचा मानसिक ताण कमी करतात, थकवा दूर करतात आणि विविध विभागांतील अधिकारी-कर्मचारी यांच्यातील मैत्री व सामूहिकता वृद्धिंगत करतात. मुंबईला देशाचे ग्रोथ इंजिन संबोधत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सुदृढ कायदा-सुव्यवस्थेमुळेच गुंतवणूक, व्यापार, उद्योग आणि शिक्षण-कला-संस्कृतीचा सर्वांगीण विकास शक्य होतो. राज्यातील गुन्हे उकलण्याचे प्रमाण वाढले असून, सुमारे ९० टक्के प्रकरणांमध्ये ६० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल केले जात असल्याने पोलिसांवरचा जनतेचा विश्वास वाढत आहे.शासन पोलिसांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. पोलिसांसाठी दर्जेदार घरे, गृहनिर्माण प्रकल्पांमधून घरांची तरतूद, सुसज्ज पोलीस स्टेशन, आधुनिक शस्त्रे, वाहने आणि सायबर सुरक्षेसाठी आवश्यक प्रणाली उपलब्ध करू न देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. गृह विभाग आणि गृहनिर्माण विभागाच्या माध्यमातून पोलिसांच्या घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी अधिक वेगाने काम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

## वृद्ध कलावंतांची आधार पडताळणी तात्काळ करा

-ॲड. आशिष शेलार

**मुंबई :** राज्यातील वृद्ध कलावंतांना मानधन मिळण्यासाठी आवश्यक असलेली आधार पडताळणी प्रक्रिया तातडीने पूर्ण करू न वृद्ध कलावंतांचे मानधन तत्काळ देण्याचे निर्देश सांस्कृतिक कार्य आणि इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री अड.आशिष शेलार यांनी दिले. सांस्कृतिक कार्यमंत्री अड.शेलार यांच्या अध्यक्षतेखाली पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, येथे झालेल्या आढावा बैठकीत राज्यातील विविध जिल्ह्यांतील आपले सरकार सेवा केंद्रे, आधार सेवा आणि वृद्ध कलावंत मानधन यासंदर्भातील विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी दूरदृष्यप्रणालीद्वारे राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव महेश वाव्हळ, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभिषण चवरे तसेच महाआयटी संचालक भुवनेश्वरी एस. तसेच जालना, लातूर, परभणी, बुलढाणा, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यमंत्री मंत्री अड. आशिष शेलार म्हणाले की, जालना, लातूर, परभणी, बुलढाणा तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यांमध्ये वृद्ध कलावंतांची आधार पडताळणी संबंधित जिल्हाधिकारी यांनी तातडीने कार्यवाही करू न पात्र कलावंतांना लवकरात लवकर मानधन द्यावे.राज्यातील आपले सरकार सेवा केंद्रांची तपासणी करु न त्यांची पुनर्स्थापना करावी, असे निर्देशही मंत्री ॲड.शेलार यांनी दिले.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी– वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई–निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई–निविदा विक्रीचा कालावधी | ई–निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई–निविदा क्र ३०००६७८४१ | सप्लाय, इरेक्शन अँड कमिशनिंग ऑफ १०० एमटी इलेक्ट्रॉनिक पियोट लेस टाइप वे ब्रिज विथ सीमेंट कॉंक्रेट अप्रोचेस विथ अलाईड वर्क्स इन दाऊतपुर अँश बंड एरिया , टीपीएस, परळी वै. | ३१.३६ लाख ३४८६१/– | २५.०४.२०२६ ते ०२.०५.२०२६ | ०३.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७४६८ (आर) | सप्लाय ऑफ रीक्वायर्ड स्पेयर्स अलॉन्ग विथ रीपेयर अँड इन्स्युलेशन वर्क ऑफ चिमणी स्टॅक ॲट १x २५० मे. वॅट, यू–८, टीपीएस, परळी वै. | १५.६८ लाख १९१८६/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७४८० (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ के टाइप थर्मोकपल केबल अँड अदर केबल्स ॲट आय अँड सी–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ६.८८ लाख १०३१०/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७५०३ (आर) | टू इयर एडब्ल्यूसी फोर नॉन कॉम्प्रेसिव मेंटेनेंस ऑफ नेटवर्क, सर्वर, नेटवर्क नोडस , प्रिंटर्स , स्कॅनर्स, यूपीएस अँड ॲप्लिकेशन सॉफ्टवेयर ॲट एमआयएस / आयटी, २५०मे.वॅट., टीपीएस, परळी वै. | १९.७० लाख २३२०८/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७५०९ (आर) | एएमसी फॉर वर्क ऑफ नायट्रोजन फिलिंग, चेकिंग ऑफ क्रिटिकल ॲक्यूम्यलेटर्स ऑफ एचपीसीव्हीएस, आयपीसीव्हीएस, एचपीबीपी, एलपीबीपी अँड सीडब्ल्यू डिस्चार्ज वॉल्वज अलॉन्ग वीथ सप्लाय ऑफ एन २ गॅस सिलिंडर्स ॲट टीएम–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ४.०८ लाख ७५८१/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७५६७ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ एमएसईआरडब्ल्यू पाइप्स फॉर एसीडब्ल्यू कूलिंग लाइन ऑफ व्हेरियस औक्झिलरी ऑफ यू–६ अँड ७ ॲट बीएम–१, २५०मे.वॅट, टीपीएस, परळी वै. | ५.७२ लाख ९२२५/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७५९० (आर) | वर्क ऑफ रेडियोग्राफी इन्स्पेक्शन ऑफ एचपी वेल्डिंग जाइंट्स ऑफ ट्यूब्स इन बॉयलर रीक्वायर्ड ॲट बीएम–२, यू–८, टीपीएस, परळी वै. | १२.६८ लाख १६१८१/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७७०५ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ (पॅंडस विथ पिस्टन) प्लंजर असेम्ब्ली रीक्वायर्ड फॉर एल & टी मेक एचपी अँड बी अँड एस पंप ऑफ कोल मिल बीबीडी ४७७२ ॲट बीएम–१, २५०मे.वॅट , टीपीएस, परळी वै. | ११.०८ लाख १४५८८/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७७०९ (आर) | मेंटेनेंस कॉंट्रॅक्ट फॉर सर्विसिंग ऑफ ईओटी क्रेनस इंस्टॉलड ॲट व्हेरियस लोकेशन्स (ॲज अँड व्हेन रीक्वायर्ड बेसिस) ॲट सीएचपी–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ११.८२ लाख १५३२४/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७७२५ (आर) | टू इयर ॲन्युअल वर्क कॉंट्रॅक्ट फॉर मेंटेनेंस ऑफ हायड्रोलिक सिस्टिम इंस्टॉलड ॲट सीएचपी–२, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ६१.१४ लाख ६४६४४/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७७३४ (आर) | ॲन्युअल कंप्रेसिव मेंटेनेंस कॉंट्रॅक्ट फॉर सर्विस बिल्डिंग लिफ्ट विथ लिफ्ट ऑपरेटर इंस्टॉलड ॲट ईएम–२ , टीपीएस, २५० मे. वॅट , टीपीएस, परळी वै. | ४.९३ लाख ८४३४/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७७५४ (आर) | एएमसी फॉर वर्क ऑफ कंप्लीट रिवायण्डिंग ऑफ ६.६केव्ही एच.टी. मोटर ॲज अँड व्हेन रीक्वायर्ड ॲट ईएम–१, २५०मे.वॅट., टीपीएस, परळी वै | ३५.१७ लाख ३८६७३/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७७६५ (आर) | वर्क ऑफ एचपी जॉइंट्स रेडियोग्राफी ड्यूरिंग यू–७ एओएच ॲट बीएम–१, २५० मे. वॅट. टीपीएस, परळी वै. | ८.२० लाख ११७०७/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७५४० | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस एच२ लाइन ड्रायर स्पेयर्स इन यू–७, सीओएच ॲट टीएम–१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ७.७१ लाख ११२१५/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७६५८ | वर्क ऑफ इरेक्शन ऑफ कफ लॉक स्केफल्डिंग अँड फरनेस क्लिनिंग बाय जेट मशीन ड्यूरिंग यू–७, एओएच ॲट बीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ४४.८६ लाख ४८३३८/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७७०० | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस स्पेयर्स ऑफ एचपीबीपी मेन वॉल्व अँड एचपीबीपी स्प्रे वॉल्व इन यू–७, सीओएच ॲट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ११.५० लाख १५००४/– | २५.०४.२०२६ ते १०.०५.२०२६ | ११.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७३८० | एएमसी फॉर वर्क सूट ब्लोवर्स , स्कॅनर फॅन अँड सॅम्पलिंग कूलर सर्विसिंग इन रनिंग ऑफ यूनिट अँड रीपेयर्स ड्यूरिंग शॉर्ट शटडाउन ॲट यू–८, बीएम, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ३.४८ लाख ६९८२/– | २५.०४.२०२६ ते १७.०५.२०२६ | १८.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३०००६७५३८ | प्रॉक्यूरमेंट ऑफ सक्शण एयर फिल्टर्स फॉर व्हेरियस औक्झिलरी ॲट एएचपी यू–८, टीपीएस, परळी वै. | ४.४८ लाख ७९८२/– | २५.०४.२०२६ ते १७.०५.२०२६ | १८.०५.२०२६ |

वरील तारीखेस ई–निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई–निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे.सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/– (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी–वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

मुख्य अभियंता

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# ...पुन्हा वांशिक दंगली

गेल्या तीन वर्षांपासून हिंसाचाराच्या आगीत होरपळणाऱ्या मणिपुरात राष्ट्रपती राजवटीचा पर्याय स्वीकारण्यात आला. आता लोकशाही प्रक्रिया सुरू होत असताना आणि राज्य रुळावर आणण्याचे प्रयत्न सुरू असताना, राज्यात पुन्हा वांशिक दंगली उसळल्या आहेत. यामागे निश्चित कारस्थान असावे, याविषयी संशय नाही. एरव्ही सहज उसळलेल्या दंगलीची सुरुवात अत्याधुनिक रॉकेटसारख्या शस्त्रांच्या हल्ल्याने व्हावी, त्यात दोघा मुलांचे बळी जावेत, यामागची संगती लागू शकत नाही, असे नाही. कुकी आणि मैतेई हे मणिपुरातील दोन प्रमुख लोकवंश. विविध कारणांनी या दोन वंशांत वर्षानुवर्षे संघर्ष चालत आलेला आहे. आता एकविसाव्या शतकातील बदलत्या जीवनशैलीची त्यात मोठी भर पडली. दोन्ही वंशांत जमिनीवरील हक्काच्या संघर्षाने पिढ्यान्पिढ्या शत्रुत्व आले आणि त्यात अनेक बळी गेले. कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त झाली. स्वातंत्र्य काळापासूनच भारताच्या ईशान्य भागात सातत्याने संघर्षाचे वातावरण राहिले आहे आणि शेजारी शत्रुराष्ट्रांनी विशेषत: चीन, पूर्वीचा पूर्व पाकिस्तान आणि आजचा बांगला देश यांनी त्याचा नेहमीच गैरफायदा घेतला. ईशान्येतील राज्यांत अस्थिरता राहावी, ही राज्ये कायम धगधगती राहावीत, यासाठी शेजारच्या देशांचे दीर्घकाळ प्रयत्न चालले आहेत. त्यात खंड पडलेला नाही. आताही मणिपूर या संवेदनशील राज्यात नुकताच जो हिंसाचाराचा वणवा उसळला, त्यामागे या परकीय शक्तींचाच हात असणार, यात काही शंकाच नाही. ब्रिटिश राजवटीत त्यांना सत्तेतील वाटा मिळण्याचा फारसा संभव नव्हताच; पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्तेच्या विविध संधी उपलब्ध झाल्या. त्यातूनच दोन्ही समुदायांत राजकीय ईर्ष्या सुरू झाली. अर्थातच, त्याची परिणती हिंसक संघर्षात होणे, अपरिहार्य होते. त्याला खतपाणी घालणारे हितसंबंधी होतेच. या दोन्ही समुदायांत आधीच दुरावा होता. तो या राजकीय सत्तेच्या रणांगणाने आणखी वाढला. द्वेषाची भावना आणखी फोफावली. मुळात समझोता शक्यच नव्हता. त्याची शक्यताही अंधुक झाली आणि तापलेल्या तव्यावर पोळी भाजून घेणाऱ्यांचे फावले. दोन समूहांतील या संघर्षात भरच पडली. जमिनीच्या पारंपरिक वादाबरोबर आर्थिक वादाच्या क्षेत्रात वर्चस्वासाठी दोन्ही वंशांतील संघर्षात नव्याने भर पडली. आधुनिक काळातील उद्योग-व्यवसायासाठी चढाओढ सुरू झाली. काही वेळा ती जीवघेणी ठरली. या पार्श्वभूमीवर प्रशासन यंत्रणाही किंकर्तव्य मूढ झाली. प्रशासनाचे निर्णय काही वेळा एकतर्फी झाले. त्यातून या वणव्यात भरच पडत गेली. वांशिक संघर्षाला नवनवे धुमारे फुलत गेले. आधुनिक काळात सरकारी, निमसरकारी नोकऱ्यांसह विविध संस्थांतील नोकऱ्यांतील दोन्ही वांशिक समुदायातील संघर्षाला आणखी धार चढणे स्वाभाविकच होते. गुणवत्तेनुसार नोकऱ्या दिल्या जाव्यात, हा सर्वसामान्य नियम पाळला गेला नाही. कुकी वंशाचे सरकारात वर्चस्व. त्यानुसार नोकऱ्यांबाबतही मैतेईंची घालमेल झाल्याच्या अनेक तक्रारी पुढे आल्या. कुकी वांशिकांनी नेहमीच मैतेई वांशिकांवर वरचष्मा ठेवण्याचे प्रयत्न केले. या दोन महत्त्वाच्या वंशांतील संघर्षाची ही पार्श्वभूमी. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पाऊणशे वर्षांत त्यावर समाधानकारक तोडगा झालेला नाही. अलीकडेच, या दोन्ही वांशिक समुदायांत रक्तरंजित संघर्ष म्हणजे 'मिनी वॉर' झाले. त्यात किमान २५० जणांचा बळी गेला. ६० हजारांहून अधिक बेघर झाले. शेकडो जखमी झाले, अनेकांना कायमचे पंगुत्व आले. तीन वर्षांनंतर पुन्हा झालेल्या रॉकेट हल्ल्याने या रक्तरंजित संघर्षाची आठवण आणखी ताजी झाली. राष्ट्रपती राजवट संपुष्टात येऊन राज्यात लोकनियुक्त सरकार आले असले, तरी या ठिणगीचा वणवा होऊ नये, यासाठी आजही हालचाली झालेल्या दिसत नाहीत. केवळ बळावर शांतता प्रस्थापित झाली, तरी ती तात्पुरती मलमपट्टी असते. दोन्ही वांशिक समाजांत व्यापक चर्चा, वाटाघाटी, अशा संमजस मार्गातून सर्वसामान्य तोडगा काढण्याचे प्रामाणिक प्रयत्न व्हायला हवेत. ते आजपर्यंत झाले नाहीत, असे नाही; पण पुरेसे गांभीर्य दिसले नाही. १९८० च्या दशकात पंजाबात खलिस्तानी दहशतवाद्यांनी थैमान मांडले होते. अशावेळी तेथील समस्यांवर प्रामाणिक चर्चेतून तोडगा काढण्यात आला. तेव्हा सुवर्ण मंदिरात कारवाई करून कणखर भूमिका घेण्यात आली. पंजाबात आज शांतता निर्माण झाली आहे. हे समृद्ध, संपन्न राज्य भारतीय प्रवाहात पूर्णपणे समरस होऊन गेले आहे. पंजाब हे सीमेवरील राज्य अस्थिर होणे म्हणजे देशाच्या संरक्षण, सार्वभौमत्वाला आव्हान होते. ईशान्य भारतातील मणिपूर हे असेच संवेदनशील राज्य. भूराजकीयदृष्ट्या मणिपूरचे स्थान अत्यंत महत्त्वाचे. ईशान्य भारतातील अरुणाचल राज्यावर चीनचा डोळा आहेच. हा भूभाग चीन आपल्या नकाशात दाखवतोच; शिवाय तिथली नावे चीनने बदलली. चीन अशा कुरापती नेहमीच करीत आलेला आहे. ज्या बांगला देशची निर्मिती भारताने आपल्या जवानांचे रक्त सांडून केली, तो बांगला देश आज भारताच्या हितावर निखारे ठेवताना दिसतो. मणिपूर राज्यात अमली पदार्थांचा प्रसार वाढत आहे. त्यामागे कोणाचा हात आहे, हे सांगणे कठीण नाही. वैफल्यग्रस्त तरुणाई, फुटीरतेची लागण करणारी अदृश्य शक्ती कोण, यातील तर्क शोधण्याची गरज नाही. या तरुणाईतील जहालांना आधुनिक शस्त्रास्त्रे पुरवण्यामागे कोण, हे उघडच आहे. एका बाजूला राज्यातील अंतर्गत संघर्ष आणि दुसऱ्या बाजूला परकीय शक्तींचा पद्धशीरपणे हल्लाबोल, अशा दुहेरी आव्हानांना केंद्र सरकारला तोंड द्यावयाचे आहे. मणिपूरच नव्हे, तर ईशान्येतील राज्यांवरचे हे ग्रहण दूर करण्यासाठी केंद्र पातळीवर पावले तातडीने उचलणे आवश्यक आहे. ईशान्य भारतातील या 'सेव्हन सिस्टर्स' भूराजकीय, सांस्कृतिकदृष्ट्या, भारताच्या मोलाचा ठेवा आहेत. म्हणून धोक्याच्या वळणावर असलेल्या मणिपूरच्या प्रश्नावर तातडीने मार्ग काढण्यासाठी चर्चा सुरू करणे आणि संघर्ष आता तरी संपवण्याची नितांत आवश्यकता आहे. वाटाघाटी, सनदशीर मार्गाबरोबर सुसंवादाने दोन्ही वांशिक समुदायांतील कटुता दूर करण्याची काळाची गरज आहे. केंद्र सरकारपुढे हे मोठे आव्हान आहे.

---



# आंदोलने राजकीय पक्षांची,
# ताप सामान्य नागरिकांना!

विजय पांढरीपांडे

कुणीतरी मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्याचे काम धैर्याने केले म्हणून त्या महिलेचे कौतुक करायला हवे. पण नेते, कार्यकर्ते, पोलीस ती अद्वातद्वा बोलली म्हणून तिलाच दोष देत आहेत.

काल परवा मुंबईला झालेल्या एका महिला मोर्चा प्रसंगी, एका सामान्य सुशिक्षित महिलेने नेत्याला, पोलिसांना धारेवर घेत चांगले फैलावर घेतल्याचे वृत्तवाहिनीवर बघायला मिळाले. कुणीतरी मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्याचे काम धैर्याने केले म्हणून त्या महिलेचे कौतुक करायला हवे. पण नेते, कार्यकर्ते, पोलीस ती अद्वातद्वा बोलली म्हणून तिलाच दोष देत आहेत.

डोक्यावरून पाणी जाते, सहनशीलतेचा उद्रेक होतो तेव्हा भल्या भल्याचा जिभेवर ताबा राहत नाही हे खरे. वास्तविक पाहता या महिलेच्या भाषेवर टीका करणारे लोक प्रतिनिधी संसदेत, विधानसभेत, किंवा बाहेर एकमेकावर टीका करताना किती अर्वाच्य भाषा वापरतात हे आपण वृत्तवाहिनीवर बघतोच! पण मुळात सामान्य नागरिकांना त्रास देणारी ही परिस्थिती निर्माणच का करायची हे राजकीय पक्षांना, शासनाला, पोलिसांना केव्हा कळेल? आज कोणताही पक्ष, कोणताही नेता उठसूट माणसे घेऊन रस्त्यावर येतो. बंद पुकारले, आंदोलन, धरणे, मोर्चे काढणे यामुळे वाहतुकीचा प्रचंड खोळंबा होतो.

मुंबईसारख्या शहरात तसेही वाहतुकीची समस्या नागरिकांच्या पाचवीला पुजलेली असते. त्यात ही निषेधाचे मोर्चे, रस्ता रोको, बंद..याने नेमके कोणते समाज हित साधले जाते हे विचार करूनही समजत नाही. आमचे राजकीय अज्ञान त्यास कारणीभूत असू शकते. हा मोर्चा महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांच्या विरोधात होता. हे विधेयक संसदेच्या नियमांस धरून फेटाळले गेले.

ते मान्य होऊ शकणार नाही हे संसदेतील संख्येचे गणित लक्षात घेता, आत बाहेर सगळ्यांना माहिती होते. महिलांची संख्या वाढवून, एकूण सभासदाची संख्या वाढवून नेमके काय साधले जाणार होते? आताही प्रतिनिधित्व आहेच की! त्याची परिणामकारिता आधी तपासा. महिलांपैकी कोण किती प्रभावी पणे सामान्य नागरिकाच्या समस्यांना वाचा फोडतात ते बघा. काही सन्माननीय अपवाद वगळता फक्त पदाचे आर्थिक लाभ, भत्ते घेण्या पलीकडे बहुतेक लोकनेत्याचे फारसे भरीव योगदान दिसून येत नाही. एका मुलाखतीत स्वतः लता मंगेशकर यांनी मला त्या राज्यसभेत, राजकारणात काही इंटरेस्ट नव्हता, मी फक्त एक दिवस गेले अन् तो आरडाओरडा बघून प्रचंड अस्वस्थ झाले अशी कबुली दिली आहे.

राजकारण, समाजकारण ज्यांच्या रक्तातच आहे अशा महिला प्रभावीपणे आपले कर्तव्य बजावतात. प्रमुख केंद्रीय मंत्रीपदे, पंतप्रधान, राष्ट्रपती, मुख्यमंत्री अशा सर्व जबाबदाऱ्या महिलांनी समर्थपणे सांभाळल्या आहेत. त्यांना संधीच द्यायची तर कोणत्याही पक्षाला जास्तीत जास्त महिलांना तिकीट देण्या पासून कुणी रोकले आहे?

दुसरे म्हणजे एकूण खासदाराची संख्या वाढविण्याचा घोळ! संख्या वाढली की कार्यक्षमता वाढते हे कुणी सांगितले? आहे त्यांनीच गांभीर्याने, प्रामाणिकपणे समाजहिताचे, विकासाचे काम केले तर अर्धेअधिक प्रश्न सहज सुटतील. खासदारांची संख्या वाढविल्याने फक्त सरकारी तिजोरीवर भार पडेल. अन् या तिजोरीत सामान्य नागरिकांनीच दिलेल्या करातून पैसा जमा होत असल्याने आपल्या खिशाला कैची लागेल! या मंडळींना मिळणारे मानधन, भत्ते, इतर सोयी, जन्मभरचे निवृत्तीवेतन हे सगळे खर्च बघता यात देशाचा विकास नव्हे सामान्य माणसाचा विनाश दडला आहे हे कटू सत्य! त्यामुळे मुळातच ज्या कारणासाठी हे आंदोलन मोर्चे सुरू आहेत त्यातील फोलपणा, राजकीय संधीसाधूपणा सिद्ध होतो.

याच मोर्चामुळे नव्हे एकूणच कोणत्याही मागणीसाठी जेव्हा तीव्र आंदोलन होते, बंद पुकारले जातात, मोर्चे निघतात तेव्हा सर्वात अधिक त्रास जनतेला होतो. नागरिक यात विनाकारण भरडले जातात. कुणाची परीक्षा असते, कुणाला मुलाखतीला जायचे असते. कुणाला हॉस्पिटलची इमर्जन्सी असते, किंवा इतर काही तातडीच्या गंभीर कारणासाठी तातडीने प्रवास करायचा असतो, त्यात बाळंतपणासाठी अडलेली गर्भवती असू शकते. शिवाय व्यापारी, छोटे मोठे दुकानदार, ऑटो टॅक्सीवाले यांचेदेखील प्रचंड आर्थिक नुकसान होते. पण कुणालाच कशाची पर्वा नसते. फक्त आपली राजकीय पोळी भाजायची असते.

तसे पाहिले तर असे निषेध नोंदविण्यासाठी, मोर्चे काढण्यासाठी, सभा घेण्यासाठी, बंद पुकारण्यासाठी शासकीय नियम आहेत. पण ते सरकारी पक्ष असो, विरोधी पक्ष असो, किंवा संघटना असोत कुणीच पाळताना दिसत नाहीत. नियम धाब्यावर बसवले जातात. पोलीस देखील कधी कधी त्याकडे कानाडोळा करतात. त्यांचाही नाईलाज असतो. वरून दबाव असतो. इकडे आड तिकडे विहीर अशी त्यांची परिस्थिती असते. कायदे आहेत पण पाळायचे नाहीत असे आपले राजकीय समाजमन झाले आहे की काय, अशी शंका येते.

प्रश्न केवळ या आंदोलने मोर्चाचाच नाही. वेगवेगळे उत्सव, सण सोहळे, या निमित्ताने अनेक दिवस रस्त्यावर शोभा यात्रा निघतात. मिरवणुका निघतात. त्यांच्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होतो. पूर्वी हे सारे शिस्तीत व्हायचे. त्यामागे असलेली मंडळी, मंडळे, संस्था यांना सामाजिक भान होते. त्यात शिस्त होती. आता फक्त डीजेचा गोंधळ, नाचण्याचा धांगडधिंगा उरला आहे. आपण विश्वगुरु वगैरे होण्याच्या बाता करतो. पण हा दिव्याखालचा अंधार कसा घालवणार आधी?

शेवटी या मोर्चात, आंदोलनात सामील होणारे कोण असतात? तेही सामान्य नागरिकच असतात. तुमच्या आमच्या सारखे. पण ते तेवढ्या वेळेपुरते कसल्यातरी प्रलोभनाला बळी पडले असतात. ते कुठल्यातरी आश्वासनाच्या, खोट्या आशेच्या नशेत खऱ्या खोट्याची जाण गमावून बसलेले असतात. खरी गरज प्रत्येकाने शहाणे सजग होण्याची आहे.

आपले बरे वाईट आपणच जाणून घेण्याची गरज आहे. आपला विवेक सदैव जागृत ठेवत कुणाच्या भूलथापांना बळी न पडता आपले बरे वाईट आपणच ठरवण्याची गरज आहे. आपले दोर आपण दुसऱ्याच्या हाती दिले की तो आपल्याला कठपुतळीसारखे नाचवायला मोकळा होतो. आपल्यासाठी चांगले काय वाईट काय हे दुसऱ्या कुणी ठरविण्यापेक्षा आपले आपणच ठरविले तर आपल्याला या आंदोलन मोर्चाच्या मृगजळामागे धावण्याची गरजच उरणार नाही. नेते पुढारी बेकार होतील. सामान्य नागरिकांना मग त्यांचा त्रास होणार नाही कदाचित. कदाचित या शब्दाने शंका यासाठी व्यक्त केली की मुळात आपल्याला शहाणे व्हायचे आहे का? या पुढाऱ्यांच्या साखळदंडातून मोकळे व्हायचे आहे का? की याच पिंजऱ्यात अडकून पडायचे आहे?

---

# शेतकऱ्यांच्या शोषणाला पूर्णविराम द्या!



**मा. नरेंद्र मोदी,**
**पंतप्रधान, भारत सरकार, नवी दिल्ली**
**विषय: - पाकिस्तानातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना तीन जनुके असलेली कापसाची बियाणे ४०० रु प्रति किलो (भारतीय रुपयांमध्ये) दराने मिळत आहेत.**

भारतातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना केवळ दोन जनुके असलेली कापसाची बियाणे २००० रु प्रति किलो हिशेबाने खरेदी करावी लागत आहे. हा भारतातील शेतकऱ्यांवर होणारा घोर अन्याय नाही का?




५ जून २०१५ रोजी, आम्ही आपल्याला पत्र लिहून अशी विनंती केली होती की, भारतातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना 'सरळ वाणाचे' (straight line) कापसाचे बियाणे उपलब्ध करून देण्यात यावे. ज्या देशाकडून आपण हे बीटी तंत्रज्ञान स्वीकारले आहे त्या खुद्द अमेरिकेतही संकरित बियाणांऐवजी सरळ वाणाचे कापसाचे बियाणेच प्रामुख्याने वापरले जाते. आम्ही आपल्याला अशीही माहिती दिली होती की, पाकिस्तानातही शेतकऱ्यांना विशिष्ट जनुके असलेली सरळ वाणांची कापसाची बियाणे पुरवली जात आहेत; मग भारतात मात्र असे का केले जात नाही?

आपल्या हस्तक्षेपामुळे १९ ऑगस्ट २०१५ रोजी आम्हाला एक प्रतिसाद प्राप्त झाला. त्यामध्ये हे मान्य करण्यात आले होते की, आपण सरळ वाणाचे कापसाचे बियाणे उत्पादित करू शकतो. तथापि ही अत्यंत खेदाची बाब आहे की, ११ वर्षे उलटूनही ही गोष्ट अद्याप प्रत्यक्षात आलेली नाही. (त्या पत्राची एक प्रत यासोबत जोडली आहे.)

आज, भारतीय शेतकऱ्यांना विविध कंपन्यांकडून दोन विशिष्ट जनुके (Cry1Ac + Cry2Ab) असलेली कापसाची बीजी-२ बियाणे २,०००रुपये प्रति किलो (९१०रु प्रति ४५० ग्रॅम पाकीट) या दराने खरेदी करण्यास भाग पडत आहे. हीच परिस्थिती आम्ही २०१५ मध्येच आपल्या निदर्शनास आणून दिली होता की, पाकिस्तान बीटी जातीचे विशिष्ट जनुके असलेली सरळ वाणांची कापसाची बियाणे यशस्वीरित्या विकसित केली आहेत. आम्हाला आता अशी माहिती प्राप्त झाली आहे की, पाकिस्तान सरकार कापसाच्या अशा बिया ज्यामध्ये तीन विशिष्ट जनुके (Cry1Ac+Cry2Ab+Cp4esps) समाविष्ट आहेत. तेथील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना केवळ ४०० प्रति किलो दराने उपलब्ध करून देत आहे. (हा दर भारतीय चलनाच्या हिशोबाने अंदाजे ४०० इतका होतो.) पाकिस्तानी रुपयांच्या संदर्भात बोलायचे झाल्यास, सध्या विविध प्रकारचे बियाणे ५ किलोच्या पिशवीसाठी ५,८८५ ते ६,४५० या दरांच्या दरम्यान उपलब्ध आहे. उदाहरणार्थ, `Cryto-2033 Cotton seed' ही जात ५ किलोच्या पिशवीसाठी ५,८८५ दराने उपलब्ध आहे, तर `Ckc-6'Cotton seed 5 kg pink freet Glyphosate cotton seed - 6335 रुपयेप्रमाणे पाकिस्तानात ही जात विकली जात आहे. जिथे ३ पाकिस्तानी रुपया हा १ भारतीय रुपयाच्या बरोबरीचा आहे.

या पार्श्वभूमीवर, आम्ही नम्र विनंती करतो की, कापसाच्या बियाणांबाबत होणाऱ्या आर्थिक नुकसानीतून आमचीही सुटका केली जावी. कदाचित हे साध्य तेव्हाच होईल, जेव्हा आपण कापसाच्या बियाणांच्या स्वतःच्याच, उत्कृष्ट आणि स्वदेशी जाती विकसित करण्याची राजकीय इच्छाशक्ती एकवटू आणि त्याद्वारे शेतकऱ्यांना खाजगी बियाणे कंपन्यांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचा दृढ निर्धार करू. भारतात, 'संकरित कापूस' (Hybrid Cotton) या नावाखाली, शेतकऱ्यांना आता मूळ 'F1' जातीऐवजी 'F2' जातीचे बियाणे पुरवले जात आहे. या गैरप्रकाराला आळा घालण्याची क्षमता केवळ आपल्यामध्येच आहे, असा सर्वत्र दृढ विश्वास आहे आणि याच विश्वासापोटी आम्ही आपणास हे पत्र लिहित आहोत.

**विजय जवंधिया**
शेतकरी संघटना पाईक
मो. ९४२१७२७९९८

---

## महाराष्ट्राला का जमू नये?

पश्चिम बंगालमध्ये गुरुवारी एकूण २९४ जागांपैकी १५२ जगावर मतदान झाले. यामध्ये एकूण १६ जिल्हे होते. प्रथमच विक्रमी म्हणजे तब्बल ९१.७८ एवढे मतदान झाले तामिळनाडू मध्ये ८४.२९ एवढे विक्रमी मतदान झाले. या दोन्ही राज्यात मागील काही निवडणुकात सुद्धा विक्रमी मतदान झाले होते

**पश्चिम बंगाल-** २०१६- ८२.६६ टक्के, २०२१-८३.१७ टक्के, २०२६ - ९१.७८, **तामिळनाडू-** २०१६-७४.२६ टक्के, २०२१-७२.७३ टक्के, २०२६-- ८४.२९ टक्के.

या दोन्ही राज्यात दरवेळेस विक्रमी मतदानाची नोंद झाल्याची आकडेवारी समोर येत आहे.

महाराष्ट्रात २०२४ साली झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत ६६.०५ % मतदान झाले होते.

जे १९९५ नंतर सर्वोत्तम आहे. कर्मचाऱ्यांना मतदानासाठी सुट्टी असते सवलती दिल्या जातात. मग मतदान कमी का व्हावे? या संबंधी लोकजागृती होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वात पुढारलेले राज्य आहे येथे अर्थव्यस्थेला चालना आहे तरीसुद्धा मतदानाला जेवढ्या प्रमाणात लोक बाहेर पडावयास पाहिजेत तेवढे पडत नाहीत पश्चिम बंगाल किंवा तामिळनाडू मध्ये जेवढ्या सवलती मतदानासाठी दिल्या जातात तेवढ्या महाराष्ट्रासाठी सुद्धा आहेत मग मतदान कमी का? याबाबत सरकारी पातळीवर विचार मंथन व्हावयास हवे.

**शांताराम वाघ**

## काँग्रेसची रणनीती की 'हात दाखवून अवलक्षण'?

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचे मतदान पार पडले असून मतदारांनी नोंदवलेला अभूतपूर्व उत्साह चर्चेचा विषय ठरला आहे. यंदाची मुख्य लढत तृणमूल काँग्रेस आणि भाजपमध्ये होत असताना, काँग्रेस आणि डावे पक्ष मात्र आपल्या अस्तित्वाची लढाई लढताना दिसत आहेत. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत काँग्रेसची भूमिका ही 'हात दाखवून अवलक्षण' या म्हणीप्रमाणे स्वतःचेच नुकसान करून घेणारी ठरली आहे. एकीकडे भाजप आणि तृणमूलने आपली सर्व शक्ती मैदानात उतरवली असताना, राहुल गांधींनी पश्चिम बंगालमध्ये आपल्या पक्षाचा साधा प्रचारही केला नाही.

गेल्या संसदेत काँग्रेस पक्षाचे नेते अधिरंजन चौधरी हे बंगालमधील काँग्रेसचे एकमेव खंबीर नेते आहे. त्यांनी सातत्याने मुख्यमंत्री ममता बॅनर्जींच्या कार्यपद्धतीवर प्रखर टीका केली. मात्र, 'इंडिया' आघाडीचे समीकरण जुळवण्याच्या नादात त्यांना पक्षश्रेष्ठींकडून गप्प करण्यात आले. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ज्यावेळी 'बंपर व्होटिंग'ची आकडेवारी समोर येत होती, त्याच वेळी राहुल गांधींनी एक व्हिडिओ संदेश प्रसारित केला. ज्यामध्ये ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसच्या कारभारावर टीका केली आणि भाजपच्या वाढीसाठी जबाबदार धरले आहे. राहुल गांधींनी आपल्या विधानात म्हटले होते की, 'जर ममताजींनी स्वच्छ सरकार चालवले असते, तर पश्चिम बंगालमध्ये भाजपला संधी मिळाली नसती' मतदानाच्या पहिल्या फेरीच्या दिवशीच आपल्या इंडिया आघाडीतील मित्रपक्षावर अशा प्रकारे टीका करीत नाही. हे राजकीयदृष्ट्या आत्मघातकी लक्षण आहे.

राहुल गांधींच्या या भूमिकेवरून असे दिसते की, ममता बॅनर्जी ही निवडणूक हरणार आहेत याची पूर्वकल्पना त्यांना आली आहे किंवा त्यांनी ती स्वीकारली आहे. अखेर, भाजपला रोखण्याचे ध्येय बाजूला ठेवून आपल्याच मित्रपक्षाच्या अपयशावर बोट ठेवणे आणि स्वतःच्या पक्षाला मैदानातून बाहेर ठेवणे, यालाच 'हात दाखवून अवलक्षण' म्हणतात. काँग्रेसच्या या विसंगत रणनीतीचा फायदा शेवटी कोणाच्या पथ्यावर पडतो, हे निकालच स्पष्ट करतील.

**अविनाश देशपांडे**

## पोलीस कोठडीतील अत्याचार

नुकतेच तामिळनाडू राज्यातील मदुराई न्यायालयाने देऊन 'सत्यमेव जयते' ची प्रचिती देशाला घडवून दिली आहे. २०१९ मध्ये आलेल्या कोरोना महामारीमध्ये सगळ्यांचे जगणे कठीण झाले होते. माणूस माणसापासून दूर गेला होता. मृत्यूने तांडव माजवले होते. याच काळात तामिळनाडूतील सधानकुलम कोठडीमध्ये माणुसकीला काळिमा फासणारी आणि पोलीस खात्याला कलंकित करणारी घटना घडली. निर्धारित वेळेपेक्षा अधिक वेक दुकान चालू ठेवल्याच्या किरकोळ कारणावरून जयराज आणि त्याचा मुलगा बेनिक्स या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन कोठडीत डांबले. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मारहाणीत बेशुद्ध पडलेल्या त्या दोघांच्या मदतीसाठी पोलीस हवालदार रेवती यांनी पुढे येण्याचा प्रयत्न केला.

परंतु, त्यांचाही आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला. पोलीस खात्यातील या सैतानांना कठोर शिक्षा होण्यासाठी पोलीस हवालदार रेवती यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून न्यायालयीन दंडाधिकाऱ्यांपुढे क्रूरकर्म्यांची क्रूरता कथन केली तेव्हा न्यायालयाच्या भिंतीही गदागदा हलल्या असतील. कायद्याच्या नावाखाली चालणारी पोलिसांमधील क्रूरता न्यायालय सहन करणार नाही. हेच या निकालाने अधोरेखित होते. कोठडीतील मृत्यूप्रकरणात देशभरात आजपर्यंत अनेकांना जबाबदार धरून न्यायालयाने शिक्षा ठोठावली आहे. परंतु, तामिळनाडूतील निर्णय हा कणखर व तितकाच कठोर आहे. ज्यांनी धाडस व हिंमत दाखवली त्यांना न्यायालय व राज्य सरकारने संरक्षण दिले पाहिजे.

**प्रा. मधुकर चुटे**

## ज्येष्ठ नागरिकांसमोरील अडचणी

एमएसआरटीसीकडून सवलतधारी प्रवाशांसाठी एनसीएमसी कार्ड सुरू करण्याचा उपक्रम स्वागतार्ह आहे. मात्र, या प्रक्रियेत अनेक ज्येष्ठ व अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. कार्ड नोंदणीसाठी आवश्यक असलेले बोटांचे ठसे (फिंगरप्रिंट) मशीनद्वारे घेतले जातात. परंतु वयोमानामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांचे अंगठ्याचे व बोटांचे ठसे स्पष्टपणे उमटत नाहीत. परिणामी, मशीन त्यांचे ठसे स्वीकारत नाहीत. त्यामुळे अशा नागरिकांना कार्ड मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. समस्येबाबत स्पष्ट मार्गदर्शन कोणत्याही स्तरावर उपलब्ध नाही. कार्ड नोंदणी केंद्र, एसटी डेपो किंवा खासगी केंद्र चालकांकडूनही उत्तरे, मार्गदर्शन मिळत नाहीत.

## वेचक

### दहशतवाद मुळासकट नष्ट करू : राष्ट्रपती

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :** "दहशतवादाच्या कोणत्याही रूपाला पराभूत करण्यासाठी भारत पूर्णपणे सज्ज आहे," अशा शब्दांत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाचा निर्धार व्यक्त केला. गेल्या वर्षी पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याला बुधवारी एक वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, त्यांनी या हल्ल्यातील बळींना श्रद्धांजली वाहिली. २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम येथे 'लष्कर-ए-तैयबा'च्या तीन दहशतवाद्यांनी २५ पर्यटक आणि एका स्थानिक अश्वपालाची निर्घृण हत्या केली होती. या घटनेचा निषेध करताना राष्ट्रपतींनी 'एक्स' (ट्विटर) वर पोस्ट केली की, "त्या भ्याड कृत्यात निष्पाप जीवांना गमवावे लागल्याचे दुःख आजही देशाच्या स्मरणात ताजे आहे. शोकाकुल परिवारांच्या पाठीशी संपूर्ण देश उभा आहे. अशा कृत्यांमुळे शांतता आणि एकतेप्रती असलेली आमची बांधिलकी डगमगणार नाही." राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात स्पष्ट केले की, भारत कोणत्याही परिस्थितीत दहशतवादासमोर झुकणार नाही. "दहशतवादाचा नायनाट करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत," असे त्यांनी पुन्हा एकदा ठणकावून सांगितले.

### पत्रकाराकडून जॉर्जिया मेलोनींचा अपमान

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :** जागतिक राजकारणात रशिया आणि इटलीमधील संबंध आतापर्यंतच्या सर्वात नीचांकी पातळीवर पोहोचले आहेत. रशियाचे प्रसिद्ध टीव्ही अँकर व्लादिमीर स्लोव्योव्ह यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्याबद्दल अत्यंत आक्षेपार्ह विधाने केली. थेट प्रक्षेपित कार्यक्रमात व्लादिमीर स्लोव्योव्ह यांनी जॉर्जिया मेलोनी यांच्यावर वैयक्तिक हल्ले केले. त्यांनी मेलोनी यांना "मानवतेला कलंक, एक जंगली प्राणी आणि एक मूर्ख स्त्री" अशा शब्दांत अपमानित केले. एवढेच नाही तर त्यांनी मेलोनी यांच्यावर "फॅसिस्ट" असल्याचा शिक्का मारला आणि त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांचा विश्वासघात केल्याचा गंभीर आरोपही केला. मेलोनी यांनी युक्रेनला दिलेल्या लष्करी मदतीमुळे आणि रशियाविरोधी कडक भूमिकेमुळे मॉस्को त्यांच्यावर संतापलेले आहे, ज्याचा परिणाम या विखारी टीकेत दिसून येत आहे. या घटनेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर एका महिला राष्ट्रप्रमुखाबद्दल वापरली गेलेली ही भाषा आता मोठ्या वादाचे केंद्र बनली आहे.

### वन्यजीवांच्या हल्ल्यात २० जणांचा बळी

**डेहराडून (वृत्तसंस्था) :** उत्तराखंडमध्ये मानव आणि वन्यजीवांमधील संघर्षाने आता भीषण रूप धारण केले आहे. वन विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, जानेवारी ते मार्च २०२६ या अवघ्या तीन महिन्यांच्या कालावधीत वन्यजीवांच्या हल्ल्यांच्या ११८ घटनांची नोंद झाली आहे. यामध्ये २० जणांचा मृत्यू झाला असून ९८ जण गंभीर जखमी झाले आहेत. ही आकडेवारी राज्याच्या ढासळत्या पर्यावरणीय संतुलनाकडे लक्ष वेधणारी आहे. गेल्या पूर्ण वर्षात (२०२५) वन्यजीवांच्या हल्ल्यात ६८ जणांचा बळी गेला होता, मात्र २०२६ च्या पहिल्या तीन महिन्यांतील कल पाहता हे वर्ष अधिक जीवघेणे ठरण्याची भीती व्यक्त होत आहे. या वर्षात झालेल्या एकूण मृत्यूंपैकी ५० टक्के मृत्यू हे वाघांच्या हल्ल्यामुळे झाले आहेत. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या तिमाहीत वाघाशी समोरासमोर गाठ पडलेल्या एकाही व्यक्तीचा जीव वाचलेला नाही; वाघाच्या प्रत्येक हल्ल्याचा शेवट मृत्यूमध्येच झाला आहे. रामनगर आणि नैनीताल वनविभाग या संकटाचे केंद्र बनले असून, बिबट्या आणि हत्तींच्या हल्ल्यांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे.

### केदारनाथ धामचे दरवाजे उघडले

**उत्तराखंड (वृत्तसंस्था):** भक्ती आणि उत्साहाच्या वातावरणात चारधाम यात्रेच्या चौथ्या दिवशी बुधवारी केदारनाथ धामचे दरवाजे भाविकांसाठी उघडण्यात आले. वैदिक मंत्रोच्चार आणि पारंपरिक विधीनुसार मंदिराचे



द्वार उघडताच उपस्थित हजारो भाविकांनी जयघोष केला. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या सोहळ्याला उपस्थित राहून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावाने पहिली पूजा अर्पण केली. परंपरेनुसार, सर्वप्रथम मंदिराचा पूर्वेकडील दरवाजा उघडण्यात आला. मुख्य पुजारी आणि रावळ यांनी गर्भगृहात प्रवेश करून पूजा सुरू केली. गेल्या वर्षी मंदिर बंद करताना ज्योतिर्लिंगावर लावलेला पवित्र 'भस्म' बाहेर काढण्यात आला आणि तो उपस्थित भाविकांना प्रसाद म्हणून वाटण्यात आला. यानंतर मंदिर सामान्य भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले. यंदा केदारनाथ मंदिर समितीने मंदिर परिसरात शिस्त राखण्यासाठी अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. मुख्य मंदिर परिसराच्या ५० ते ६० मीटरच्या परिघात मोबाईल फोन नेण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात किंवा मुख्य परिसरात फोटो काढणे, व्हिडिओ बनवणे किंवा सोशल मीडियासाठी 'रील' बनवणे हा दखलपात्र गुन्हा मानला जाईल. भाविकांना आठवण म्हणून फोटो काढायचे असल्यास, धाममध्ये विशिष्ट 'फोटो पॉइंट्स' तयार करण्यात आले आहेत. तिथेच मोबाईल वापरण्याची मुभा असेल. मंदिर परिसरात धार्मिक पावित्र्य राखणे ही प्रत्येक भाविकाची जबाबदारी आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा मंदिर समिती आणि प्रशासनाने दिला आहे. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता सुरक्षेचाही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

### पुण्यात 'पॅट-३' परीक्षेचा पेपर फुटला

**पुणे :** राज्यातील दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षमता तपासण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या 'पॅट-३' (मूल्यांकन चाचणी) परीक्षेच्या गोपनीयतेचा बोजवारा उडाला आहे. या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका प्रत्यक्ष परीक्षा होण्यापूर्वीच एका सोशल मीडिया चॅनेलवर प्रसारित झाला आहे. याप्रकरणी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने दिलेल्या तक्रारीनंतर विश्रामबाग पोलीस ठाण्यात संबंधित चॅनेलच्या चालकाविरुद्ध माहिती-तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्यभरातील शासकीय, खासगी आणि अनुदानित शाळांमधील सुमारे ३० लाख विद्यार्थी गणित, इंग्रजी आणि मराठी विषयांची 'पॅट-३' परीक्षा देणार होते. या प्रश्नपत्रिकांची छपाई पुण्यात एका खासगी मुद्रणालयात करून अत्यंत गोपनीय पद्धतीने वितरण केले जाते. मात्र, परीक्षेपूर्वीच या तिन्ही विषयांच्या प्रश्नपत्रिका एका चॅनेलवर जाहीर झाल्यामुळे खळबळ उडाली आहे. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मूल्यमापन प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# ठाणे-कल्याणकरांचा प्रवास अधिक सुसाट

## १८ हजार कोटींच्या मेट्रो-५ अ प्रकल्पाला मंजुरी

### तीन नवीन महामार्गांना मुख्यमंत्र्यांचा हिरवा कंदील

### पायाभूत सुविधांसाठी राज्याची तिजोरी खुली

**मुंबई (प्रतिनिधी) :**

राज्याच्या पायाभूत सुविधांना वेग देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना हिरवा कंदील दाखवला. मंत्रालयात झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा विकास समितीच्या बैठकीत, मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ (टप्पा १ आणि २) च्या १८,१३०.५५ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे ठाणे, भिवंडी आणि कल्याण-उल्हासनगर परिसरातील प्रवाशांचा प्रवास अधिक वेगवान होणार आहे.

मुख्यमंत्र्यांनी विदर्भातील कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर या तीन द्रुतगती महामार्गांच्या भूसंपादनासाठी 'हुडको'कडून कर्ज घेण्यासही मान्यता दिली. तसेच, नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या तयारीसाठी दुसऱ्या टप्प्यातील १०६३ कोटी रुपयांच्या विकासकामांनाही मंजुरी दिली.

या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्यासह मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते. या प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून आवश्यक परवानग्या मिळवण्याची कार्यवाही जलद गतीने करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.



**६ वर्षांत महामार्ग पूर्ण करण्याचे लक्ष्य**

- प्रकल्पाचे वेळापत्रक, निविदा प्रक्रिया आणि पूर्णतेचा कालावधी त्वरित निश्चित करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश.
- भूसंपादनासाठी लागणारा निधी 'हुडको'कडून कर्ज स्वरूपात घेण्यासाठी वित्त विभागाशी समन्वय.

**प्रकल्पांची व्याप्ती आणि गुंतवणूक :**

- नागपूर-गोंदिया (१६२.५ कि.मी.): प्रकल्पाची एकूण किंमत ११९,५८२ कोटी. भूसंपादनासाठी १३,१६२ कोटी मंजूर.
- नागपूर-चंद्रपूर (२०४.७ कि.मी.): भूसंपादनासाठी १२,३५३ कोटींच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता.
- भंडारा-गडचिरोली (९४.२ कि.मी.): भूसंपादनासाठी १९३१ कोटींची तरतूद.
- विदर्भातील उद्योग, व्यापार आणि दळणवळणाला गती देऊन विकासाचा बॅकलॉग भरून काढणे.

**सिंहस्थ कुंभमेळ्या कोटींची तरतूद**

- वाहनतळ, अखंडित पाणीपुरवठा, वीज आणि घनकचरा व्यवस्थापनासाठी रु.१०६३ कोटींची विशेष तरतूद.
- सुरक्षेसाठी आणि समन्वयासाठी अद्ययावत मुख्य नियंत्रण कक्ष उभारला जाणार.
- कुंभमेळ्यासाठी विशेष आरोग्य विभाग आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधांचे नियोजन.
- सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाला सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश.

# 'प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजने'ला मुदतवाढ

### केंद्राकडून १ हजार २५० कोटींचा निधी मंजूर



**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

देशातील मत्स्यपालन क्षेत्राचा कायापालट करणाऱ्या आणि 'नील क्रांती'ला बळ देणाऱ्या 'प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजने'ला केंद्र सरकारने ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत तात्पुरती मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रासह देशातील लाखो मच्छिमार आणि मत्स्य व्यावसायिकांना मोठा आधार मिळाला असून, या कालावधीसाठी १,२५० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीला प्रशासकीय मान्यताही देण्यात आली आहे.

भारत सरकारच्या मत्स्यपालन मंत्रालयाचे सहायक आयुक्त जी. रामकृष्ण राव यांनी २२ एप्रिल २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी केले. 'पीएमएमएसवाय' योजनेचा दुसरा टप्पा सध्या मंजुरीच्या प्रक्रियेत आहे. १६ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार या दुसऱ्या टप्प्याला तांत्रिक मान्यता मिळेपर्यंत योजनेत खंड पडू नये, या उद्देशाने केंद्र सरकारने ही सहा महिन्यांची मुदतवाढ दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १२ जून २०२० रोजी २०,०५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे उद्दिष्ट ठेवून ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली होती.

**रखडलेल्या प्रकल्पांना गती**

मुदतवाढीमुळे राज्यातील मत्स्यव्यवसाय विभागाला प्रलंबित कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध होईल. महाराष्ट्रातील विस्तीर्ण सागरी किनारपट्टी आणि गोड्या पाण्यातील मत्स्यशेतीला या निर्णयामुळे मोठी उभारी मिळेल. केंद्राच्या आदेशाची प्रत राज्याच्या मत्स्यपालन आयुक्तांना (तारापोरवाला मत्स्यालय) प्राप्त झाली असून, अंमलबजावणीला वेग येणार आहे.

**केंद्राची 'कडक' नियमावली**

- सर्व आर्थिक व्यवहार केवळ पीएफएमएस आणि डीबीटी द्वारेच करणे बंधनकारक.
- संस्थांना खर्चाच्या नोंदीसाठी 'ईटी' मॉड्यूल वापरणे अनिवार्य असेल.
- डिजिटल स्वरूपात नसलेली उपयोगिता प्रमाणपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.
- मुदतवाढीच्या काळात खर्चाचे निकष १५ व्या वित्त आयोगाच्या नियमांनुसारच राहतील.

## युद्धात उद्ध्वस्त झालेल्या ७७५ शाळांची दुरुस्ती पूर्ण

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

अमेरिका आणि इस्रायलच्या ४० दिवसांच्या हवाई हल्ल्यांनी होरपळलेल्या इराणमध्ये आता जनजीवन पुन्हा पूर्वपदावर आणण्यासाठी वेगाने पावले उचलली जात आहेत. या संघर्षात शिक्षण व्यवस्थेचे मोठे नुकसान झाले असून, उद्ध्वस्त झालेल्या शाळांच्या पुनर्बांधणीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. शिक्षणमंत्री अलीरेजा काझेमी यांनी दिलेल्या माहितीनुसार, बाधित १,३०० शाळांपैकी ७७५ शाळांची दुरुस्ती यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे.

अहवालानुसार, तेहरान, केरमानशाह, इस्फहान आणि होर्मोजगान या प्रांतांना युद्धाचा सर्वाधिक फटका बसला. या संघर्षात २० शाळा पूर्णपणे मातीमोल झाल्या आहेत. विशेषतः मिनाब येथील 'शजराह तय्यबा' प्राथमिक शाळेवर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात १७० जणांचा मृत्यू झाला होता, ज्यात बहुतांश विद्यार्थिनी आणि शिक्षकांचा समावेश होता. या मृतांना श्रद्धांजली वाहण्यासाठी देशभरातील शाळांमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

शाळांच्या इमारतींचे नुकसान झाले असले तरी विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये, यासाठी सरकारने पर्यायी व्यवस्था केली आहे. अनेक ठिकाणी ऑफलाईन तर काही ठिकाणी 'इराणी टेलिव्हिजन स्कूल'च्या माध्यमातून ऑनलाईन वर्ग सुरू ठेवण्यात आले आहेत. ऑक्टोबरपर्यंत सर्व गंभीररीत्या नुकसान झालेल्या शाळांची दुरुस्ती पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## मणिपूरमध्ये ५८ हजार लोक घरापासून दूर

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

मणिपूरमध्ये गेल्या वर्षभरापासून सुरू असलेल्या वांशिक हिंसाचाराची भीषणता आता अधिकृत आकडेवारीतून समोर आली आहे. ३ मे २०२३ पासून सुरू झालेल्या या संघर्षात आतापर्यंत ५८,८२१ नागरिक विस्थापित झाले असून, २१७ जणांना आपला जीव गमवावा लागला असल्याची माहिती राज्य सरकारच्या गृह विभागाने दिली आहे.

काँग्रेसचे नेते हरेश्वर गोस्वामी यांनी विस्थापित आणि मृतांच्या आकडेवारीबाबत माहिती अधिकारात अर्ज दाखल केला होता. सात महिन्यांच्या पाठपुराव्यानंतर गृह विभागाने ही माहिती दिली. या माहितीनुसार, ३० मार्च २०२४ पर्यंत ५८ हजारांहून अधिक लोक आपल्या हक्काच्या घरापासून दूर झाले आहेत. तर ५८,८२१ नागरिक सध्या हलाखीच्या परिस्थितीत जगत असून त्यांच्यासाठी १७४ मदत शिबिरे सुरू आहेत. हिंसाचारात तब्बल ७,८९४ कायमस्वरूपी घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून, २,६४६ घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. दरम्यान मृतांचा आकडा २१७ इतका नोंदवण्यात आला आहे, ज्यांच्या वारसांना सरकारने सानुग्रह अनुदान दिले आहे. विस्थापितांसाठी मणिपूर पोलीस हाऊसिंग कॉर्पोरेशनने केवळ ३,००० प्री-फॅब्रिकेटेड घरे बांधली आहेत, जी विस्थापितांच्या संख्येच्या तुलनेत अत्यंत कमी आहेत. या निकालावर प्रतिक्रिया देताना हरेश्वर गोस्वामी यांनी संताप व्यक्त केला. "विस्थापित झालेल्या आपल्याच नागरिकांची माहिती मिळवण्यासाठी ७ महिने झुंजावे लागते, ," अशी टीका त्यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे केली आहे.

## नवरदेवाने लग्नाचे विधी थांबवून नवरीला नेले परीक्षा केंद्रावर



**हमीरपूर (वृत्तसंस्था):**

उत्तर प्रदेशातील हमीरपूर जिल्ह्यात लग्नमंडपात विवाहाचे विधी सुरू असताना, नवरदेवाने स्वतः पुढाकार घेऊन लग्नाचे विधी मध्येच थांबवले आणि आपल्या होणाऱ्या पत्नीला परीक्षा केंद्रावर नेऊन तिची पदवीची परीक्षा पूर्ण करून आणली. या घटनेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

महेंद्र सिंह यांची कन्या अस्मिता हिचा विवाह बांदा येथील रहिवासी शैलेंद्र सिंह यांच्याशी ठरला होता. मंगळवारी पहाटे ६ वाजता लग्नमंडपात सप्तपदी आणि इतर महत्त्वाचे विधी सुरू होते. मात्र, त्याच दिवशी सकाळी ७:३० वाजता अस्मिताची 'बीएससी' सहाव्या सेमिस्टरची वनस्पती शास्त्राची परीक्षा होती.

अस्मिताला तिचे शिक्षण अर्धवट सोडायचे नव्हते. ही बाब जेव्हा नवरदेव शैलेंद्रला समजली, तेव्हा त्याने तात्काळ लग्नाचे विधी थांबवण्याचा निर्णय घेतला. नवरीला सजलेल्या कपड्यांतच (लग्नाच्या पेहरावात) शैलेंद्रने स्वतः सरस्वती विद्यापीठ महाविद्यालय, मौदहा येथील परीक्षा केंद्रावर नेले. सकाळी ७:३० ते ९:३० या वेळेत अस्मिताने परीक्षा दिली आणि त्यानंतर पुन्हा गेस्ट हाऊसवर येऊन लग्नाचे उर्वरित विधी पूर्ण केले. लग्नाच्या पोशाखात परीक्षा केंद्रावर पोहोचलेल्या अस्मिताला पाहून इतर परीक्षार्थी आणि शिक्षक अवाक झाले. शिक्षणाप्रती तिची ही जिद्द पाहून महाविद्यालय प्रशासनाचे संचालक अनिल द्विवेदी यांनी अस्मिताचा पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन विशेष सन्मान केला.

**शिक्षण हीच पहिली प्राथमिकता**

"लग्नामुळे पत्नीची परीक्षा चुकू नये, असे मला वाटले. जर पाठवणी (विदाई) झाली असती, तर तिची परीक्षा सुटली असती," अशी प्रतिक्रिया नवरदेव शैलेंद्रने दिली. अस्मिताच्या या धाडसी निर्णयाला तिच्या सासरच्या मंडळींनीही पूर्ण पाठिंबा दिला, ज्यामुळे या लग्नाची चर्चा आता संपूर्ण उत्तर प्रदेशात होत आहे.

## शाळांमध्ये दर तासाला 'वॉटर बेल' अनिवार्य

**नवी दिल्ली :** देशाची राजधानी दिल्ली सध्या भीषण उष्णतेच्या लाटेने होरपळत आहे. वाढत्या तापमानाचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी दिल्ली सरकारने सरकारी आणि सर्व खासगी शाळांसाठी कडक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यामध्ये 'वॉटर बेल' आणि 'बडी सिस्टीम' सारखे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. आता शाळांमध्ये दर ४५ ते ६० मिनिटांनी एक विशेष घंटा (वॉटर बेल) वाजवली जाईल. ही घंटा वाजताच सर्व विद्यार्थ्यांना पाणी पिण्यासाठी वेळ दिला जाईल, जेणेकरून त्यांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकून राहील. वर्गातील दोन विद्यार्थ्यांना एकमेकांचे 'बडी' (मित्र) म्हणून नियुक्त केले जाईल.

## मुंबई-रिवा विशेष रेल्वे धावणार नियमित

### आजपासून नवीन वेळापत्रक लागू

**मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबई आणि रिवा दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांची सोय लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने एक मोठा निर्णय घेतला आहे. गेल्या काही काळापासून विशेष गाडी म्हणून धावणारी 'रिवा – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – रिवा' ही साप्ताहिक गाडी आता कायमस्वरूपी नियमित करण्यात आली आहे. या गाडीचे रूपांतर आता 'सुपरफास्ट एक्सप्रेस'मध्ये करण्यात आले असून, यामुळे हजारो प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ आणि निश्चित होणार आहे.

नियमित सेवेत रूपांतर झाल्यानंतर या गाड्या नवीन क्रमांकासह धावतील. प्रवाशांनी तिकीट बुकिंग करताना या बदलाची नोंद घेणे आवश्यक आहे.

गाडी क्र. २०१५४ ही गुरुवारपासून ही गाडी दर दुपारी १५:५० वाजता रिवा येथून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२:२० वाजता मुंबईला (सीएसएमटी) पोहोचेल. गाडी क्र. २०१५३ ही दर शुक्रवारी दुपारी १३:३० वाजता मुंबईहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०९:४५ वाजता रिवा येथे पोहोचेल.

नियमित सेवा सुरू झाल्यामुळे जुन्या विशेष गाड्यांच्या फेऱ्या बंद करण्यात येणार आहेत. गाडी क्रमांक ०२१८७ (रिवा-मुंबई) गुरुवारपासून आणि गाडी क्रमांक ०२१८८ (मुंबई-रिवा) शुक्रवारपासून बंद होईल.

या प्रवासात ही गाडी दादर, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, खंडवा, इटारसी, जबलपूर आणि सतना यांसारख्या महत्त्वाच्या स्थानकांवर थांबेल. या सुपरफास्ट गाडीला एकूण २२ डबे असतील, ज्यामध्ये १ प्रथम वातानुकूलित , १ वातानुकूलित २-टियर, ४ वातानुकूलित ३-टियर, १२ स्लीपर आणि ४ जनरल डब्यांचा समावेश असेल.

प्रवाशांनी सविस्तर वेळापत्रकासाठी भारतीय रेल्वेच्या 'एनटीईएस' ॲप किंवा www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. तिकीट बुकिंगसाठी 'रेलवन' ॲपचा वापर करण्याचे आवाहन रेल्वेने केले आहे.




उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमुळे मुंबईच्या सीएसएमटी स्थानकावर जबलपूरला जाणाऱ्या गरीब रथ एक्सप्रेसमध्ये चढण्यासाठी प्रवाशांनी तुफान गर्दी. (छाया : अरुण पाटील)

# तरुणांना डेटिंग ॲप वापरण्यासाठी १२ हजार रुपयांचे अनुदान

### घटती लोकसंख्या रोखण्यासाठी जपानची अनोखी योजना

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**



एकीकडे भारतात 'डेटिंग ॲप'च्या नावाखाली तरुणांची आर्थिक फसवणूक होत असल्याच्या घटना समोर येत असताना, जपानने मात्र चक्क उलट पाऊल उचलले आहे. देशातील घटत्या जन्मदराचा सामना करण्यासाठी जपानमधील कोची प्रांताने एक अनोखी योजना सुरू केली असून, तरुणांनी डेटिंग ॲपचा वापर करावा यासाठी त्यांना वर्षाला २०,००० येन (सुमारे ११,७५२ भारतीय रुपये) अनुदान जाहीर केले आहे.

'कोची प्रीफेक्चर अपॉर्च्युनिटी फॉर मीटिंग सपोर्ट प्रोजेक्ट ग्रँट', या नावाने ही योजना सुरू करण्यात आली आहे.तरुणांनी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून विवाहबंधनात अडकून देशाचा जन्मदर वाढवावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

अनेक अधिकृत डेटिंग ॲप्स किंवा मॅट्रिमोनी संकेतस्थळांवर नाव नोंदवण्यासाठी किंवा प्रीमियम सबस्क्रिप्शन घेण्यासाठी शुल्क भरावे लागते. हे शुल्क आता सरकार भरणार आहे. १ एप्रिल २०२६ ते १० मार्च २०२७ या कालावधीत केलेल्या खर्चाची परतफेड सरकारमार्फत केली जाईल.

**लोकसंख्येचा दर का घसरला ? :** जपानची लोकसंख्या सातत्याने घसरत आहे. फेब्रुवारी महिन्यात आरोग्य विभागाने जाहिर केलेल्या आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये जपानचा जन्मदर ७,०५,८०९ ने घसरला. १८९९ नंतर ही सर्वात खालच्या स्तरावर पोहोचणारी धक्कादायक आकडेवारी सादर केली. जपान आणि विदेशी नागरिक यांच्यातील जन्म दर मागच्या वर्षीच्या तुलनेत २.१ टक्क्यांनी घसरला. जपान हा वेगाने वृद्ध होणारा जगातील एक प्रमुख देश आहे. २०२४ मध्ये जपानमध्ये ६५ किंवा त्याहून अधिक वय असलेल्या नागरिकांची संख्या ३६.२५ दशलक्षांवर पोहोचली. एकूण लोकसंख्येत हे प्रमाण २९.३ टक्के एवढे आहे.

**लोकसंख्या कमी होण्याची कारणे काय ? :** लोकसंख्या कमी होण्यामागे विविध कारणे असल्याचे सांगितले जाते. आर्थिक दबाव आणि बदललेला सामाजिक दृष्टीकोन यासाठी जबाबदार असल्याचे बोलले जाते. राहणीमानाचा खर्च वाढल्यामुळे जोडप्यांना आर्थिक स्थैर्याचा प्रश्न सतावत आहे. त्यामुळेच अनेक अविवाहित तरुण लग्न आणि कुटुंब विस्तारापासून लांब राहणे पसंत करतात.

## जगातील उष्ण शहरांच्या यादीत १९ शहरे भारताची !

### तापमानाचा पारा ४४ अंशांवर

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

एप्रिल महिन्यातच भारताला सूर्याच्या प्रखर झळा सोसाव्या लागत असून देशात उष्णतेची भीषण लाट पसरली आहे. 'एक्वावेदर'च्या ताज्या आकडेवारीनुसार, जगातील २० सर्वात उष्ण शहरांच्या यादीत तब्बल १९ शहरे एकट्या भारतामधील आहेत. या यादीत बिहारमधील भागलपूर, ओडिशातील तालचेर आणि बंगालमधील आसनसोल ४४ अंश सेल्सिअस तापमानासह अव्वल स्थानी आहेत.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार, २२ ते २४ एप्रिल या काळात उष्णतेची ही लाट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. अनेक शहरांमध्ये तापमान ४३ ते ४४ अंश सेल्सिअसच्या दरम्यान पोहोचले असून, सामान्य मर्यादेपेक्षा हे तापमान खूपच जास्त आहे.

बिहार, ओडिशा, बंगाल आणि उत्तर प्रदेश या राज्यांना या उष्णतेचा सर्वाधिक फटका बसला आहे. तज्ज्ञांच्या मते, यावेळची उष्णता सामान्य नसून ती हवामान बदलाचा गंभीर संकेत आहे. एप्रिलमध्ये सूर्याची किरणे थेट जमिनीवर पडत असून ढगाळ हवामान नसल्यामुळे जमीन वेगाने तापत आहे. त्यातच प्रशांत महासागराच्या तापमानातील बदलामुळे (एल निनो प्रभाव) थंडावा देणारे वारे कमकुवत झाले आहेत. जेव्हा तापमान ४० अंशांच्या पुढे जाते, तेव्हा त्याला 'हीटवेव्ह' मानले जाते. या परिस्थितीत उष्माघाताचा धोका वाढतो.

नागरिकांनी दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे टाळावे आणि जास्तीत जास्त पाणी पिऊन स्वतःला हायड्रेटेड ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**सर्वात उष्ण ठिकाणांची यादी (तापमान ४३-४४ डिग्री सेल्सिअस):**

- **बिहार :** भागलपूर, बेगुसराय, मोतिहारी, मुंगेर, भोजपूर, सिवान, बेटिया.
- **पश्चिम बंगाल :** आसनसोल, दुर्गापूर, पश्चिम मिदनापूर, बीरभूम, कुल्टी, बांकुडा, राणीगंज.
- **ओडिशा :** तालचेर, बलांगीर.
- **उत्तर प्रदेश :** गोरखपूर, वाराणसी.
- **झारखंड :** डालटेनगंज

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# संगाबा अमरावती विद्यापीठाच्या उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार-२०२६ वादात

## निकषांवर प्रश्नचिन्ह, पारदर्शकतेच्या मागणीसाठी प्रा. डॉ. प्रमोद गारोडे यांची राज्यपालांकडे धाव
## १ मे चा शिक्षक गटातील पुरस्कार वितरण सोहळा स्थगित करण्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार-२०२६ संदर्भात वाद निर्माण झाला असून, या निवडीवर हरकत घेत प्रा. डॉ. प्रमोद गारोडे यांनी थेट कुलपती तथा महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. तसेच १ मे रोजी होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्याला स्थगिती देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

२१ एप्रिल २०२६ रोजी विद्यापीठाकडून उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. महाविद्यालयीन संवर्गातील शिक्षक गटासाठी प्रा. डॉ. नंदकिशोर गव्हाळे यांची निवड करण्यात आली आहे. मात्र, या निवडीवर प्रा. डॉ. गारोडे यांनी तीव्र आक्षेप





नोंदवला आहे.प्रा. डॉ. गारोडे यांच्या मते, त्यांनी सदर पुरस्काराकरीता सादर केलेला प्रस्ताव अत्यंत गुणवत्तापूर्ण असून त्यांनी विद्यापीठाच्या विविध समित्यांवर काम केले आहे. त्यांची ४६ पुस्तके प्रकाशित झाली असून एम.ए. मराठी अभ्यासक्रमात त्यांच्या चार ग्रंथांचा संदर्भ म्हणून समावेश आहे. तसेच बी.ए. व बी.एस्सी. अभ्यासक्रमातही त्यांच्या साहित्याचा समावेश आहे. मानव संसाधन मंत्रालयाच्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी त्यांचे नाव दोन वेळा शॉर्टलिस्ट झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. डॉ. गव्हाळे यांची निवड ही एका व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्याशी असलेल्या नातेसंबंधामुळे प्रभावित झाल्याचा तीव्र संशय प्रा. डॉ. गारोडे यांनी व्यक्त केला आहे. तसेच पुरस्कारासाठी सामाजिक कार्याचा आव आणून दिलेल्या बातम्या महत्वाच्या नसून प्राध्यापकांचे त्याच्या शैक्षणिक जीवनात विद्यार्थी व समाजामध्ये सातत्यपूर्ण कामाचा गौरव होणे अपेक्षित आहे. त्यामुळे निवड प्रक्रियेची निष्पक्षता आणि पारदर्शकता यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून गुणवत्ता डावल्या गेली असल्याचे स्पष्ट दिसून येते.

**शिक्षण क्षेत्राच्या पवित्रतेवर प्रश्न**

शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात कार्य करणाऱ्या संत गाडगे बाबा यांचे नांव असलेल्या अमरावती विद्यापीठाकडून अशाप्रकारचे अन्यायपूर्ण व अपारदर्शक आणि गुणवत्ता डावलून काम होत असल्याचे बोलले जात असल्याने शिक्षक वर्गात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. संत गाडगे बाबांच्या नावाशी निगडित असलेल्या संस्थेकडून अशा प्रकारच्या तक्रारी समोर येणे चिंताजनक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, उत्कृष्ट सेवा गौरव समिती ही कोणत्या ठोस निकषांवर गुणांकन करते, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती समोर येत नसल्याची बाबही पुढे आली आहे. पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना गुणदानाची पद्धत, मूल्यांकनाचे निकष आणि त्यातील पारदर्शकता याबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध नसल्याची चर्चा आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमावी, तसेच चौकशी अहवाल येईपर्यंत १ मे २०२६ रोजी होणारा शिक्षक गटातील पुरस्कार वितरण सोहळा स्थगित ठेवावा, अशी मागणी प्रा. डॉ. गारोडे यांनी केली आहे.शिक्षण क्षेत्रात पारदर्शकता आणि गुणवत्ता यांना प्राधान्य मिळावे, यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी सर्वांकडून अपेक्षा व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त

### गज़लरत्न डॉ. राजेश उमाळे आकाशवाणीवर



**अमरावती-**प्रख्यात गायक आणि संगीतकार गज़लरत्न डॉ. राजेश उमाळे यांची 'जीवनप्रवास, शिक्षण आणि संगीत' या विषयावरील मुलाखत रविवार २६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता अमरावती आकाशवाणीवरून प्रसारित होणार आहे. विविधा या मालिकेत 'लोकजागर' या लोकप्रिय कार्यक्रमातून डॉ. उमाळे श्रोत्यांशी संवाद साधतील. तर 'चित्रपट, गज़ल आणि विशेष योगदान' या विषयावर डॉ. राजेश उमाळे यांच्या मुलाखतीचा दुसरा भाग रविवारी ३ मे रोजी सकाळी १० वाजता प्रसारित होणार आहे. आकाशवाणीचे नैमित्तिक उद्घोषक स्नेहल ठाकरे त्यांच्याशी दोन्ही भागांत संवाद साधतील. तर कार्यक्रमाचे सादरकर्ते आशिष गावंडे आहेत.डॉ. राजेश उमाळे हे दर्यापूर येथील जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयात संगीत विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत असून देशभरात तसेच दुबई, ओमान, मस्कत आणि अबुधाबी अशा देशात त्यांनी आजवर ७०० च्यावर संगीत मैफिली सादर केल्या आहेत. 'गणू' या चित्रपटाचे संगीतकार असलेल्या राजेश उमाळे यांच्या संगीत दिग्दर्शनात सुरेश वाडकर, उत्तरा केळकर, साधना सरगम, स्वप्नील बांदोडकर, ऋषिकेश रानडे, आदर्श शिंदे अशा सुप्रसिद्ध गायकांनी गाणी गायली आहेत. मुलाखतीचा आस्वाद घेण्याचे आवाहन अमरावती आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे आणि कार्यक्रम प्रमुख भय्यालाल टेकाम यांनी केले आहे.

### आदिवासी विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळेत प्रवेशाबाबत सूचना

**अमरावती-** धारणी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमातील नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता पहिलीमध्ये (सन २०२६-२७) प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक पालकांना २७ एप्रिल २०२६ पासून प्रकल्प कार्यालय धारणी तसेच त्याअंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय आश्रमशाळांमध्ये विनामूल्य अर्ज उपलब्ध होणार आहेत. प्रकल्प कार्यालयाद्वारे पात्र विद्यार्थ्यांची निवड करून वरिष्ठ कार्यालयाच्या मंजुरीनंतर निश्चित शाळांमध्ये प्रवेश दिला जाणार आह, असे प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी सिध्दार्थ शुक्ला यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक असून, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपर्यंत असावे. विद्यार्थ्याचे वय किमान ६ वर्षे पूर्ण असणे गरजेचे आहे. अर्जासोबत जातीचा दाखला, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, आधारकार्ड, वैद्यकीय प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. निवासी शाळांमध्ये प्रवेशासाठी दारिद्र्यरेषेखालील, आदिम जमातीतील तसेच विधवा, घटस्फोटीत किंवा निराधार पालकांच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे. प्रवेश अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३० मे २०२६ असून, त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अपूर्ण किंवा चुकीची माहिती दिल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना एकदा शाळा निश्चित झाल्यानंतर शाळा बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. त्यामुळे पात्र पालकांनी सर्व अटी व शर्ती पूर्ण करून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज वेळेत सादर करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी शुक्ला यांनी केले आहे.


### महिला भजन मंडळाला साउंड सिस्टीम व भजन साहित्य भेट



**नांदगाव पेठ-** ग्रामीण संस्कृतीची ओळख असलेल्या भजन परंपरेला बळ देत महिलांच्या सशक्तीकरणासाठी स्व. सौ. हिराबाई तुळशीरामजी गुल्हाने चॅरीटेबल ट्रस्टने कापुसतळणी येथे उल्लेखनीय उपक्रम राबवला. जेष्ठ गौरी महिला भजन मंडळीस साऊंड सिस्टीमसह भजनासाठी आवश्यक साहित्य भेट देण्यात आले.या कार्यक्रमात ट्रस्टचे अध्यक्ष तथा भाजप जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने, मनीषा गुल्हाने, भाजप तालुकाध्यक्ष विरेंद्र लंगडे, माजी जि.प. सदस्य भारती गेडाम, स्वाती नाकाडे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक साहित्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला जेष्ठ गौरी महिला भजन मंडळातील ज्योती पोहोकार, कांचन खराटे, शिंधु धोटे, प्रविणा धोटे, रजनी धोटे, सुवर्णा धोटे, अल्का धोटे, सुनंदा पोलाड, मुक्ता राऊत, प्रतिभा धोटे, सोनू धोटे, कोकिळा खेडकर, रेश्मा वानखडे यांसह अनेक महिला मोठ्या उत्साहात उपस्थित होत्या. तसेच गावातील अनेक कार्यकर्त्यांनीही मोठ्या संख्येने हजेरी लावून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यावेळी बोलताना विवेक गुल्हाने म्हणाले की, 'भजन मंडळे ही केवळ धार्मिक परंपरा नसून समाज एकत्र ठेवणारी शक्ती आहेत. महिलांना व्यासपीठ मिळाले तर त्या संस्कृती जपण्याबरोबरच समाज घडवण्याचेही कार्य करतात. अशा उपक्रमांद्वारे महिलांच्या कर्तृत्वाला नवी दिशा देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे त यावेळी म्हणाले. उपक्रमाला तुळशीदास धोटे, चेतन ठाकरे, उमेश धोटे, सागर खराटे, विजय झटाले, त्रिशूल भुयार, विजय धोटे, प्रभारकर ठाकरे, अंकुश पोलाड, पुरुषोत्तम धोटे, सुनील पोहोकार, गौरव धोटे, महादेव खेडकर, रुपेश ओकटे, प्रफुल ठाकरे, प्रलाद धोटे, पद्माकर धोटे, मिथुन ठाकरे, निलेश राऊत,स्वप्नील खरीपकार, देवानंद चवधरी, प्रतीक ठाकरे, वृषाल खेडकर, सुधीर खेडकर, अक्षय धोटे,दिनेश खरीपकार, विक्रम धोटे,स्वप्नील धोटे, रोशन धोटे, दर्शन धोटे, दिनकर धोटे, सुरेश धोटे, प्रशांत धोटे, क्रिष्णा कितुकले, सुभाष पोहोकार, अमोल डवरे, पुरुषोत्तम हागे , इत्यादी महिला व पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रा.डॉ.नितीन गुल्हाने यांना सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार

**अमरावती/का.प्र**



मुंबईतील नामवंत 'वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट'या संस्थेच्या १३९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा 'सर्वोत्कृष्ट शिक्षक'हा मानाचा पुरस्कार डॉ.नितीन परशराम गुल्हाने यांना प्रदान करण्यात आला.

त्याचप्रमाणे युरोपियन रिसर्च फाउंडेशनच्या आयोजन समितीतर्फे, ११ एप्रिल २०२६ रोजी पोर्तो, पोर्तुगाल येथे आयोजित ICEEEP २०२६ आंतरराष्ट्रीय परिषदेत सर्वोत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण सादरीकरणाबद्दल प्रा.नितीन परशराम गुल्हाने यांना आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संशोधनातील त्यांच्या उत्कृष्टतेच्या आधारावर, डॉ. गुल्हाने यांना पोलंडमधील क्राको युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी येथे व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे आणि आता ते व्हीजेटीआय मुंबईच्या वतीने प्रतिनिधित्व करत आहेत. प्रा. नितीन हे जिल्हा परिषद सेवानिवृत्त शिक्षक परशराम आणि मालती गुल्हाने यांचे ज्येष्ठ पुत्र आहेत. व्हीजेटीआयचे संचालक प्रा. सचिन कोरे यांचे सहकार्य आणि आई-वडीलच्या आशीर्वादाने हे शक्य झाले आहे, असे मानद आमंत्रित अभ्यागत प्राध्यापक (आंतरराष्ट्रीय) डॉ. गुल्हाने यांनी सांगितले.

## मे वेतनासाठी ई-केवायसी बंधनकारक

### शिक्षकांनी तातडीने प्रक्रिया पूर्ण करावी
### महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

राज्य शासनाच्या वित्त विभागाच्या आदेशानुसार शालार्थ प्रणालीतून वेतन घेणाऱ्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी बँक खात्याची ई-केवायसी (ए-घधउ) प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यास मे महिन्याचे वेतन रोखले जाण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शिक्षकांना तातडीचे आवाहन केले आहे.

राज्य शासनाच्या २७ मार्च २०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार शासकीय, निमशासकीय व अनुदानित संस्थांमधील सर्व कर्मचाऱ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. मात्र,अनेक शिक्षकांना ही प्रक्रिया करताना तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी पुढे आल्याने शिक्षक समितीने सविस्तर मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. प्रक्रियेबाबत महत्त्वाचे मार्गदर्शन शिक्षकांनी सर्वप्रथम आपले आधार कार्ड कोणत्या बँक खात्याशी 'सीड' आहे किंवा आधारच्या अधिकृत संकेतस्थळावर तपासावे. जर आधार सीडिंग पगार खात्याशीच असेल, तर स्वतंत्र ऑनलाइन प्रक्रिया करण्याची गरज नसून केवळ ई-केवायसी फॉर्म भरून बँक शाखेतून प्रमाणित करून घ्यावा.

मात्र, आधार दुसऱ्या बँक खात्याशी लिंक असल्यास पोर्टलवर निवडून पगार खाते अपडेट करणे आवश्यक आहे. तसेच आधारवरील नाव किंवा इतर तपशीलात तफावत असल्यास संबंधित बँकेशी संपर्क साधून आवश्यक दुरुस्ती करून घ्यावी.तांत्रिक अडचणींमुळे शिक्षकांना वेतनापासून वंचित राहावे लागू नये, यासाठीच ही माहिती प्रसारित करण्यात येत आहे. सर्व शिक्षकांनी वेळेत ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करून सहकार्य करावे, असे आवाहन समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे व राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी केले आहे.राज्य प्राथमिकशिक्षक समिती दरम्यान, या मार्गदर्शक सूचनांमुळे ई-केवायसी प्रक्रियेबाबत गोंधळलेल्या शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला असून,विदर्भ विभागात ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी हालचाली सुरू झाल्याची माहीती राज्य प्रसिद्धीप्रमुख राजेश सावरकर यांनी दिली.

## ग्राहक हक्कांसाठी अमरावती सज्ज

### अ.भा.ग्राहक कल्याण परिषदेची महानगर कार्यकारिणी नियुक्त

**अमरावती/का.प्र.**

अ.भा.ग्राहक कल्याण परिषद, अमरावती महानगर कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक संत नरहरी मंगल कार्यालय येथे उत्साहात पार पडली. राज्य अध्यक्ष गजानन मुदगल, राज्य कार्याध्यक्ष निलेश टवलारे व राज्य सचिव ॲड. प्रभाकर वानखडे यांच्या नेतृत्वात ही बैठक पार पडून नव्या कार्यकारिणीच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

बैठकीत नव्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र व माय-कार्ड प्रदान करण्यात आले तसेच त्यांच्या जबाबदाऱ्यांची सोपवणूक करण्यात आली.महानगर अध्यक्ष म्हणून रोहन ढोमणे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यकारणीची रचना करण्यात आली आहे.



उपाध्यक्ष म्हणून हर्षद बोबडे, महानगर सेक्रेटरी म्हणून अभिजीत काळे, महानगर कार्याध्यक्ष म्हणून ऋषिकेश तेलकर, महानगर संघटक म्हणून अविनाश पुनसे यांची निवड करण्यात आली. तसेच कार्यकारणी सदस्य म्हणून मनोज सावरकर व केवल बंग यांचा समावेश करण्यात आला आहे.

याचबरोबर बडनेरा अध्यक्ष म्हणून संजय बीसने(संस्थापक-स्वराज्य ढोल पथक), महिला विंगमध्ये अर्चना मावळे (झोन अध्यक्ष, बडनेरा-अमरावती) आणि वरुड तालुका अध्यक्ष म्हणून तुषार डांगोरे यांचीही नियुक्ती करण्यात आली.यावेळी महानगर अध्यक्ष रोहन ढोमणे यांनी अमरावतीमध्ये 'ग्राहक संरक्षण मिशन' राबविण्याचा महत्त्वपूर्ण संकल्प व्यक्त करत ग्राहकांच्या विविध समस्यांवर ठोस भूमिका मांडली. बँकांकडून होणारी जबरी वसुली, रुग्णालयांमधील वाढीव व अवाजवी बिलिंग, तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.ग्राहकांवर अन्याय करणाऱ्यांविरोधात कायदेशीर मार्गाने ठोस कारवाई करून त्यांना धडा शिकवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या बैठकीत ग्राहक हक्क संरक्षण, जनजागृती अभियान, तसेच आगामी उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नव्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.संपूर्ण कार्यक्रम रोहन ढोमणे यांच्या नेतृत्वात यशस्वीरीत्या पार पडला.

## शबरी आवास योजनेचे शेकडो प्रस्ताव धूळखात

### विविध समस्या नगराध्यक्षांनी मांडल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात



**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

नगर पंचायत अंतर्गत शासनाच्या शबरी आवास योजने अंतर्गत घरकुलाचे शेकडो प्रस्ताव धारणी प्रकल्प कार्यालयाकडे दोन वर्षांपासून प्रलंबित असून शहराच्या नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांनी लाभार्थ्यांसह जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन शबरी आवास योजनेच्या घरकुलासह विविध समस्यांकडे लक्ष वेधून याबाबतीत मागणीचे निवेदन सादर केले.

पारधी, आदिवासी समाजाकरिता शासनाच्या शबरी आवास योजने अंतर्गत नगर पंचायत मार्फत धारणी प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडे घरकुल मंजुरीचा संपूर्ण प्रस्ताव दोन वर्षांपूर्वी सादर केला आहे मात्र सदर प्रस्तावास अद्याप मान्यता मिळाली नसल्याने पारधी समाज व आदिवासी समाजाचे लाभार्थी घरकुला पासून वंचित आहे. सदर प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्यात यावी. तसेच शहरातील कचरा व्यवस्थापना करिता प्रस्तावित घनकचरा प्रकल्प निर्माण करणे, पंतप्रधान आवास योजनेचे लाभार्थी प्रलंबित असलेले अनुदान तात्काळ देण्यात यावे. विविध जागा मागणीचे प्रस्ताव हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानातील प्रस्तावित कामे, पर्यावरण, पर्यटन, जिल्हा वार्षिक नियोजनातील प्रस्तावित विकास कामे, रस्ते अनुदान,दलितोत्तर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती योजना इत्यादी कामाबाबत व विविध समस्यांबाबत जिल्हाधिकारी यांच्याशी नगराध्यक्ष सौ.प्राप्ती मारोटकर न.पं. गटनेते प्रकाश मारोटकर यांनी चर्चा करून विकास कामाचे प्रस्ताव मंजूर करण्याची मागणी केली यावेळी पारधी समाज संघटनेचे सूरज पवार बंटी भोसले उपस्थित होते.

## राष्ट्रसेविका समिति व श्रीमती नरसम्मा महाविद्यालयाद्वारे विदर्भ स्तरीय परिसंवादाचे आयोजन

### 'नारी ते नारायणी:विकसित भारत २०४७'


**अमरावती/का.प्र.**

राष्ट्र सेविका समिति, विदर्भ प्रांत व श्रीमती नरसम्मा महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार २६ एप्रिल २०२६ रोजी, गार्गी विचार कक्ष, श्रीमती नरसम्मा महा. किरण नगर, अमरावती येथे एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. 'नारी ते नारायणी: विकसित भारत २०४७' ह्या विषयावरील परिसंवादात संपूर्ण विदर्भातून मान्यवर, प्राध्यापिका, गृहिणी सहभागी होतील.

रविवार २६ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता परिसंवादाचे उद्घाटन होईल.



उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान चंद्रशेखरजी भोंदू, (अध्यक्ष, श्रीमती नरसम्मा शै. ट्रस्ट) हे भूषवतील. प्रमुख अतिथी डॉ. माधुरी चेंडके आहेत. या प्रसंगी आशुतोष अडोणी यांचे 'वर्तमान काळातील भारताची सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक परिस्थिती'




या विषयावर उद्बोधन लाभणार आहे.

दुस-या सत्रात एकूण ३ विषयांवर समांतर पॅनेल चर्चासत्रे होतील (१) कुटुंब ते राष्ट्रनिर्मिती (२) आधुनिक भारतातील महिला (३) समता ते सशक्तीकरण.तिसऱ्या सत्रात विकसित भारत २०४७ या विषयावर मुक्त संवाद होईल.

समारोपीय सत्र डॉ. राजेश चंदनपाट (प्राचार्य, श्रीमती नरसम्मा महा.) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होईल. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प. पू. रेणुकामाई (श्री नाथपीठ तथा सभाचार्य, विश्वमांगल्य सभा) यांची उपस्थिती लाभली आहे. मा. मनिषाजी संत (अ. भा. शारीरिक. प्रमुख रा.से. समिति) यांचे, 'विकसित भारत-२०४७' या विषयावर उद्बोधन होईल.

## 'वसा' संस्थेची अशीही भूतदया


**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील बेवारस भटकणाऱ्या, आजारी आणि अपघातग्रस्त मुक्या प्राण्यांची सेवा करण्यासाठी 'वसा' संस्थेने पुढाकार घेतला आहे. उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता वसा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दस्तुरनगरातील श्री गोरक्षण व्हेटर्नरी हॉस्पिटल आणि वसा ॲनिमल रेस्क्यू सेंटरमध्ये दाखल असलेल्या १९४ प्राण्यांसाठी कुलरची व्यवस्था केली आहे.

या रेस्क्यू सेंटरमध्ये सद्या अंध, अपंग आणि वृद्ध अशा २०० च्या जवळपास प्राण्यांचा सांभाळ केला जात आहे. वाढत्या तापमानामुळे या प्राण्यांना त्रास होऊ नये, यासाठी वसाने सोशल मीडियावरून मदतीचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत अचलपूर येथील तीर्थंकर युवा मंडळ आणि सकल जैन समाज यांनी १० कुलर दान केले आहेत. तसेच शहरातील इतर प्राणीप्रेमींनीही या उपक्रमात सहभाग नोंदविला आहे. प्राण्यांना हीट स्ट्रोकपासून वाचविण्यासाठी येथे विशेष खबरदारी घेतली जात आहे. प्राण्यांना वेळोवेळी अंघोळ घातली जाते. खाण्यापिण्यातही बदल करण्यात आला असून, श्वान आणि मांजरींना आठवड्यातून एकदा आईस्क्रीम दिले जाते.

# संधी की त्सुनामी?

**भारतीय स्वातंत्र्यानंतरची आठवी राष्ट्रीय जनगणना एप्रिल २०२६ मध्ये सुरू होते आहे. मुळात सन २०२१ मध्ये राष्ट्रीय जनगणना होणे अपेक्षित होते. पण कोविड-१९ महामारीमुळे जनगणना पुढे ढकलण्यात आली होती.**



केंद्रीय गृह मंत्रालयाअंतर्गत कार्यरत 'रजिस्ट्रार जनरल व सेन्सस कमिश्नर कार्यालय' या अर्ध-स्वायत्त संस्थेवर देशात जनगणना करवण्याची आणि त्याची आकडेवारी देशापुढे जाहीर करण्याची जबाबदारी असते. केंद्र व राज्य सरकारांच्या जवळजवळ सर्व योजना आखण्याकरिता राष्ट्रीय जनगणनेतून प्राप्त आकडेवारीचा आधार महत्त्वाचा असतो. असे असताना, कोविड-१९ नंतर, जनगणनेची प्रक्रिया सुरू होण्यास इतका प्रदीर्घ कालावधी का लागला, याचे अधिकृत स्पष्टीकरण अद्याप देण्यात आलेले नाही. या पाच वर्षांच्या काळात देशात लोकसभेची निवडणूक, सर्व राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका, बिहार व कर्नाटक सारख्या राज्यांत जात जनगणना आणि डझनभर राज्यांमध्ये निवडणूक आयोगाने राबवलेली मतदारयादी पुनर्निर्मितीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत, पण राष्ट्रीय जनगणना या सर्वांच्या नंतर होते आहे. राष्ट्रीय जनगणनेच्या आकडेवारीचे दूरगामी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिणाम अपेक्षित असल्यामुळेच त्यात झालेल्या दिरंगाईचे उत्तरदायित्व जबाबदार व्यक्ती/संस्थांनी स्वीकारणे आवश्यक आहे.

**राजकीय परिणाम व पडसाद**

राष्ट्रीय जनगणना वेळेत न होण्याचा तात्कालिक परिणाम हा लोकसभा व विधानसभांच्या पुनर्रचना (डिलिमिटेशन) प्रक्रियेवर होणार आहे. सन २०२१-२२ मध्ये अपेक्षित जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करत त्यानुसार सन २०२९ मधील लोकसभा निवडणूक होणार होती, पण आता जनगणनेची प्रक्रिया मार्च २०२७ पर्यंत चालणार आहे आणि त्यानंतर प्राथमिक आकडेवारी जाहीर होण्यास काही महिन्यांचा कालावधी लागू शकतो. म्हणजे सन २०२९च्या निवडणूक प्रक्रियेपूर्वी जनगणनेच्या नव्या आकड्यांनुसार मतदारसंघांची पुनर्रचना होणे कठीण आहे. यंदा होणारी मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रिया ही केवळ मतदारसंघांचे नकाशे बदलण्यापुरती मर्यादित नाही, तर या प्रक्रियेतून लोकसभा व राज्यांच्या विधानसभांच्या एकूण निर्वाचित मतदारसंघांची संख्या बदलणे अपेक्षित आहे.

सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी मोदी सरकारने घाईगर्दीत पारित केलेल्या महिला आरक्षण विधेयकाची अंमलबजावणी राष्ट्रीय जनगणनेनंतर होणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर होईल, अशी तरतूद त्या कायद्यातच करण्यात आली होती. याकरिता जनगणना वेळेत होणे गरजेचे होते. आता सन २०११च्या जनगणनेच्या आकड्यांनुसार लोकसभा व राज्यांच्या विधानसभांच्या जागांमध्ये मोठी वाढ करत ३३% महिला आरक्षण लागू करण्याचा घाट केंद्र सरकारने घातला आहे. ३३% महिला आरक्षणाची अंमलबजावणी अत्यावश्यक आहेच, पण नवी जनगणना होत असताना जुन्या जनगणनेच्या आकड्यांनुसार मतदारसंघांमध्ये वाढ करणे हे टीकेला व अनेक नव्या वादांना आमंत्रित करणारे ठरले आहे. थोडक्यात, पाच वर्षे जनगणना करणे टाळायचे, जनगणना सुरू होत असताना १५ वर्षांपूर्वीच्या आकडेवारीचा आधार घेत लोकसभा व राज्यांच्या विधानसभांच्या सदस्य रचनेत मोठे बदल करायचे, दोन दिवसांच्या संसदीय चर्चेने केलेले बदल तीन वर्षांनंतर (एप्रिल २०२९ पासून) लागू करायचे, ही केंद्र सरकारची कार्यपद्धती झाली आहे. सन २०२६-२७ ची जनगणना सुरू होण्यापूर्वीच त्या आकडेवारीनुसार अपेक्षित मतदारसंघ संख्येतील वाढ व पुर्नरचना हे उद्दिष्ट निकालात काढण्यात येत आहे.

**सामाजिक आणि आर्थिक परिणाम**

जनगणनेतून प्राप्त आकडेवारी ही देशाच्या सामाजिक स्वास्थ्याची आणि आर्थिक प्रगतीची सर्वाधिक विश्वासार्ह माहिती असते. जनगणनेत नोंद करण्याकरता कोणत्याही ओळखपत्राची गरज नसते. जनगणनेत नोंदवलेल्या माहितीची संपूर्ण गुप्तता राखणे कायद्याने बंधनकारक आहे. अगदी न्यायालयात देखील जनगणनेतील नोंद हे कुणा व्यक्तीविरुद्धचा पुरावा म्हणून सादर करता येत नाही. यंदाच्या जनगणनेतून प्राप्त आकडे हे १ मार्च २०२७ रोजीचे देशातील सामाजिक व आर्थिक स्थितीचे प्रमाण मानण्यात येतील. मोदी सरकारने सन २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे. याकरिता, सन २०२७ मध्ये हाती येणाऱ्या आकडेवारीनुसार पुढील दोन दशकांची धोरणे आखणे शक्य होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे, मागील १२ वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जाहीर केलेल्या व अंमलात आणलेल्या महत्त्वाकांक्षी धोरणांमुळे लोकांचे जीवनमान कितपत उंचावले हे जनगणनेच्या आकडेवारीतून पुरेसे स्पष्ट होऊ शकेल. उदाहरणार्थ, केंद्र सरकारने सन २०२२ पर्यंत प्रत्येक कुटुंबाला स्वतःचे पक्के घर उपलब्ध करून देण्याची घोषणा केली होती.

मागील जनगणनेनुसार भारतातील एकूण घरांपैकी ६१.१ टक्के घरे पक्की, २५.९ टक्के घरे कच्चीपक्की, आणि १२ टक्के घरे कच्ची होती. यापैकी, ५३ टक्के घरे राहण्याकरिता सुरक्षित व सुविधायुक्त, ४१ टक्के घरे सुरक्षित पण सुविधांचा अभाव असलेली, आणि पाच टक्के घरे पूर्णतः असुरक्षित होती. मागील दशकभरात यामध्ये कितपत सुधारणा झालेली आहे हे नव्या जनगणनेतून स्पष्ट होईल. घरात शौचालय, नळाद्वारे पाणी-पुरवठा, स्वयंपाकाकरता एलपीजी सिलिंडरचा वापर, घरागणिक इंटरनेट-मोबाईल-संगणक-टीव्ही-दुचाकी-चारचाकीची उपलब्धता याबाबतची वस्तुस्थिती नव्या आकडेवारीतून कळू शकेल. सन २००१ ते २०११ या काळात भारतातील साक्षरता ९.४ टक्क्यांनी वाढत ७४.०४ टक्के नोंदवण्यात आली होती. सन २०११ ते २०२७ या १६ वर्षांच्या काळात भारताच्या साक्षरता दरात भरघोस वाढ होणे अपेक्षित आहे कारण या १६ वर्षांमध्ये १४ वर्षांखालील मुलांकरिता मोफत व अनिवार्य शिक्षणाचा कायदा (आरटीई) लागू झालेला आहे. आरटीईची जर प्रभावी अंमलबजावणी होत असेल तर आज भारताचा साक्षरता दर ९० टक्क्यांच्या घरात असण्याची अपेक्षा गैर नाही.

**लोकसंख्या वाढीचे मुद्दे**

चीनला मागे टाकत भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश झाल्याची मान्यता आहे, पण भारताची नेमकी लोकसंख्या किती हे जनगणनेनंतर पुढील वर्षीच्या मध्यापर्यंत कळू शकेल. सन १९९१ ते २००१ दरम्यान भारताचा वार्षिक लोकसंख्या वाढीचा दर २१.५ टक्के होता, जो सन २००१ ते २०११ दरम्यान १७.७ टक्के झाला होता. या दशकात स्वातंत्र्यानंतर लोकसंख्या वाढीचा दर सर्वाधिक कमी होता. लोकसंख्या वाढीचा दर कमी होत जाणे हे आर्थिक संपन्नतेचे व सर्वसामान्यांच्या उंचावलेल्या जीवनमानाचे एक महत्त्वाचे लक्षण मानले जाते. सन २०११ ते २०२७ या काळात भारतातील लोकसंख्या वाढीचा दर किती कमी झाला आहे, यानुसार सर्वसामान्यांचे जीवनमान किती उंचावले आहे, याचे ढोबळ अनुमान लावता येऊ शकेल. महत्त्वाचे म्हणजे, लोकसंख्येच्या बाबतीत भारताचे मार्गक्रमण 'सर्वांत तरुण पण वेगाने वृद्ध होत असलेला देश' या दिशेने होते आहे. या बाबतची स्थिती जनगणनेने कळेल आणि तरुणांसाठीची व वृद्धांसाठीची धोरणे प्राधान्याने बदलावी व बनवावी लागतील. उच्च शिक्षणाची उपलब्धता, रोजगार निर्मिती, स्थलांतरातून निर्माण होणारे मुद्दे, तरुण व वृद्धांचे मानसिक प्रश्न, पेन्शनवरील सरकारी खर्च आणि वैद्यकीय सोयी-सुविधा याबाबतच्या धोरणांचा आधार जनगणनेची आकडेवारी असेल.

सन २०२६ मध्ये भारतातील सरासरी आयुष्यमान ७१ वर्षांच्या आसपास अपेक्षित आहे. मागील जनगणनेत १० वर्षांमध्ये (२००१-२०११) सरासरी आयुष्यमानात चार टक्क्यांहून थोडी अधिक वाढ होत ते ६७ वर्षे नोंदवले गेले होते. सन २०११ ते २०२६ या १५ वर्षांच्या काळात चार टक्क्यांचीच वाढ होते की कमी-अधिक हे जनगणनेतून नेमके कळेल. दोन जनगणनांमधील १० वर्षांच्या कालखंडातील सरासरी आयुष्यमानातील सर्वाधिक १० वर्षांची वाढ ही सन १९५१ (३५ वर्षे) ते १९६१ (३५ वर्षे) या काळात बघावयास मिळाली होती.

भारतात सन २००१ मध्ये प्रति १००० पुरुषांमागे ९३३ स्त्रिया होत्या, जी संख्या पुढील १० वर्षांमध्ये ९४३ झाली होती. सन २०२७ मध्ये स्त्रियांचे लोकसंख्येतील प्रमाण वाढणे अपेक्षित आहे. पण राज्यनिहाय काय स्थिती असेल आणि सन २००१ ते २०११ दरम्यान ज्याप्रमाणात स्त्रियांची संख्या वाढली होती त्याप्रमाणात किंवा त्यापेक्षा अधिक ती वाढते आहे की नाही, याकडे उत्सुकतेने बघितले जाईल.

लोकसंख्या वाढीमध्ये मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीचे प्रमाण नेहमीच चर्चेचा व वादाचा विषय ठरले आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या लोकसंख्येत मुस्लिम व ख्रिश्चन धर्मियांचे प्रमाण अनुक्रमे १४.२ टक्के व २.३ टक्के इतके आहे. परंतु भारतात हिंदू अल्पसंख्यांक होऊ लागले आहेत, हे बहुसंख्यकांच्या मनावर बिंबवण्यात आले आहे. यासाठी सन २०११च्या जनगणनेचाच आधार घेण्यात येतो. यानुसार, भारताचा लोकसंख्या वाढीचा दर १७.७ टक्के असला तरी या काळात मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीचा दर २४.६ टक्के होता. सन १९९१ ते २००१ दरम्यान मुस्लिम लोकसंख्या वाढीचा दर २९.५ टक्के होता, जो पुढील एका दशकात ४.९ टक्क्यांनी कमी झाला. अन्य काही अहवालांनुसार, सन २०११ ते २०२१ या काळात मुस्लिम महिलांमधील मूल जन्मास घालण्याचे प्रमाण प्रतिमहिला २.३६ पर्यंत कमी झाले होते, तर हिंदू महिलांमध्ये हे प्रमाण प्रतिमहिला १.९४ इतके होते. पण या काळातील जनगणना न झाल्यामुळे याची पुष्टी आताच करणे शक्य नाही. लोकसंख्येतील अल्पसंख्याकांचे प्रमाण आणि विशेषतः मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीचे प्रमाण तपासण्याकरिता नव्या जनगणनेच्या आकड्यांची सर्वाधिक आतुरता असेल यात शंका नाही.

**जात-जनगणना**

राष्ट्रीय जनगणनेसोबत जात-जनगणना सुद्धा करण्यात येणार आहे. यातून स्वातंत्र्यानंतर प्रथमच प्रत्येक जातीची व जात समूहांची (मुख्यतः ओबीसी व सवर्ण) संख्या कळणार आहे. पण, जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातून - म्हणजे घरांच्या गणतीतून - जातगणनेस बाहेर ठेवण्यात आले आहे. यामुळे जातीनिहाय कच्च्या-पक्क्या घरांची स्थिती, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, संगणक-टीव्ही-वाहन उपलब्धता या प्रकारची महत्त्वाची आकडेवारी मिळू शकणार नाही. याशिवाय, जात समूहांच्या सामाजिक-आर्थिक स्थिती बाबत निष्कर्ष काढता येणार नाहीत. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्याची प्रश्नावली अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. त्यानंतरच, जातनिहाय शिक्षण, रोजगार व नोकरी ही माहिती कितपत उपलब्ध होऊ शकेल, ते कळेल. या माहितीच्या आधारे विविध समाजांच्या प्रतिनिधित्वाच्या मागण्या जोरकसपणे पुढे येणार आहेत.

**शहरीकरण व स्थलांतर**

प्रचंड प्रमाणात होत असलेले शहरीकरण आणि रोजगारासाठी देशांतर्गत स्थलांतरे हे यंदाच्या जनगणनेतील सर्वाधिक ज्वलंत मुद्दे ठरू शकतात. सन २०११ मध्ये शहरी भागात राहणारी लोकसंख्या ३१.१६ टक्के होती. मागील १६ वर्षांमध्ये देशातील शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढल्याचे प्राथमिक दृष्ट्या नजरेस येते आहे. शहरीकरणाच्या वेगापुढे गाजलेल्या १०० स्मार्ट सिटी प्रकल्पाचे काय झाले, याचा धांडोळा घेण्याची संधी जनगणनेतून मिळू शकते. शहरीकरणाचे मुख्य कारण शहरांभोवती होणारा औद्योगिक विकास आहे की ग्रामीण भागातील दैन्यावस्था याचा शोध घेण्याच्या प्रयत्नांमध्ये जनगणनेची आकडेवारी हातभार लावू शकते. देशाच्या उत्तर व पूर्वेकडील राज्यांतून नवी दिल्ली आणि देशाच्या पश्चिम व दक्षिणेकडील राज्यांमध्ये होणारी रोजगार स्थलांतरे यांचे प्रमाण कित्येक पटींनी वाढले आहे. जनगणनेत स्थलांतरांची दिशा, प्रकार व प्रमाण यांची नोंद होत असते. यानुसार, प्रादेशिक विकासाची विषमता पुन्हा एकदा चर्चिली जाईल. मतदारसंघ पुनर्रचनेत लोकसंख्येनुसार राज्यांना राजकीय प्रतिनिधित्व की आपल्या राज्याचा आर्थिक विकास घडवून इतर राज्यातील स्थलांतरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध केल्याबद्दल त्या राज्यांच्या राजकीय प्रतिनिधित्वात वाढ, या वादाचे आव्हान स्थलांतरितांच्या आकडेवारीतून तयार होणार आहे.

राष्ट्रीय जनगणनेची आकडेवारी ही विकासाची पुढील दोन दशकांची रूपरेषा निर्धारित करण्याची सर्वोत्तम संधी असणार आहे. या आकडेवारीचे विश्लेषण करत राजकीय पटलावर विविध धोरणांचे प्रस्ताव रेटण्याचा अवकाश सुजाण नागरी समाजाला मिळणार आहे.

याची तयारी नागरी समाजाने आतापासून करणे गरजेचे आहे. अन्यथा, नागरिकांच्याच पैशांतून साकारणारी मानवी वेळ व प्रयत्नांची ही अब्जावधी रुपयांची गुंतवणूक राजकीय वादांच्या भोवऱ्यात अडकण्याची शक्यता जास्त आहे.

**डॉ. परिमल माया सुधाकर**

# राकट देशा, कणखर देशा, महाराष्ट्र देशा !

महाराजांचा एकेरी उल्लेख झालेला पाहून तळपायाची आग मस्तकात गेलेले महायुतीचे मा. आमदार साहेब यांनी पुस्तकाच्या प्रकाशकाला फोन करून ज्या तेजस्वी, राकट व कणखर भाषेत समज दिली ती ऐकून आपण खरोखर धुरंधरांच्या राज्यात आहोत याची प्रचिती आली. कवीने उगीचच महाराष्ट्राला राकट, कणखर आणि दगडांचा देश म्हटलेले नाही, याचा पुनःप्रत्यय आला. सन्माननीय आमदार साहेबांना मा. मुख्यमंत्र्यांनी तात्काळ महाराष्ट्राचे सांस्कृतिक व भाषा विकसन मंत्रीपदी नेमावे आणि त्यांच्या मार्गदर्शनात खालील शासन निर्णय निर्गमित करावे :-

१. कोणत्याही रेल्वे प्रवाश्याने अथवा नागरिकाने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस चा उल्लेख सीएसटी असा केल्यास त्याची जीभ छाटण्यात येईल.

२. कोणीही कोणाला हात जोडून राम राम म्हणू नये. प्रत्येकाने हात उंचावून व मुठ वळून जय श्रीराम म्हणावे. भगवान श्रीरामांचा अथवा अन्य कोणत्याही हिंदू दैवताचा एकेरी उल्लेख कोणी केल्यास त्याचीही जीभ छाटण्यात येईल. विठू माऊली, ज्ञानोबा माऊली असे मवाळ बायकी शब्द कोणत्याही भक्ताने उच्चारू नयेत.

३. ऊर्दू भाषेवर बंदी घालावी. कारण त्या भाषेने आमच्या मराठी माणसांना राकटपणापासून व दगडी असण्यापासून दूर नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच लव्ह जिहाद सारखे भयंकर संकट महाराष्ट्रावर कोसळत आहे.

४. सन्माननीय आमदार साहेबांनी संबंधित वितरकाशी फोन वर केलेले संभाषण प्रत्येक प्राथमिक शाळेत पाठ्यपुस्तकातील धडा म्हणून समाविष्ट करावे. जेणेकरून अगदी बालपणापासून आपल्या मातृभाषेची खरी ओळख विद्यार्थ्यांना होत राहील.

सन्माननीय मुख्यमंत्री देखील भाषेच्या बाबतीत जरा मवाळच दिसतात. महाराष्ट्राच्या मुख्यमं त्र्याला अधिक राकट, तेजस्वी व कणखर भाषा या नवीन सांस्कृतिक मंत्र्यांनी शिकविली पाहिजे. युती धर्म पाळायचा असेल तर मुख्यमंत्र्यांनी नुसते गप्प राहू नये तर वर सुचविलेले उपाय प्रत्यक्ष अमलात देखील आणावे. दिल्लीश्वरांच्या चरणी निष्ठा अर्पण केल्यामुळे मा. मुख्यमंत्री या सहप्रवाश्यांना सांभाळून घेत आहेतच. कदाचित त्यांना दररोज गीतेचा (चुकलो, श्रीमद् भगवद्गीतेचा) दुसरा अध्याय गेली काही वर्षे वाचावा लागत असेल.

त्यामुळे एकप्रकारची स्थितप्रज्ञ वृत्ती त्यांच्यात आलेली आहेच. मात्र हिंदुत्वाला जर अधिकाधिक तेजस्वी, धुरंधर व दगडासारखे कणखर आणि राकट व्हायचे असेल तर मा. आमदार साहेबांसारख्या मित्रपक्षातील निवडक आमदारांना महत्वाची जबाबदारी देणे भाग आहे. महाराष्ट्रात असेच हिंदू शेर आणि शेरनी वाढत राहिले तरच राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा हे आपले वर्णन सार्थक ठरेल.

**किशोर देशपांडे**

# 'किसान ड्रोन ऑपरेटर' प्रशिक्षणातून महिला झाल्या हायटेक



कृषी क्षेत्रात सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचे वारे वाहत असून, त्यात ड्रोन तंत्रज्ञान क्रांती घडवून आणत आहे. हेच तंत्रज्ञान आता ग्रामीण भागातील महिलांच्या हातात विसावले असून, अमरावती जिल्ह्यातील महिलांनी 'ड्रोन ऑपरेटर' म्हणून नवे क्षितिज गाठले आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि डाखरे महाराज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या 'किसान ड्रोन ऑपरेटर' प्रशिक्षण कार्यक्रमातून ८३ महिलांनी यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करून स्वावलंबनाकडे पाऊल टाकले आहे. या उपक्रमातंर्गत डाखरे महाराज फाउंडेशनच्या मॅनेजिंग डायरेक्टर संप्रदा डाखरे यांनी ग्रामीण महिलांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षण दिले.

सन २०२४-२५ व २०२५-२६ या कालावधीत 'किमान कौशल्य विकास कार्यक्रम' अंतर्गत हे प्रशिक्षण प्रामुख्याने भातकुली तालुक्यातील महिलांसाठी आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणादरम्यान महिलांना ड्रोनचे तांत्रिक ज्ञान, त्याचे विविध घटक, ड्रोन उड्डाणाचे तंत्र (Flying Techniques), आणि कृषी क्षेत्रात औषध फवारणीसाठी ड्रोनचा प्रभावी वापर कसा करावा, याचे सखोल सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.

तसेच, उड्डाणादरम्यान पाळावयाचे सुरक्षा नियम आणि शासकीय मार्गदर्शक तत्त्वांचीही माहिती देण्यात आली.

या अभिनव उपक्रमाला जिल्हा कौशल्य विकास केंद्रामार्फत मार्गदर्शन आणि तांत्रिक सहकार्य लाभले. प्रशिक्षणाच्या दखल घेत तत्कालीन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी प्रत्यक्ष केंद्राला भेट देऊन प्रशिक्षणार्थी महिलांशी संवाद साधला आणि ग्रामीण भागातील महिलांचा हा तांत्रिक आत्मविश्वास पाहून उपक्रमाचे कौतुक केले.

या प्रशिक्षणामुळे केवळ ८३ महिलांना कौशल्य मिळाले असे नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेत एक नवीन रोजगाराची संधी निर्माण झाली आहे. आज या महिला शेतीमध्ये आधुनिक ड्रोनच्या सहाय्याने फवारणी करण्यासाठी सज्ज झाल्या असून, त्यांच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली आहे. शासनाच्या कौशल्य विकास धोरणाला प्रभावी हातभार लावणारा हा प्रकल्प कृषी क्षेत्रात महिलांच्या सहभागाचे एक नवीन आणि आधुनिक उदाहरण ठरला आहे. भविष्यातही अशाच प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून महिलांना तंत्रज्ञानाच्या प्रवाहात आणण्याचा मानस संप्रदा डाखरे यांनी व्यक्त केला आहे.

## यशकथा

**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय,
अमरावती

### जिद्द आणि प्रयत्नांची भरारी

# वंदना शेरेकर यांचा गृहिणी ते उद्योजिका असा प्रेरणादायी प्रवास



आजच्या काळात महिला केवळ चूल आणि मूल यापुरत्या मर्यादित न राहता विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. अशाच एका जिद्दी महिला उद्योजिका म्हणजे अमरावती येथील वंदना प्रविण शेरेकर. उच्चशिक्षित असूनही घरात बसून न राहता त्यांनी स्वतःचा उद्योग उभा करण्याचा निर्णय घेतला आणि आज 'वंदना मल्टीमॅक्स मॅन्युफॅक्चरिंग'च्या माध्यमातून त्या यशस्वी उद्योजिका म्हणून समोर आल्या आहेत.

वंदना शेरेकर यांचे शिक्षण एल.एल.बी. पर्यंत झाले आहे. त्या गृहिणी म्हणून घरची जबाबदारी सांभाळत होत्या. मात्र, मनात स्वतःचे काहीतरी वेगळे करण्याची आणि समाजाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार देण्याची ओढ होती. हीच ओढ त्यांना उद्योजकतेकडे घेऊन गेली. घरच्यांची खंबीर साथ आणि मार्गदर्शनामुळे त्यांनी उद्योगाचे क्षेत्र निवडण्याचे ठरविले.

या स्वप्नाला सत्यात उतरवण्यासाठी त्यांनी ६मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' (CMEGP) या योजनेची माहिती घेतली. या प्रवासात त्यांना जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती आणि स्टेट बँक ऑफ इंडिया, राजपेठ शाखेचे सहकार्य लाभले. या प्रकल्पासाठी ३४ लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले आणि जिल्हा उद्योग केंद्रामार्फत 'एमसीईडी' (MCED) कडून १५ दिवसांचे विशेष तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षणही मिळाले.

जानेवारी २०२६ मध्ये त्यांनी एल्युमिनियम फॉईल कंटेनर आणि पाणी ग्लास तयार करण्याचा उद्योग अधिकृतपणे सुरू केला. व्यवसायाची सुरुवात सोपी नव्हती.

सुरुवातीला मशिनरी हाताळणे आणि तयार मालाचे मार्केटिंग करणे यांमध्ये अनेक अडचणी आल्या. परंतु, चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर त्यांनी या सर्व आव्हानांवर मात केली आणि अल्पावधीतच व्यवसाय सुरळीत सुरू केला.

आज ४९ लाख रुपये प्रकल्प खर्च असलेल्या या उद्योगाची मासिक उलाढाल ४ लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे. विशेष म्हणजे, त्यांनी दोन व्यक्तींना आपल्या उद्योगात रोजगारही उपलब्ध करून दिला आहे

. गेल्या महिन्यात २५ हजार रुपयांचा नफा मिळवल्यानंतर, आता त्यांनी या महिन्यात ५० हजार रुपयांच्या नफ्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. भविष्यात आपल्या उद्योगाचा विस्तार करून जास्तीत जास्त लोकांना काम देण्याचा आणि एक यशस्वी उद्योजिका म्हणून समाजात नावलौकिक मिळवण्याचा संकल्प श्रीमती शेरेकर यांनी केला आहे. शासनाच्या योजना आणि कष्टाची तयारी असेल तर एक गृहिणी देखील उद्योग विश्वाचे शिखर गाठू शकते, हेच वंदना यांनी आपल्या उदाहरणातून सिद्ध केले आहे.

# वंचितच्या घागर फोडो मोर्च्याने मनपा हादरली !

## » टँकरने पाणीपुरवठा व ८ दिवसांत नवीन पंप बसविण्याचे आश्वासन





• अकोला | प्रतिनिधी •

शहरातील हद्दवाढ क्षेत्रातील तीव्र पाणीटंचाई, मूलभूत सुविधांचा अभाव आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात वंचित बहुजन आघाडीने शुक्रवारी अकोला महानगरपालिका कार्यालयावर भव्य 'घागर फोडो आंदोलन' करत जोरदार शक्तिप्रदर्शन केले. गांधी जवाहर बाग येथून निघालेल्या या मोर्चात हजारो नागरिक, विशेषतः महिलांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

"पाणी द्या, हक्क आमचा द्या", "मनपा प्रशासन हाय हाय" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. मोर्चादरम्यान रुग्णवाहिकेला अडथळा होऊ नये म्हणून प्रमोद देंडवे व निलेश देव यांनी स्वत पुढाकार घेत मार्ग मोकळा करून सामाजिक बांधिलकी जपली.

हद्दवाढ क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १४ सह ३, ४, ५, १२ व १३ या भागांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून जलवाहिन्यांचा अभाव आहे. मागील १५ दिवसांपासून नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याने संतप्त नागरिकांनी अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.

महापालिका कार्यालयासमोर आंदोलनकर्त्यांनी प्रतीकात्मक घागरी फोडून तीव्र निषेध नोंदविला. आंदोलनानंतर परिसरात साचलेले तुकडे कार्यकर्त्यांनी स्वतः साफ करून स्वच्छतेचा आदर्शही घालून दिला.

आंदोलनानंतर शिष्टमंडळाने उपायुक्त विजय पारतवार व पाणीपुरवठा विभाग प्रमुख अमोल डोईफोडे यांच्याशी चर्चा केली. प्रशासनाने सोमवारपासून मलकापूर, शिवणी व गुडदी भागात टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्याचे तसेच आठ दिवसांत जळालेल्या पंपांऐवजी नवीन पंप बसविण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे आंदोलनकर्त्यांना काहीसा दिलासा मिळाला. तथापि, "मोर्चा काढल्याशिवाय प्रशासन जागे होत नाही का?" असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

या आंदोलनात प्रमोद देंडवे, निलेश देव, आम्रपाली खंडारे, मिलिंद इंगळे, संगीता अढाऊ, ज्ञानेश्वर सुलताने, गजानन गवई, दामोदर जगताप, प्रभाताई सिरसाट, उज्वलाताई पातोडे, शेख शमशु, सुनिल इंझाणी, पराग गवई, जयश्री बहादूरकर, मनोहर बनसोड, विकास सदांशिव, किशोर तेलगोटे, नितेश किर्तक, बबलू पातोडे, किशोर जामनिक, प्रदीप खंडारे, मुकुंदराव सातपुते, मायाताई इंगळे, सुरेश पाटकर, निलेश वाघमारे, शेख साबीर, अशोक शिरसाट, शोभाताई शेळके, संगिता खंडारे, सचिन शिराळे, गोल्लू खिल्लारे, आशिष सोनोने, संजय वानखेडे, सौरभ बहादूरकर, मिनल लोंढे, धिरज खंडारे, मंगेश बलखंडे, बुद्धरत्न इंगोले, राजेश मोरे यांच्यासह असंख्य पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# गोमाता सन्मान अभियानासाठी पातूरमध्ये पूर्व नियोजन बैठक संपन्न



• पातूर | प्रतिनिधी •

गोमातेला सन्मान मिळावा तसेच तिला राष्ट्रमातेचा दर्जा द्यावा या मागणीसाठी देशभर सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पातूर येथे पूर्व नियोजन बैठक उत्साहात पार पडली. संत श्री सिद्धाजी महाराज मंदिर सभागृहात आयोजित या बैठकीत गोमाता सन्मान अभियानाच्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान आगामी कार्यक्रमाचे नियोजन, जनजागृती उपक्रम आणि आंदोलनाची दिशा यावर विचारविनिमय करण्यात आला. तसेच, कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली पूर्वपरवानगी मिळावी यासाठी पातूरचे तहसीलदार व ठाणेदार यांना निवेदनही देण्यात आले. या अभियानांतर्गत दि. २७ एप्रिल २०२६, सोमवार रोजी सकाळी ९ वाजता संत श्री सिद्धाजी महाराज सभा मंडप येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. बैठकीला संजुभाऊ यादव, संजय गाडगे, सचिनभाऊ बारोकार, नानासाहेब देशमुख, श्री श्री १०८ महंत गणेशानंदगिरी महाराज, श्री नवनाथ महाराज गोशाळा चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी, अनंता बगाडे (बालुभाऊ), राजुभाऊ उगले, सुभाष हिरवाकर, नंदकिशोर आमले, डॉ. श्रीकांत बोरकर (वनराई गोरक्षण), अशोक उगले आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक स्तरावर जोरदार तयारी सुरू असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# पाढरीतील प्रलंबित मालमत्ता हस्तांतरणाचा प्रश्न मार्गी

## » घरकुल व विकासकामांना मिळणार गती; नागरिकांना दिलासा



• तेल्हारा | प्रतिनिधी •

प्रभाग क्रमांक १ मधील पाढरी भागातील नागरिकांचा अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला मालमत्ता हस्तांतरणाचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, त्यामुळे घरकुल व विविध विकासकामांचा मार्ग मोकळा झाला आहे. नगरसेविका कान्होपात्रा रामभाऊ फाटकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तसेच सर्वपक्षीय पाठिंबा, आंदोलनाची भूमिका आणि माध्यमांच्या सहकार्यामुळे प्रशासनाला निर्णय घ्यावा लागला.

पाढरी भागातील नागरिकांच्या मालमत्ता हस्तांतरणाचा प्रश्न सोडवण्यासाठी नगरसेविका फाटकर यांनी वारंवार पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. नागरिकांच्या स्वातंत्र्य, समानता व न्यायाच्या हक्कांवर परिणाम होत असल्याने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी त्यांनी केली होती. या मागणीला विविध राजकीय पक्षांनीही पाठिंबा देत वेळोवेळी आक्रमक भूमिका घेतली होती.

या पार्श्वभूमीवर तेल्हारा नगर परिषदेचे मुख्याधिकारी सतीश गावंडे यांनी संबंधित विभागाला निर्देश देत प्रलंबित प्रकरण निकाली काढले. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्षा वैशाली जितेंद्र पालिवाल यांच्या हस्ते मालमत्ता हस्तांतरण प्रक्रियेला औपचारिक सुरुवात करण्यात आली. यावेळी नगराध्यक्षा पालिवाल यांनी पाढरी भागातील विकासकामांना प्राधान्य देऊन सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन नागरिकांना दिले. कार्यक्रमाला स्वच्छता व आरोग्य समितीचे सभापती सतीश जयस्वाल, नगरसेविका कान्होपात्रा फाटकर, नगरसेवक अतुल विखे, जितेंद्र पालिवाल, माजी नगरसेवक रामभाऊ फाटकर, कार्यालय अधीक्षक निषाद वानखडे, कर विभागाचे लिपिक संजय झिरमिरे तसेच पालिका कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, या निर्णयामुळे पाढरी भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, आगामी काळात घरकुल योजना व इतर मूलभूत सुविधांच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्र.६ वर चोरट्यांचा धुमाकूळ

• अकोला | प्रतिनिधी •

सध्या चोरट्यांचा अड्डा बनत चालल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्लॅटफॉर्मवर लुटारू आणि संशयित व्यक्तींचा मोठ्या प्रमाणात वावर असून, प्रवाशांना लक्ष्य करत किरकोळ मारहाण व चोरीच्या घटना वाढत असल्याची तक्रार प्रवाशांकडून होत आहे. विशेष म्हणजे, रात्रीच्या वेळी या प्लॅटफॉर्मवर पोलिसांची गस्त जवळपास नसल्यासारखीच परिस्थिती आहे.

जा.क्र. 1030/2026 दि. 16/04/2026

## चौकशीची जाहिर नोटिस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग, अकोला.**

अर्ज क्रमांक :- 23/2026 **कलम -19**

**सार्वजनिक न्यासाचे नाव :** - हिंदु स्मशान भूमी चॅरिटेबल ट्रस्ट, कुरुम, ता. मुर्तीजापूर जि. अकोला

**अर्जदार : श्री. संतोष सदाशिवराव शिरभाते, रा. कुरुम, ता. मुर्तीजापूर जि. अकोला**

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 चे कलम 22 / 19 अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. 1) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? 2) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ) जंगम मिळकत (वर्णन) :-5000/- रुपये संतोष सदाशिवराव शिरभाते यांचे जवळ जमा. (आ) स्थावर मिळकत (वर्णन ) :- निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त - 1, अकोला यांच्या शिक्क्यानीशी आज दिनांक 16/04/2026 रोजी दिली.

शिक्का

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## जाहिर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.नं. ५५/२०२६ प्रोसेस नं.: ३८९/२०२६
चौ.ता. ०६/०५/२०२६ दिनांक: ३०/०३/२०२६

**अर्जदार :** - १. मोरेश्वर समाधान ताले, वय ४० वर्ष, धंदा - शेती, २. श्रीमती मैनाबाई समाधान ताले वय ६८ वर्ष, धंदा - घरकाम, दोघे रा. दिग्रस बु. ता. पातुर जि. अकोला, ३. सौ. ज्योती शिवकुमार पाटील, वय ४१ वर्ष, धंदा - घरकाम, रा. वडशिंगी, ता. जि. बुऱ्हानपुर (मध्यप्रदेश), ४. अरूणा गजानन मानकर, वय ४४ वर्ष, धंदा-घरकाम, रा.चिखली ता.खामगाव जि. बुलढाणा.

.. विरुध्द ..

**गैरअर्जदार :** निल
**मयताचा पत्ता :- मयत :- समाधान देवराव ताले**
**पत्ता :- दिग्रस बु., ता. पातुर जि. अकोला**

या अर्जीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत समाधान देवराव ताले यांचा मृत्यु दि. २९/११/२०२५ रोजी दिग्रस बु. ता. पातुर जि. अकोला येथे झाला तसेच मयत यांची आई हया बरेच वर्षापुर्वी मयत झाल्या. वरिल अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत अन्यथा कोणाची कसल्याही उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०३/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- २७/०३ /२०२६
पातुर

शिक्का

आदेशानुसार,
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

**THE COURT OF 2nd CIVIL JUDGE (SR.DN.), AKOLA [MAHARASHTRA]**

**"Summons for Settlement of Issue"**

(Order 5, Rule 1,5)

Spl.C.S.No.108/2025 FF:-20/07/2026

**Nathmal ...Vrs...Kailash**

To, 1.Smt. Kailash Laxminarayanji Sharma, 2.Piyush Kailash Sharma Both R/0-36, Chaturbhuj Colony, Akola Tq. Dist.Akola.

WHEAREAS Plaintiff has instituted a suit in this Court against you. SUIT FOR DECLERATION OF TITLE BY WAY OF ADVERSE POSSESSION". You are hereby summonsed to appear in this court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to suit, or who shall be accompanied by some person able to answer all such questions, on the 20/07/2026 at 11.00 O'Clock in the forenoon to answer the claim, (and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off, or counter-claim you shall enter such documents in a list to be annexed to the written statement). Take notice that in default of your appearance on the day mentioned above, the suit will be heard and determined in your absence. Also take notice that, in default of your filling and address for service on or before date mentioned you are liable to have defence struck out. Given under my hand and seal of the Court, this 21/04/2024.

"Written Statement filed on with in 30 days after service of summons."

STAMP

By Order,
Asst. Superintendent
Civil Court (Senior Division), Akola

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.४१,४२, श्रीकांत नगर, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला -४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १४१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन्स क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय : अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन : ९८२३०१६३०० | ९४२२९५६२६८
email : atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

जा.क्र. 1082/2026 दि. 20/04/2026

## चौकशीची जाहिर नोटिस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग, अकोला.**

अर्ज क्रमांक: 30/2026 **कलम -19**

**सार्वजनिक न्यासाचे नाव :** - श्री. अंजनी पवनपुत्र हनुमान मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट, अकोला

**अर्जदार : श्री. हरिहर त्र्यंबकराव सरनाईक रा. तुल्ला ले-आउट, साईनगर, हिंगणा रोड, अकोला.**

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 चे कलम 22 / 19 अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. (1) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? 2) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? जंगम मिळकत (वर्णन) :-7000/- रुपये श्री. हरिहर त्र्यंबकराव सरनाईक यांचे जवळ जमा. (आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - 1, शिक्क्यानीशी आज दिनांक- 20/04/2026 रोजी दिली.

शिक्का

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## जाहिर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम.जे.सी. नं. ४५२/२०२६ प्रोसेस नं.: ४४४१/२०२६
चौ. ता.: १७/०६/२०२६ दिनांक: ०२/०४/२०२६

**अर्जदार :** - १. शिवप्रकाश अमरचंद कासट, रा. एम.आय.डी.सी. फेज-२, प्लॉट नं. डी-४७, अकोला, ता. जि. अकोला, २. ओमप्रकाश अमरचंद कासट, रा. एम.आय.डी.सी. फेज-२, प्लॉट नं.डी-४६, अकोला, ता. जि. अकोला. ३. सौ. सरस्वती शामलाल झंवर, रा. तेली गल्ली, रविवारपेठ, बिड, ता. जि. बिड, ४. सौ. रश्मी राजेशकुमार नवाल, रा. गुलाबपुरा (रूरल), जि. भिलवाडा, राजस्थान, ५. संतोष संजयकुमार लाहोटी, रा. दारूशिफा, घर नं. २२/२/७२२, राजस्थान भवन, हैद्राबाद तेलंगाणा.

.. विरुध्द ..

**गैरअर्जदार :** निल
**मयताचा पत्ता :- मयत :- श्रीमती रामप्यारीबाई अमरचंद कासट**
**पत्ता :- रा. एम.आय.डी.सी. फेज-२, प्लॉट नं. डी-४७, अकोला, ता. जि. अकोला.**

या अर्जीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीमती रामप्यारीबाई अमरचंद कासट यांचे दि. २५/१०/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरिल अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. प्रकारची हरकत असल्यास दिनांक त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही १७/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोला

## जाहिर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी.नं. ६३/२०२६ प्रोसेस नं. ४१६/२०२६
चौ.ता. ०८/०६/२०२६ दिनांक: २२/०४/२०२६

**अर्जदार :** - १. विश्वनाथ नामदेव धोत्रे, वय ६१ वर्ष, धंदा - शेती, रा. तुलंगा खु. ता. पातुर जि. अकोला

.. विरुध्द ..

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :- मयत :- नामदेव किसन धोत्रे**
**पत्ता :- तुलंगा खु. ता. पातुर जि. अकोला**

या अर्जीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नामदेव किसन धोत्रे यांचा मृत्यु दि.२५/०२/२०११ रोजी तुलंगा खुर्द ता. पातुर जि. अकोला येथे झाला, तसेच मयत यांची पत्नी नामे अनुसयाबाई नामदेवराव धोत्रे हया दिनांक २०/०८/२००७ रोजी तुलंगा खुर्द ता. पातुर जि. अकोला येथे मयत झाल्या. मयत यांची आई नामे पार्वताबाई किसन धात्रे या अंदाजे ७० वर्षापुर्वी मयत झाल्या. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. असल्यास असल्यास दिनांक त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत ०८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- २२/०४/२०२६
पातुर

शिक्का

आदेशानुसार,
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालये (क. स्तर), पातुर

## जाहिर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम.जे.सी. क्र. ६७/२०२६ प्रोसेस क्रमांक: ४९७/२०२६
चौ. ता. : १७/०६/२०२६ दिनांक: २२/०४/२०२६

**अर्जदार :** - १. कैसर जनार्दन इंगळे, वय ५८ वर्ष धंदा- घरकाम रा. पिंपळखुटा जि. अकोला २. दुर्गा परशराम मेसरे, वय ३६ वर्ष, धंदा -घरकाम, रा. खामगांव गणेशपुर महाल्खेड ता. खामगाव जि. बुलढाणा, ३. रेणुका सुनिल केलोडे, वय ३४ वर्ष, धंदा घरकाम, रा. केशव नगर, वार्ड ४, पो. अमडापूर, ता. चिखली, जि.बुलढाणा, ४. लक्ष्मी शिवाजी मात्रे, वय २९ वर्ष, धंदा घरकाम, रा. शिवाजी वेस, भोईपुरा खामगांव ता. खामगांव जि. बुलढाणा, ५. गंगा विठ्ठल केलोडे, वय २८ वर्ष धंदा- घरकाम, रा. गणेश नगर, धावडे वस्ती, रोशन गार्डन, भोसरी १९/२, पुणे सिटी, पो. भोसरी गांव, जि.पुणे. ६. पुनम गजानन शिवाडे, वय २७ वर्ष, धंदा घरकाम, रा. देवधावा पो. देवधावा, जि. बुलढाणा, ७. गणेश जनार्दन इंगळे, वय २५ वर्ष, धंदा मजुरी, रा. पिंपळखुटा, ता. पातुर, जि. अकोला, ८. शंकर जनार्दन इंगळे, वय २३ वर्ष, धंदा-मजुरी, रा. पिंपळखुटा ता. पातुर जि. अकोला.

.. विरुध्द ..

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :- मयत :- जनार्दन तुळशिराम इंगळे**
**पत्ता :- पिंपळखुटा ता. पातुर जि. अकोला**

या अर्जीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जनार्दन तुळशिराम इंगळे यांचा मृत्यु दि.१९/०५/२०२२ रोजी सरकारी दवाखाना अकोला जि.अकोला येथे झाला. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- २२/०४/२०२६
पातुर

शिक्का

आदेशानुसार,
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर) पातुर

## जाहिर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी.नं. ६६ / २०२६ प्रोसेस नं. : ५१४/२०२६
चौ. ता. १२/०६/२०२६ दिनांक : २२/०४/२०२६

**अर्जदार :** - १. शेख मेहबुब अब्दुल बशीर (मयत ), १ - अ. सरवार बेगम शेख मेहबुब, वय ६३ वर्ष, धंदा - घरकाम, १ - ब. शेख कय्युम शेख मेहबुब, वय ४२ वर्ष, धंदा - मजुरी, १ - क. शेख मतिन शेख मेहबुब, वय ४० वर्ष, धंदा - मजुरी, १ - ड. शेख मोसीन शेख मेहबुब, वय ३४ वर्ष धंदा - मजुरी, नं. १ ते ४ रा. सैय्यदपुरा पातुर ता. पातुर जि. अकोला, २. अब्दुल कादिर अब्दुल बशिर (मयत), २- अ. शबाना परविन शेख सफदर, वय ४८ वर्ष धंदा - घरकाम, रा.हमजा प्लॉट, एस. एस. बेकरी जवळ, वाशिम रोड अकोला ता. जि. अकोला, ३. हलीमा बी ख्वाजा आरीफ अली (मयत), अ- अ. ख्वाजा वाजीद अली ख्वाजा आरीफ अली, वय ५१ वर्ष, धंदा - मजुरी, किल्ला, नबाबपुरा पातुर ता. पातुर जि. अकोला, ४. पुतली बी सैय्यद शब्बीर (मयत), ४– अ.राजीया परविन ख्वाजा वाजीद अली, वय ५० वर्ष, धंदा - घरकाम, रा. किल्ला नबाबपुरा पातुर ता. पातुर जि. अकोला, ५. उजाला बेगम मोहम्मद मुश्ताक, वय ७५ वर्ष, धंदा - घरकाम, रा. किल्ला, नबाबपुरा पातुर ता. पातुर जि. अकोला.

.. विरुध्द ..

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :- मयत :- अब्दुल बशीर शेख मेहबुब**
**पत्ता :- सैय्यदपुरा पातुर ता. पातुर जि. अकोला**

या अर्जीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अब्दुल बशीर शेख मेहबुब यांचा मृत्यु दि. ०४/०७/१९७७ रोजी सैय्यदपुरा पातुर ता. पातुर जि. अकोला येथे झाला. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारीस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०६/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- २२/०४/२०२६
पातुर

शिक्का

आदेशानुसार,
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

## जाहिर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.नं. ६३३/२०२६ प्रोसेस नं. : ५४७३ / २०२६
चौ. ता.: १५/०६/ २०२६ दिनांक: २१/०४/२०२६

**अर्जदार :** - १. रंगुबाई भिकाजी ताले, २. गजानन भिकाजी ताले, ३. विठ्ठल भिकाजी ताले, १ व ३ रा. मु. कासली खुर्द, पो. म्हातोडी, ता. जि. अकोला., ४. मुक्ताबाई संतोष अढाऊ, रा. मु. पो. गुडधी, ता. जि. अकोला. ५. सावित्रीबाई प्रभाकर सपकाळ, ६. मंगला ज्ञानेश्वर तायडे, ५ व ६ रा. सावरा, ता. अकोट, जि. अकोला. ७. गोकुळा योगेश भगत, रा. मु. पो. पिंपरी जैनपूर, उमरा, ता. जि. अकोला.

.. विरुध्द ..

**गैरअर्जदार :** निल
**मयताचा पत्ता :- मयत :- भिकाजी हरिचंद्र ताले**
**पत्ता :- रा. मु. कासली खुर्द, पो. म्हातोडी, ता. जि. अकोला.**

या अर्जीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भिकाजी हरिचंद्र ताले यांचे दि. ०४/०६/२०२५ रोजी त्यांचे राहत्या घरी कासली खु. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारानी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोला

## जाहिर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी.नं. ११/२०२६ प्रोसेस नं. : ४१२/२०२६
चौ.ता. ०८/०५/२०२६ दिनांक : २०/०४/२०२६

**अर्जदार :** - १. साबेरा बी अब्दुल सत्तार भुसारी, वय ७५ वर्ष, धंदा - घरकाम, २. शेख अनिस शेख सत्तार भुसारी, वय ५१ वर्ष, धंदा - मजुरी ३. मो. युनुस अब्दुल सत्तार भुसारी, वय ४८ वर्ष, धंदा - मजुरी, नं. १ ते ३ रा. सैलानीपुरा, पातुर, ता. पातुर, जि. अकोला. ४. राजेकाबी सैय्यद निसारअली, वय ५५ वर्ष, धंदा - घरकाम, रा. अकबर प्लॉट, पातुर, ता. पातुर जि. अकोला, ५. सादेका बी शेख मोहिन, वय ५० वर्ष, धंदा - घरकाम, रा. भगत वाडी, २ नल्ली, जुने शहर, अकोला, ता.जि. अकोला.

.. विरुध्द ..

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :- मयत :- अब्दुल सत्तार शेख अमीर**
**पत्ता :- पातुर, ता.पातुर जि. अकोला**

या अर्जीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अब्दुल सत्तार शेख अमीर यांचा मृत्यु दि.०१/११/२०२३ रोजी पातुर ता. पातुर जि. अकोला येथे झाला. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- १८/०४/२०२६
पातुर

शिक्का

आदेशानुसार,
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

## जाहिर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.नं. ५८४/२०२६ प्रोसेस नं. : ५३१४/२०२६
चौ. ता. २२/०६/ २०२६ दिनांक: १८/०४/२०२६

**अर्जदार :** - १. संतोष तुळशीराम साबळे, रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला. मो. नं. ८६००१५८९८४, २. रुख्मिनी शंकर वाघ, रा. कुणबीपुरा, सिंदखेड, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. ३. चंदा डिगांबर फाळके, रा. व्हाळा शहापुर, ता. पातुर, जि. अकोला. ४. अंबिका मारोती डिक्कर, रा. आसा, ता. खामगाव, जि. बुलढाणा, ५. पार्वती गजानन नवघरे, रा. व्याळा, ता. बाळापुर, जि. अकोला.६. मैनाबाई बालचंद्र उगले, रा. देऊळगाव ब्राम्हण, ता. पातुर, जि. अकोला.

.. विरुध्द ..

**गैरअर्जदार :** निल
**मयताचा पत्ता :- मयत :- गिताबाई तुळशीराम साबळे**
**पत्ता :- रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला.**

या अर्जीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गिताबाई तुळशीराम साबळे यांचे दि. ०२/११/२०१२ रोजी राहत्या घरी, डोंगरगाव, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोला

# माझे ऐकून घेतले... एवढेंच पुरेसे होते

## खा. अमर काळेंच्या आत्मीयतेने वृद्धाच्या डोळ्यात दाटलें समाधान



**वर्धा/ जनमाध्यम**

सत्तेच्या गलियाऱ्यात चमकणाऱ्या झगमगाटात अनेकदा माणुसकी हरवते, अशी खंत व्यक्त केली जाते. पण या साचलेल्या प्रतिमेला छेद देत वर्धा जिल्ह्याचे खासदार अमर काळे यांनी आपल्या साधेपणाने आणि जिव्हाळ्याच्या स्वभावाने जनतेच्या मनात वेगळी जागा निर्माण केली आहे.

सतत जनसामान्यात राहणं, कुणालाही भेटण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज भासू न देणं आणि प्रत्येकाच्या अडचणी मनापासून ऐकून घेणं, ही त्यांची कार्यशैली ठरली आहे. गरीब-श्रीमंत असा कोणताही भेद न ठेवता, प्रत्येकाच्या प्रश्नाकडे तेवढ्याच गांभीर्याने पाहण्याची त्यांची वृत्ती लोकांना भावते. याच आत्मीयतेचा प्रत्यय नुकताच वर्ध्यातील चरखा भवन येथे आला. एका विवाह सोहळ्यासाठी उपस्थित असताना, नागरिकांशी संवाद साधत असताना एक वृद्ध व्यक्ती काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत होते. मात्र आवाज स्पष्ट येत नसल्याने त्यांची व्यथा व्यक्त होत नव्हती. हे लक्षात येताच खासदार काळे यांनी त्या वृद्धाला अलगद बाजूला नेलं, शांतपणे त्यांची समस्या ऐकून घेतली आणि आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिलं. या छोट्याशा प्रसंगाने मोठं चित्र उभं केलं.

त्या वृद्धाच्या चेहऱ्यावर समस्या सुटण्याची चिंता नव्हती, तर माझं म्हणणं कुणीतरी जिव्हाळ्याने ऐकलं याचं समाधान ओसंडून वाहत होते.


हीच खरी लोकप्रतिनिधीची ओळख असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. जनतेशी असलेली ही नाळ, साधेपणा आणि संवेदनशीलता यामुळे अमर काळे हे केवळ वर्ध्यातच नव्हे, तर संपूर्ण मतदारसंघात आपले खासदार म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत. सत्तेच्या उंच शिखरावर असूनही पाय जमिनीवर घट्ट रोवून ठेवणाऱ्या या व्यक्तिमत्त्वामुळेच त्यांच्या लोकप्रियतेचा आलेख दिवसेंदिवस उंचावत आहे.

# मुंगसाजी माऊलींच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

**आर्वी/ जनमाध्यम**

श्री संत मुंगसाजी महाराज यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा व मूळ अस्थी दर्शन कार्यक्रम आर्वी येथील शिरपूर रोडवरील श्री संत मुंगसाजी माऊली देवस्थान (राणे लेआउट) येथे अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तीचा दरवळ पसरला होता.

या धार्मिक सोहळ्याची सुरुवात शोभायात्रा व दिंडीने झाली. डॉ. रिपल राणे (राणे हॉस्पिटल), साई नगर येथील निवासस्थानावरून निघालेल्या या शोभायात्रेत मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात आणि माऊलींच्या जयघोषात ही दिंडी मंदिर प्रांगणात दाखल झाली.



दुपारी ११ वाजता मूर्तीचे मंदिरात आगमन झाल्यानंतर जलधिवास, पुष्पधिवास, धान्यधिवास व वस्त्रधिवास हे धार्मिक विधी विधिवत पार पडले. सायंकाळी भजन सेवा व आरतीने वातावरण अधिकच भक्तिमय झाले. गुरुवारी सकाळी लवकर पूजा विधीला प्रारंभ झाला. दुपारी ठरलेल्या मुहूर्तावर मुंगसाजी महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. याचवेळी माऊलींच्या मूळ अस्थींचे दर्शन भाविकांसाठी खुले करण्यात आले, ज्याचा हजारो भक्तांनी लाभ घेतला. तसेच कळस स्थापना विधीही पार पडला. सायंकाळी महालक्ष्मी भजन मंडळ, आर्वी यांच्या वतीने भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भजन, कीर्तन आणि महाआरतीमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास आर्वी शहरासह परिसरातील मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती लावून माऊलींचे दर्शन घेतले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल देवस्थानतर्फे सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.



# पारंपरिक शेतीला रामराम!

## अंदोरीत बीबीएफ तंत्रज्ञानाचा दमदार प्रयोग

**गौळ/ जनमाध्यम**

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा, यासाठी अंदोरी येथे बीबीएफ (रुंद वरंबा) लागवड तंत्रज्ञान व टोकन यंत्राद्वारे पेरणीचे प्रात्यक्षिक जोरदार उत्साहात पार पडले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत आयोजित या कार्यशाळेत शेतकऱ्यांना नव्या पद्धतीची प्रत्यक्ष माहिती देण्यात आली.

रुंद वरंब्यावर पिकांची लागवड केल्यास पाण्याचा योग्य निचरा होऊन उत्पादनात वाढ होते, असा संदेश कृषी विभागाने यावेळी ठामपणे दिला. पारंपरिक पद्धतीला छेद देत 'शून्य मशागत' आणि मुख्य पिकासोबत आंतरपीक घेण्याचे आवाहनही करण्यात आले. या प्रात्यक्षिकासाठी गावातील पोलीस पाटील हेमंत ढोले, माजी सरपंच जय वाकडे, तंत्रज्ञान समन्वयक स्नेहा इंगोले तसेच प्रगतिशील महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी प्रमोद देहारे यांच्या शेतात हे प्रात्यक्षिक घेण्यात आले. समूह सहाय्यक कुमारी अश्विनी डहाके यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची सखोल माहिती दिली. दरम्यान, येणाऱ्या खरीप हंगामात अधिक उत्पादन आणि खर्चात बचत साधण्यासाठी शेतकऱ्यांनी बीबीएफ तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असा जोरदार संदेश या कार्यशाळेतून देण्यात आला.

पारंपरिक पद्धतीला पर्याय म्हणून पुढे येणारे हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी 'गेमचेंजर' ठरणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यात STEMI प्रकल्पाचा विस्तारामुळे रुग्णांचे तातडीने निदान

## ३१ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ईसीजी सुविधा उपलब्ध

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यात हृदयविकाराच्या रुग्णांना वेळेवर आणि प्रभावी उपचार मिळावेत यासाठी राबविण्यात येत असलेल्या STEMI (ST-Elevation Myocardial Infarction) प्रकल्पाचा विस्तार करण्यात आला आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने निदान आणि संदर्भ सेवा उपलब्ध होत असून, मृत्युदर कमी करण्यास मदत होत आहे. वर्धा जिल्ह्यातील सर्व ३१ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ईसीजी तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे दुर्गम भागातील रुग्णांनाही जवळच्या केंद्रात ईसीजी तपासणी करून घेणे शक्य झाले आहे.

एप्रिल २०२१ मध्ये पायलट प्रकल्प म्हणून सुरू झालेल्या या उपक्रमात 'हब अँड स्पोक' मॉडेलचा अवलंब करण्यात आला होता.

सुरुवातीला सहा आरोग्य संस्थांना स्पोक केंद्र म्हणून जोडण्यात आले होते. या माध्यमातून हृदयविकाराच्या रुग्णांचे वेळेवर निदान करून त्यांना उच्चस्तरीय आरोग्य संस्थेकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली. हृदयविकाराच्या वाढत्या घटनांचा विचार करून मार्च २०२४ मध्ये या प्रकल्पाचा विस्तार करण्यात आला असून आतापर्यंत एकूण १९ हजार ८८४ नागरिकांची ईसीजी तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी ६५७ प्रकरणांमध्ये गंभीर स्वरूपाच्या समस्या आढळून आल्या असून ११५ रुग्णांना STEMI असल्याचे निदान झाले आहे. या सर्व रुग्णांना 'गोल्डन अवर'मध्ये तात्काळ संदर्भित करून पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले. त्यामुळे गुंतागुंत आणि मृत्यूदर कमी करण्यास मदत झाली आहे.

या प्रकल्पात आधुनिक Tricog ECG मशीनचा वापर करण्यात येत आहे. ही प्रणाली क्लाऊड-आधारित असून १२-लीड ईसीजी रेकॉर्ड करून तत्काळ केंद्रीय सर्व्हरवर डेटा अपलोड करते.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने काही मिनिटांत प्राथमिक अहवाल तयार होतो. संपूर्ण प्रक्रिया सुमारे १० मिनिटांत पूर्ण होत असल्याने हृदयविकाराच्या झटक्याच्या वेळी जलद निर्णय घेणे शक्य होते. नागरिकांना छातीत दुखणे, घाम येणे, श्वास घेण्यास त्रास होणे अशी लक्षणे जाणवल्यास किंवा जोखीम गटातील नागरिकांनी जवळच्या आरोग्य केंद्रात तात्काळ ईसीजी तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल बेले यांनी केले आहे. STEMI प्रकल्पामुळे विशेषतः ग्रामीण व वंचित भागातील नागरिकांना सुलभ, वेगवान आणि जीव वाचवणारी हृदयविकार सेवा उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# यवतमाळमध्ये भाजपला नवे बळ

## आ. सुमित वानखेडे यांची जिल्हा प्रभारीपदी नियुक्ती

**आर्वी/ जनमाध्यम**

भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेशाकडून संघटनात्मक बळकटीसाठी जाहीर करण्यात आलेल्या नियुक्त्यांमध्ये आर्वी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुमित वानखेडे यांची यवतमाळ जिल्हा प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, पक्षाने त्यांच्या संघटन कौशल्याची घेतलेली दखल मानली जात आहे.

सुमित वानखेडे यांनी आपल्या कार्यपद्धतीतून नेहमीच वेगळेपण जपले आहे. कार्यकर्त्यांशी थेट संवाद, नियोजनबद्ध कामकाज आणि जनसंपर्काची मजबूत पकड यामुळे त्यांनी संघटनात्मक पातळीवर भक्कम स्थान निर्माण केले आहे. यापूर्वी केरळ विधानसभा निवडणुकीत 'प्रवासी प्रभारी' म्हणून त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत काम करत जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली होती. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाला महाराष्ट्रातील प्रत्येक बूथपर्यंत पोहोचवण्यात त्यांच्या सूक्ष्म नियोजनाचा मोठा वाटा होता. आपल्या मतदारसंघात विकासकामांना गती देताना शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी प्रभावी यंत्रणा उभारली आहे. नव्या नेतृत्वाला संधी देणे, तसेच बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांना सक्षम बनवणे यावर त्यांचा विशेष भर राहिला आहे.

या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर देण्यात आल्याने जिल्ह्यात भाजपचे संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, त्यांच्या या नियुक्तीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कोट्यवधींचा हरित मार्ग ठरला कोरडा

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

मोठ्या गाजावाजात आणि पर्यावरण रक्षणाच्या घोषणांच्या गजरात उभारण्यात आलेला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ वरील जाम चौक ते आजंतीपर्यंतचा ग्रीन कॉरिडॉर आज अक्षरशः निष्क्रियतेच्या विळख्यात सापडला आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून तयार करण्यात आलेली ही हरित मार्गिका सध्या ओसाड, उपेक्षित आणि विदारक अवस्थेत दिसून येत आहे.



## महामार्ग क्रमांक ७ वर 'ग्रीन कॉरिडॉर'चा बोजवारा

चार वर्षांपूर्वी महामार्ग प्राधिकरणाने मोठ्या उत्साहात या प्रकल्पाची अंमलबजावणी केली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना विविध प्रकारची झाडे लावून परिसर हिरवागार करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला होता. मात्र, काम पूर्ण झाल्यानंतर या प्रकल्पाकडे पूर्णपणे पाठ फिरवण्यात आल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. जाम ते हिंगणघाट दरम्यानचा हा ग्रीन कॉरिडॉर आज दयनीय अवस्थेत आहे. अनेक ठिकाणी लावलेले जाळीचे कुंपण उध्वस्त झाले असून झाडांच्या जागी कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. झाडांना पाण्याचा थेंबही मिळत नसल्याने ती सुकून चालली आहेत. याशिवाय वारंवार लागणाऱ्या आगींमुळे उरलेसुरले हिरवेपणही नष्ट होत आहे. विकासाचे प्रतीक म्हणून उभारलेले फलकही वाकलेले, मोडलेले दिसतात जणू प्रशासनाच्या बेफिकीरीची साक्ष देत आहेत.

या प्रकरणी संबंधित प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून कारवाईचे आश्वासनही देण्यात आले आहे. मात्र, केवळ आश्वासनांच्या पलीकडे प्रत्यक्ष कृती होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या मार्गावरून दररोज प्रवास करणारे वाहनचालक व नागरिक संताप व्यक्त करत असून हरित मार्गाचा हा केवळ दिखावा होता का असा प्रश्न उपस्थित करत आहेत. आता तरी प्रशासन जागे होऊन या हरित मार्गिकेला पुन्हा जीवदान देणार का, की हा प्रकल्प कायमच 'कोरडा' राहणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मशरुम उद्योगाच्या माध्यमातून साधली आर्थिक प्रगती

## स्नेहलता सावरकर यांची प्रेरणादायी यशोगाथा

**वर्धा/ जनमाध्यम**

स्वयंसहायता महिला गटाची चळवळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उभी राहिली आहे. हजारो महिलांना गटाच्या माध्यमातून आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले. काही महिला उमेद, माविमच्या सहकार्याने उद्योजक, व्यावसायीक झाल्या आहे. मशरुम शेतीतून चिंचाळा येथील स्नेहलता मनोज सावरकर यांनी अशीच प्रेरणादायी यशोगाथा निर्माण केली आहे.

वर्धा तालुक्यातील चिंचाळा या गावातील रहिवासी असलेल्या स्नेहलता मनोज सावरकर या उन्नती लोकसंचालित साधन केंद्र, वर्धा अंतर्गत कार्यरत संबोधी स्वयं सहाय्यता महिला बचतगटाच्या सक्रिय व प्रगत सदस्य आहेत. त्यांनी ग्रामीण परिस्थितीतून पुढे येत मशरूम उद्योगाच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्याकडे सुमारे २ एकर शेती आहे. या शेतीतून त्यांना मर्यादित उत्पन्न मिळत होते. आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी पर्यायी व्यवसाय शोधण्याचा निर्णय घेतला. लोकसंचालित साधन केंद्राच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा येथे मशरूम उत्पादनाचे प्रशिक्षण घेतले आणि लहान प्रमाणात व्यवसाय सुरू केला.



सुरुवातीला कमी प्रमाणात मशरूम लागवड करतांना अनेक अडचणी आल्या. मात्र त्यांनी चिकाटी व कुटुंबाच्या सहकार्याने व्यवसायात सातत्य ठेवले. तेजस्विनी अंतर्गत त्यांनी सुमारे २ लाख रुपयांचे कर्ज घेतले. या कर्जाच्या माध्यमातून त्यांनी डार्क रूम, उत्पादन कक्ष उभारणी, बेड्स तयार करणे व मशरूम प्रक्रिया युनिट विकसित केले. यामुळे त्यांच्या व्यवसायाला गती मिळाली व उत्पादन क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली. आता त्या मशरूम उत्पादन व प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणावर चालवत आहेत. २ हजार बेड्सवर मशरूम लागवड नियंत्रित वातावरणात उत्पादन प्रक्रिया उद्योगासह एकात्मिक व्यवसाय करत आहे. त्यांनी आपल्या मशरुम उत्पादनाचे मुल्यवर्धन केले. त्यातून त्या मशरुमची विविध उत्पादने घेतात. त्यात ताजे व वाळवलेले मशरूम, मशरूम पावडर, चटणी, मसाला मशरूम पापड, वडी, बिस्कीट, नानखटाई, लोणचे, मुरंबा, चटपटा पदार्थ, फेसपॅक व इतर पुरक उत्पादनांमध्ये गांडूळ खत व वर्मी वॉश मुल्यवर्धनामुळे उत्पादनाला अधिक किंमत व बाजारपेठ मिळाली आहे.

दोन हजार बेडवर ५० दिवसांत ३ वेळा उत्पादन घेतात. त्यात दररोज सुमारे ५ किलो उत्पादन होते. स्थानिक बाजारपेठ, किरकोळ विक्रेते, विक्री प्रदर्शनांच्या माध्यमातून त्या उत्पादने विकतात. ठिकठिकाणी त्यांच्य मशरुम उत्पादनांना चांगली मागणी आहे. कर्जाच्या योग्य वापरामुळे त्यांच्या उत्पादन व उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. मुल्यवर्धित उत्पादनामुळे नफा अधिक वाढला असून व्यवसाय स्थिर झाला आहे. त्यांनी आपल्या मशरुम निर्मिती उद्योगात सुमारे १२ ग्रामीण महिलांना रोजगार देऊन स्वावलंबी बनविण्यात योगदान दिले आहे. त्यांच्या या प्रेरणादायी कामामुळे त्यांनी विविध पुरस्कारांनी देखील गौरविण्यात आले आहे.

**नावात बदल**

माझे पूर्वी **RUPALIBAI SANDIPRAO KADU** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **JAYSHREE SANDIP KADU** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

- : पत्ता : -
वर्धमनेरी
ता. आर्वी जि.वर्धा ४४२२०१

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर **AN850190** वरील माझे **JYOTI TALWEKAR** असे नाव होते. माझ्या बँक पासबुक व पॅन कार्ड वरील **JYOTI SATISH TALWEKAR** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

-:पत्ता :-
साने गुरुजी नगर वर्धा ४४२००१

# भिमबुद्ध गीतांनी पेटली जाणीवांची मशाल!

**वर्धा/ जनमाध्यम**

सामाजिक जाणीवा जागृत करणाऱ्या भिमबुद्ध गीतांच्या सुरांनी एम गिरी रेडिओ ९०.४, वर्धा येथे प्रबोधनाचा प्रभावी कार्यक्रम उत्साहात पार पडला. विचारांचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाने उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.

या प्रसंगी विरूळ येथील सम्राट अशोका गायन मंच यांनी आपली दमदार कलाकृती सादर करत सामाजिक समतेचा आणि बौद्ध विचारांचा संदेश गीत-भजनातून दिला. सतीश चव्हाण, विनोद सातपुडके, पंजाब नाईक, भीमराव मनवर, राहुल वाणी, उत्तम वाणी, देवेंद्र बुधबावरे, ईश्वर लोखंडे यांनी आपल्या प्रभावी आवाजात प्रबोधनात्मक गीतांचे सादरीकरण केले. वाद्यसंगतीत वसंतराव नाईक (हार्मोनियम), कैलास बुधबावरे व राहुल मेश्राम (ढोलक) तसेच पंजाब कांबळे (तबला) यांनी सुरेल साथ देत कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढवली. समता बहुउद्देशीय प्रबोधन कलामंच संस्था, दिनकरनगर मसाळा चे अध्यक्ष व प्रबोधन गायक प्रभाकर धवणे यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम साकारण्यात आला. कार्यक्रमाचे रेकॉर्डिंग एम गिरी रेडिओ वर्धाचे पदाधिकारी राधिका लोखंडे, निलकमल, लखनजी आणि स्वनंद कळंबे यांनी केले. यावेळी त्यांनी सर्व कलावंतांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. भिमबुद्ध गीतांच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा हा कार्यक्रम श्रोत्यांच्या मनात विचारांची ठिणगी पेटवून गेला.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १४८

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# एसटी वाहकाला मारहाण करणाऱ्याला सहा महिन्याची शिक्षा

## टेंभुर्णी बस स्टॉपवरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** एसटी वाहकाला मारहाण करून त्याच्या पोटाला चावा घेणाऱ्या आरोपी राहुल निंबाजी हरणे (वय ३७,टेंभुर्णी) याला तदर्थ जिल्हा न्यायाधीश क्र.१ ए.डी. रामटेके यांनी सहा महिने साधा कारावास व हजार रुपये दंड, दंड न भरल्यास दोन महिने साधा कारावासची शिक्षा ठोठावली आहे.

दोषारोप पत्र नुसार एसटी वाहक रुपेश अशोक राऊत चांदुर रेल्वे बस आगार मध्ये वाहक म्हणून कार्यरत आहे. १७ डिसेंबर २०१८ रोजी ते चांदुर रेल्वे येथून बस घेऊन निघाले होते. यावेळी आरोपी राहुल निंबाजी हरणे बस मध्ये चढला. वाहक रुपेश राऊत यांनी त्याला तिकीट चे पैसे मागितले असता ,त्याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. टेंभुर्णी गाव आल्यानंतर बस थांबली व ते दोघे खाली उतरले असता. आरोपी राहुल हरणे ने त्यांना शिवीगाळ करून दगड फेकून मारले आणि पोटाला चावा घेऊन पळाला. रुपेश राऊत यांनी तक्रार दाखल केली. ३१ डिसेंबर २०१९ रोजी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. एकूण सहा साक्षीदार तपासण्यात आले. यापैकी एकही साक्षीदार फितूर झाला नाही. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला शिक्षा ठोठावली. सरकारी पक्षाकडून ॲड. परीक्षित शरद गणोरकर यांनी यशस्वी युक्तिवाद केला. पैरवी मध्ये हेड कॉन्स्टेबल रोशन दुधे, शिपाई सोनाली उमरे यांनी सहकार्य केले.

## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
--पत्ता--
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/
८००७३४२३३५

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.११०/२०२६ ने.ता.११.०६.२०२६

**अर्जदार ः**
१. नंदा दिगांबरराव नरसाळे, वय ५५ धंदा - घरकाम
रा.विवेक नगर, लोनवाही, ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर
२. संगीता अशोक पठाडे, वय ५३ धंदा - घरकाम
रा.शनी मंदिराजवळ, शनी मंदिर रोड, आर्णी, ता.आर्णी, जि.यवतमाळ
३. कल्पना गजानन नरसाळे, वय ४९ धंदा - घरकाम
रा.कल्पना नरसाळे, समिती बिल्डीग जवळ, दुसरा स्टॉप, नवानगर, ता.हुबळी, जि.धारवाडा राज्य कर्नाटक

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत मनोहरराव उत्तमराव शेतफळे** यांचा मृत्यू दिनांक **०५.११.२०२५** रोजी झाला. तसेच मयत **विमल मनोहर शेतफळे** यांचा मृत्यू दि.**१८.०१.२०२४** रोजी मरण पावली.दोन्ही रा.प्रल्हादपूर शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवाशी होते. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.११०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.२०७/२०२६ ने.ता.२०.०६.२०२६६

**अर्जदार ः**
१. जाकेरा बानो लुकमान अली, वय ७८ धंदा - घरकाम
२. सलमान अली लुकमान अली, वय ३२ धंदा - मजुरी
दोन्ही रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत लुकमान अली अजीज अली** यांचा मृत्यू दिनांक **२४.१०.२००८** रोजी ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२०६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.७४७/२०२६
**श्री.बसवेश्वर अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१२.०६.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार ः**
१. बसवेश्वर विश्वेश्वर मानेकर, वय ६६ वर्षे, व्यवसाय - शेती
२. सौ.सरोज विजयराव कुऱ्हेकर, वय ६३ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.वार्ड नं.६, गणेश चौक, नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.पुष्पा विजयराव मुंगसे, वय ६० वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.वार्ड नं.१०, प्रताप नगर, राष्ट्रसंत तुकडोजी विद्यालयाजवळ, वर्धा
४. मोरेश्वर विश्वेश्वर मानेकर, वय ५८ वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त
अर्जदार नं.१ व ४ रा.वाणीपुरा, नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत विश्वेश्वरआप्पा शिवाआप्पा मानेकर** यांचे दिनांक **२७.१२.१९९१** रोजी नांदगांव पेठ, ता.जि.**अमरावती** येथे निधन झाले. व मयत **शशिकलाबाई विश्वेश्वरआप्पा मानेकर** ही २२.०४.१९८७ रोजी नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती येथे मरण पावली. **अर्जदार बसवेश्वर अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **बसवेश्वर अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२०.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७३०/२०२६
**सोपान व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता.२४.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार ः**
1. Sopan Tukaramji Wasankar, Age 57 Yrs. Occu.: Agricultural
R/o House No.14-B, Shanti Nagar, Benoda Road, Amravati
2. Sunil Tukaramji Wasankar, Age 51 Yrs. Occu.: Agricultural
R/o House No.14-B, Shanti Nagar, Benoda Road, Amravati
3. Pavan Tukaramji Wasankar, Age 46 Yrs. Occu.: Private
R/o House No.14-B, Shanti Nagar, Benoda Road, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत विमलताई तुकारामजी वासनकर** हे दिनांक 02.10.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सोपान व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सोपान व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २२७
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३०८/२०२६ ने.ता.१५.०६.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.विकास महादेवराव देशमुख, वय ५५ वर्षे, धंदा - शेती
रा.खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. श्री.श्याम महादेवराव देशमुख, वय ४५ वर्षे, धंदा - शेती
रा.टाकरखेडा संभू, ता.भातकुली, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील नामे **महादेव गोपालराव देशमुख** हे दिनांक **२८.११.२०२४** रोजी खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावलेले आहेत तसेच अर्जदाराची आई नामे **आशाबाई महादेवराव देशमुख ही** दि.**१९.०७.२०११** रोजी खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २२.०४.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.) क्र.१२४/२०२६ ने.ता.१८.०६.२०२६

**अर्जदार ः**
१. गोकर्णा किसन कनसे रा.जावरा मोळवण, पो.वेणी गणेशपुर ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. पुष्पा विलास वानखडे, नवी वस्ती संभाजी नगर बडनेरा, ता.जि.अमरावती
३. लता राजेशराव राऊत, मु.नानोरी, पो.सोनोरी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. नंदा पुरुषोत्तम वऱ्हाडे,रा.मु.पो.माणिकवाडा, ता.नेर परसोपंत, जि.यवतमाळ
५. मंगला अमोलराव निचित, ब्राम्हणवाडा भगत, नांदगांव पेठ, अमरावती
६. विजया सुधाकरराव जुमडे, रा.वार्ड नं.४ पळसखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
७. ममता राजेश निर्मल, ब्राम्हणवाडा भगत, नांदगांव पेठ, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** निरंक

ज्याअर्थी मयत **किसन मारोतराव कनसे** यांचा मृत्यू दि.**२८.०२.२०२६** रोजी खंडाळा खुर्द, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे निधन झाले. मयत यांची अर्जदार नं.१ ही पत्नी आहे व अर्जदार नं.२ ते ७ ह्या मुली आहेत. मयत यांचे अर्जदार हेच वर्ग-१ चे कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२२ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

## जाहीर सुचना

जाहीर सुचनेद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, मी **प्रशांत विश्वनाथ पिवतकर**, रा.श्रीहरी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी खालील वर्णनाची स्थावर मिळकत विकत घेण्याचे ठरविले असून खरेदीखत नोंदवून घेण्याचे ठरले आहे.

**त्या मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर विभाग कचेरीचे कक्षेतील व महानगरपालिका अमरावतीचे हद्दीतील मौजा रहाटगांव, प्रगणे नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.१४८/१ मधील भोगवटदार वर्ग-१, एकुण क्षेत्रफळ ० हे.४६ आर जमिनीतील मा.सहायक संचालक नगर रचना, महानगरपालिका, अमरावती यांचे पत्र क्र.अमनपा/ससंनर/अभि/०५/२०१२ दि.०५.०६.२०१२ नुसार लेआऊट नुसार मंजूर व विद्यमान तहसीलदार साहेब अमरावती यांचे फाईलावरील रा.मा.क्र. एन.ए.पी.३४/रहाटगांव-१८३/२०११-२०१२ नि.ता.१७.०८.२०१२ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या श्री गजानन नगर नं.२ या न ावाने ओळखल्या जाणाऱ्या जागेतील प्लॉट नं.८-बी याची साईज नकाशाप्रमाणे असून याचे एकुण क्षेत्रफळ १५२.६२ चौ.मी. (१६४३.०० चौ.फुट) असून सदर प्लॉटचा उत्तरेकडील भाग मा.तहसीलदार साहेब अमरावती यांनी सदर प्लॉटचे विभाजन प्रकरण क्र. रा.मा.क्र./एम.आर.सी.-८१/रहाटगांव-६२६/२०२५-२०२६ दि.१०.०३.२०२६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार १०-बी या प्लॉटचे दोन प्लॉटमध्ये विभाजन करण्यात आलेले आहे. सदर प्लॉटमधील विभाजन केल्यानंतर उत्तरेकडील भाग त्याची चतुःसिमा ही खालीलप्रमाणे--

| | | | |
|---|---|---|---|
| पुर्वेस | - प्लॉट नं.१०-ए-बी | पश्चिमेस | - रोड |
| उत्तरेस | - प्लॉट नं.९-ए | दक्षिणेस | - प्लॉट नं.८-बी-ए |

वरील प्रमाणे चतुःसिमेतील प्लॉटवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, ताबा, वारसा, बक्षीस, बोजा, सरकारी अथवा निमसरकारी कर्ज, किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास प्रस्तुत जाहीर सुचना प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व कागदपत्रासह प्रत्यक्ष भेटून लेखी आक्षेप नोंदवावा. वरील मुदतीत कोणताही आक्षेप किंवा हरकत प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार ठरल्याप्रमाणे खरेदीखत नोंदवून घेतील. नंतर कोणताही उजर चालणार नाही. करीता जाहीर सूचना देत आहे.

अमरावती
**दिनांक २४.०४.२०२६**

(प्रशांत विश्वनाथ पिवतकर)
रा.श्रीहरी नगर, अमरावती
ता.जि.अमरावती
मो.८५५२८८२२४६

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.७९०/२०२६
**सुनंदा -वि- निरंक**
पुढील ता.२०.०६.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार ः**
१. सुनंदा हरीशचंद्र जांभुळकर, वय ६२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. योगेश हरीशचंद्र जांभुळकर, वय ३५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
दोन्ही रा.जुने प्लॉट अंजनगांव बारी, ता.जि.अमरावती
३. छाया गजानन सैरीसे, वय ३७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.गजानन सैरीसे गोपगव्हाण, ता.भातकुली जि.अमरावती
४. माया प्रविण सैरीसे, वय ३४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.कुंड सर्जापूर, पो.हातुर्णा, ता.भातकुली, जि.अमरावती
५. बेबी अनिल धुर्वे, वय ३१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.डॉ.भांबोरे हाऊस जवळ, बजरंग टेकडी, राजापेठ, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत हरीशचंद्र पांडुरंग जांभुळकर** यांचे दिनांक **१९.११.२०२४** रोजी अंजनगांव बारी, ता.जि.**अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सुनंदा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनंदा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१८.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## नगर परिषद कार्यालय, मोर्शी, जि.अमरावती
## निविदा सुचना

या सर्वसाधारण सुचनेद्वारे आपणास सुचित करण्यात येते की, बांधकाम विभाग, नगर परिषद कार्यालय, मोर्शी अंतर्गत खालील कामाकरीता निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अनामत रक्कम | कोरे निविदा प्रपत्र किंमत | निविदा धारकांनी सादर करावयाचे दर |
|---|---|---|---|---|
| १. | मोर्शी नगर परिषद हद्दीमधील अतिक्रमण नियमाकुल करण्याकरीता पट्टे वाटप करण्याकरीता संस्था नियुक्त करणेबाबत | २००० | ५०० | दि.२७.०४.२०२६ ते दि.०५.०५.२०२६ |

१. निविदेच्या अटी व शर्ती तसेच निविदा प्रपत्र नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहतील.
२. निविदा प्रपत्र शुल्क भरणा नगर परिषद कार्यालयात रोखीने भरावे लागेल.
३. निविदा प्रपत्र द्विलिफाफा (तांत्रिक व वित्तीय) पध्दतीने सादर करावे.
४. प्रथम तांत्रिक लिफाफामध्ये संस्था रजिस्ट्रेशन, आधारकार्ड, जी.एस.टी., पॅनकार्ड, निविदेच्या अटी व शर्ती हे सर्व कागदपत्र सादर करावे.
५. द्वितीय वित्तीय लिफाफामध्ये निविदा दरपत्रक सादर करावे.
६. (शक्य झाल्यास) दिनांक ०६.०५.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता निविदा न.प.मोर्शी कार्यालय बांधकाम विभागामध्ये उघडण्यात येईल.

**(सौ.प्रतिक्षा गुल्हाने)** नगराध्यक्ष, नगर परिषद, मोर्शी
**(डॉ.प्रदीप कुऱ्हाडे)** उपाध्यक्ष नगर परिषद, मोर्शी
**(श्री.अमन गायकी)** बांधकाम सभापती नगर परिषद, मोर्शी
**(श्री.शिवदास मुसळे)** मुख्याधिकारी, नगर परिषद, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३११/२०२६ ने.ता.१७.०६.२०२६

**अर्जदार -**
१. लाव्यंश किरण उईके,
वय ०४ वर्षे, धंदा -
अ.पा.क.आई श्रीमती आशा किरण उईके
वय २९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.सायवाडा, पो.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराची आजी नामे **सुनंदा बापुराव उईके** ही दिनांक **१९.०८.२०१९** रोजी साईवाडा पो.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावलेले आहेत. अर्जदार हा मयतांचा एकमेव वारस आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २२.०४.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय**

आर.एम.जे.सी. क्र.८०/२०२६ ने.ता.१८.०६.२०२६

### जाहीरनामा

**अर्जदार ः**
१. राजाभाऊ रामभाऊजी ठाकरे, वय ५० वर्षे, धंदा - शेतमजुरी
रा.सावंगा बुद्रुक, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
२. प्रेमा हरीभाऊ ठाकरे, वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.सावंगा बुद्रुक, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
३. कुणाल हरीभाऊ ठाकरे, वय २५ वर्षे, धंदा - शिक्षण
रा.साईनाथ कॉलनी, चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
४. गुंजन हरीभाऊ ठाकरे, वय २२ वर्षे, धंदा - शिक्षण
रा.सावंगा बुद्रुक, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **राजाभाऊ रामभाऊजी ठाकरे व ईतर** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **रामभाऊ आनंदराव ठाकरे** यांचा मृत्यू दिनांक **२७.०५.१९९६** रोजी **कमलाबाई रामभाऊ ठाकरे** यांचा मृत्यू **दि.१२.०८.२०२०** रोजी मौजा सावंगा बुद्रुक, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक १० माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, चांदूर रेल्वे

**उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे न्यायालय**

रा.मा.क्र. एम.सी.ए.-०५/माहुली जहांगीर-०५/२०२५-२६

**अपिलार्थी - संत जगबा महाराज तर्फे ताबा वाहितदार श्रीमती बेबी भानुदास सुरटकर**

-- विरुध्द --

**गैरअपिलार्थी - रविश विश्वाससिंह सोळंके + १**

**गैरअपिलार्थी नं.**
१. नायब तहसीलदार, अमरावती
२. रविश विश्वाससिंह सोळंके, रा.प्लॉट नं.३१, नरेश टाऊनशिप, कठोरा रोड, अमरावती

अपिलार्थी संत जगबा महाराज तर्फे ताबा वाहिदार श्रीमती बेबी भानुदास सुरटकर, रा.माहुली जहांगीर, ता.जि.अमरावती यांचे वतीने ॲड.एस.एच.निर्मळ यांनी दाखल केलेल्या अपिल अर्जानुसार मौजा माहुली जहांगीर येथील स.नं.२११/१ क्षेत्र ३.३३ हे.आर बाबत नायब तहसीलदार अमरावती यांचे रा.मा.क. एम.सी.ए.५/माहुली जहांगीर-०७/२०२४-२५ आदेश पारित दि.०९.०९.२०२५ ला व्यथीत होऊन गैरअपिलार्थी नं.१ नायब तहसीलदार, अमरावती, २. रविश विश्वाससिंह सोळंके, रा.प्लॉट नं.३१, नरेश टाऊनशिप, कठोरा रोड, अमरावती, ता.जि.अमरावती यांचे विरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत अपिल अर्ज व कलम २५१ अंतर्गत अपिल दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याबाबतचा अर्ज दाखल केला आहे.

सदर प्रकरण दिनांक १२.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे न्यायालयात सुनावणीकरीता ठेवण्यात आले आहे. तरी या प्रकरणी आपण जबाबासह हजर रहावे.

अमरावती
दिनांक २४.०४.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**प्रस्तुतकार-१,**
**उपविभागीय अधिकारी,**
**अमरावती यांचे कार्यालय**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७९५/२०२६
**लता व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता.२०.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार ः**
1. Lata Devidas Kulkarni, Age 82 Yrs. Occu.: Nil
R/o Ekvira Residency Flat No.203, Near Petrol Pump, Rukhmini Nagar, Amravati
2. Sumitra Suhas Kulkarni, Age 59 Yrs. Occu.: Service
R/o Q 1002, Venkatesh Graffiti Survey No.31/2/1 Mundhwa-Manjari Road, Behind Orbis School, Keshav Nagar, Mundwa, Pune.
3. Megha Satish Vaidya, Age 57 Yrs. Occu.: Pvt. Service
R/o Flat No.A-103, Mruganayani Apartment, Vyakatesh Nagar, Khamla Road, Khamla, Nagpur.
4. Manisha Rajesh Joshi, Age 54 Yrs. Occu.: Household
R/o Appartment 3012, A T S Kocoon, Sector 109, Near Babupur Village, Dwarka Expressway, Babupur Gurgaon, Haryana

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत देविदास प्रल्हाद कुलकर्णी** हे दिनांक 08.09.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **लता व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **लता व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७२४/२०२६
**श्रीमती फिरोजाबी अधिक नऊ-वि- निरंक**
पुढील ता.११.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार ः**
1. Firozabi Abdul Nasir, Age 79 Yrs. Occu.: Household
R/o Near Madina Masjid, Tarkheda, Amravati.
2. Zulekabi Mohammad Sabdar, Age 78 Yrs. Occu.: Household
R/o Near Mohammadia Library, Lalkhadi, Amravati.
3. Shaikh Ahmad Shaikh Chhotu, Age 65 Yrs. Occu.: Labour
R/o Near Chakki, Moulana Zaad Colony, Amravati.
4. Mohammad Amin Chhotu Shaikh, Age 462 Yrs. Occu.: Labour
R/o Flat No.104, 1st Floor, SRA Composile Bridge No.1, Sagar City, VP Road, Near Gausia Masjid, Andheri West, VTC Mumbai, Po. Andheri West, VTC Mumbai, Po.Andheri Railway Station, Sub Dist.Andheri Dist.Mumbai
5. Shaikh Abid Shaikh Chotu, Age 59 Yrs. Occu.: Labour
6. Safiya Samrin Umeda Khan, Age 59 Yrs. Occu.: Household
7. Saher Anjum Mohammad Sabir, Age 43 Yrs. Occu.: Household
8. Daniya Fatema Mohammad Sabir, Age 22 Yrs. Occu.: Education
9. Mohammad Rayyan Mohammad Sabir, Age 19 Yrs. Occu.: Education
10. Khadiza Noor Mohammad Sabir, Age 12 Yrs. Occu.: Education
No.5 to 10 R/o Near Chakki, Moulana Azad Colony, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत शेख छोटू शेख करीम** हे दिनांक 25.02.1997 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **ताहेरा बी शेख छोटू** ही **०८.०५.१९९५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **फिरोजाबी अधिक नऊ** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **फिरोजाबी अधिक नऊ** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३१२/२०२६ ने.ता.१६.०६.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.भगवान तुळशीराम पाटील, वय ५४ वर्षे, धंदा - शेती
२. सतीश भगवान पाटील, वय ३३ वर्षे, धंदा - शेती
३. प्रकाश भगवान पाटील, वय ३१ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.शहा, ता.कारंजा लाड, जि.वाशिम
४. सौ.वर्षा रोशन गवई, वय २८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.दादापूर, पो.बडनेरा, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ ची पत्नी तर अर्जदार २ ते ४ ची आई नामे **सविता भगवान पाटील** ही दिनांक **१५.१०.२०२४** रोजी शहा, ता.कारंजा लाड, जि.वाशिम येथे मरण पावलेले आहेत. तिचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २२.०४.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३०९/२०२६ ने.ता.१६.०६.२०२६

**अर्जदार -**
१. नुरजहाँ बक्शोद्दीन, वय ६७ वर्षे, धंदा - घरकाम
२. नईमोद्दीन बक्शोद्दीन, वय ४७ वर्षे, धंदा - मजुरी
३. फईमोद्दीन बक्शोद्दीन, वय ४४ वर्षे, धंदा - मजुरी
४. शेख वसिम बक्शोद्दीन, वय ४१ वर्षे, धंदा - मजुरी
५. रियाजोद्दीन बक्शोद्दीन, वय ३० वर्षे, धंदा - मजुरी
सर्व रा.पोरगव्हाण, ता.मोर्शी, जि.अमरावती
ह.मु.रजा मस्जिदजवळ अंसार नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार न ं.२ ते ५ यांचे वडील **नामे बक्शोद्दीन शफोद्दीन** हे दि.**०८.०२.२०२१** रोजी अंसार नगर, अमरावती, ता. जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४७/२०२६ ने.ता.०४.०४.२०२६

**अर्जदार ः**
१. रावसाहेब अजाबराव राऊत, वय ६३ धंदा - शेती
रा.सायखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. धनराज अजाबराव राऊत, वय ५७ धंदा - शेती
रा.सायखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. सुवर्णसुंदरी रामेश्वरराव केचे, वय ६९ धंदा - घरकाम
रा.खंबीत, पो.बेलवाडी, ता.आष्टी, जि.वर्धा
४. सुनिता विनोदराव कोहळे, वय ५७ धंदा - घरकाम
रा.विवेकानंद कॉलनी, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. चित्रा गजानन भिसे, वय ५३ धंदा - घरकाम
रा.नांदगांव, पो.आलोडा, ता.वरुड, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत अजाबराव गोपाळराव राऊत** हे रा.सायखेड, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. त्यांचा मृत्यू दिनांक **०७.०८.२०१०** रोजी सायखेड, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच मयत **कमलाबाई अजाबराव राऊत** रा.सायखेड, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होती. तिचा दि.**२९.०५.२०१५** रोजी रा.सायखेड, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. त्यामुळे मयत अजाबराव गोपाळराव राऊत व मयत कमलाबाई अजाबराव राऊत यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५५१/२०२६
**रावसाहेब -विरुध्द- निरंक**
पुढील ता.१५.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार ः**
1. Raosaheb Ambadas Girnale
Age 80 Yrs. Occu.: Advocate
R/o Santosh Bhavan, Balaji Plots, Rajapeth, Ambadevi Road, Amravati, Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Anandrao Krushnaji Girnale हे दिनांक 10.01.1956 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Raosaheb Ambadas Girnale यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Raosaheb Ambadas Girnale वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०८.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# युवकांच्या सर्वांगीण विकासाचा उपक्रम 'करिअर कट्टा'

## कौशल्य संवर्धन, सामाजिक जाणीव व नवोन्मेषपूरक शैक्षणिक वातावरणाद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल - कुलगुरू

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात राबविण्यात येत असलेल्या 'करिअर कट्टा' या उपक्रमातील नाविन्यपूर्ण संकल्पनांच्या वृध्दीसंदर्भात जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने अमरावती विभागाची एक दिवसीय विभागीय कार्यशाळा उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या झाली. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, विभागीय उच्च शिक्षण संचालक कार्यालय तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या शुभहस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर,डॉ.धनंजय तळवणकर, अमरावती विभागीय प्राचार्य प्रवर्तक, विभागीय समन्वयक डॉ. दिनेश खेडकर,



डॉ. रंजना जीवने उपस्थित होते कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवीपुरते शिक्षण मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांनी कौशल्य विकास, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि नवोपक्रम यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.डॉ. राजीव बोरकर म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून व्यक्तिमत्त्व विकास, संवाद कौशल्ये आणि नेतृत्वगुण यांची जोपासना अत्यावश्यक असून विद्यार्थी विकास विभाग आणि करिअर कट्टा यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचे यशस्वी करिअर घडविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात यशवंत शितोळे यांनी करिअर कट्टा या संकल्पनेचा प्रवास, स्थापना तसेच मागील पाच वर्षांचा कार्यप्रवास आणि यशाचा चढता आलेख मांडत उपस्थित मान्यवर, प्राचार्य व समन्वयकांना उपक्रमाच्या यशोगाथा सांगितल्या. दर्जेदार शिक्षणासोबत संशोधन, नवोपक्रम, उद्योजकता, स्टार्टअप तसेच अधिकारी होण्याची विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी हा उपक्रम राज्यभर प्रभावी ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

मार्गदर्शन सत्रात डॉ. दिनेश खेडकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, नॅक आणि एनआयआरएफ निकषांच्या पूर्ततेसाठी 'करिअर कट्टा' उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. उमेश कनेरकर यांनी 'एआय आणि एमओयू' या विषयावर आधुनिक दृष्टिकोन मांडला. डॉ. धनंजय तळवणकर यांनी विविध अभ्यासक्रम, शिष्यवृत्ती आणि करिअर संसद याबाबत माहिती दिली, तर प्रा. ममता पळसपगार यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या विविध क्लब्सची भूमिका स्पष्ट केली. याच सत्रात यशवंत शितोळे यांनी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' व 'कॉलेज विथ पोटेन्शियल ऑफ एक्सलन्स' या योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. समारोप सत्रात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले, 'करिअर कट्टा' हा उपक्रम विद्यार्थ्यांचे करिअर घडविण्यासाठी दिशादर्शक ठरत असल्याचे सांगत महाविद्यालये व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. या उपक्रमांतर्गत राबविण्यात येणा-या विविध कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून भविष्यातील संधींचा योग्य उपयोग करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला वंदन करून, वृक्षाला जल अर्पण करून तसेच महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने करण्यात आली. संचालन अमरावती जिल्हा समन्वयक डॉ. रेखा मगिरवार यांनी, तर आभार विभागीय सहसमन्वयक डॉ. रंजना जीवने यांनी मानले.याप्रसंगी जिल्हा नियोजन समितीचे पदाधिकारी देखील उपस्थित होते. १२५ हून अधिक महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच करिअर कट्टा समन्वयक यांच्या उपस्थितीमुळे कार्यशाळेच्या यशस्वितेत भर पडली. कार्यशाळेदरम्यान उपस्थितांच्या विविध प्रश्नांचे समाधान तज्ज्ञ मार्गदर्शनातून करण्यात आले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाकरिता अमरावती विभागातील सर्व घटकांनी परिश्रम घेतले.

## रेल्वेमार्ग दुरुस्तीसाठी २१ दिवस राहणार बंद

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

मालखेड मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळांतर्गत वर्धा–बडनेरा रेल्वे मार्गावरील मालखेड़ स्टेशनजवळील LHS क्रमांक ६९ येथे रस्त्याची दुरुस्ती (Road Repairing) व पेव्हर ब्लॉक बसविण्याचे महत्त्वाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामामुळे संबंधित मार्ग २४ एप्रिल २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत पूर्णपणे वाहतुकीसाठी बंद राहणार आहे.




रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, हे काम सुरक्षित व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी मार्ग बंद ठेवणे आवश्यक आहे. कामाच्या कालावधीत नागरिक व वाहनांची ये-जा या मार्गाने होणार नसल्यामुळे परिसरातील नागरिकांना काही प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो.दरम्यान, ग्रामपंचायत व स्थानिक प्रशासनाला नागरिकांना याबाबत पूर्वसूचना देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आवश्यक त्या ठिकाणी सूचना फलक (Notice Board) लावून पर्यायी मार्गांची माहिती देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. नागरिकांनी कोणतीही अडचण टाळण्यासाठी पर्यायी मार्गांचा वापर करावा, तसेच प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कामादरम्यान अपघात टाळण्यासाठी सर्वांनी सतर्क राहावे, असेही रेल्वे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा) तर्फे

## जमिनीची सुपीकता वाढ व शाश्वत शेतीसाठी जनजागृती मोहीम

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्ह्यातील शेती अधिक उत्पादनक्षम, किफायतशीर आणि पर्यावरणपूरक व्हावी या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा) जि. अमरावती तर्फे रासायनिक खतांचा योग्य व शास्त्रीय वापर तसेच जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे. ही मोहीम सध्या वेगाने विस्तारत असून कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यक्षेत्रातील विविध तालुक्यांमधील २५ पेक्षा अधिक गावांमध्ये यशस्वीपणे राबविण्यात येत आहे.सद्यस्थितीत अनेक शेतकरी DAP व युरिया खतांचा अति व असंतुलित वापर करत असल्याचे निदर्शनास आले आहे.



या असंतुलित वापरामुळे जमिनीतील अन्नद्रव्यांचे संतुलन बिघडत असून मातीची भौतिक, रासायनिक व जैविक गुणवत्ता घटत आहे. परिणामी पिकांची वाढ मर्यादित राहते, उत्पादन खर्च वाढतो आणि दीर्घकालीन उत्पादनक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. यावर प्रभावी उपाय म्हणून शास्त्राधारित व संतुलित खत व्यवस्थापनाची गरज अधोरेखित करण्यात येत आहे.या पार्श्वभूमीवर कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूर चे प्रमुख डॉ. के पी सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली ही व्यापक जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली असून या मोहिमेदरम्यान गावागावांत शेतकरी मेळावे, प्रात्यक्षिके, शेतशाळा व गटचर्चांचे आयोजन करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना जैविकखते (Biofertilizers) वापराचे फायदे, जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांची भूमिका आणि पिकांच्या वाढीसाठी त्यांचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली जात आहे. तसेच माती परीक्षणाचे महत्त्व अधोरेखित करून 'माती तपासणी केल्याशिवाय खतांचा वापर करू नये' हा संदेश प्रभावीपणे दिला जात आहे. या उपक्रमामुळे रासायनिक खतांवरील अनावश्यक अवलंबित्व कमी होऊन शेती अधिक शाश्वत, नफ्याची आणि पर्यावरणास पूरक होईल, असा विश्वास डॉ. के पी सिंह यांनी व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांकडून या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेक शेतकरी माती परीक्षण, जैविक खते वापर व संतुलित खत व्यवस्थापन अंगीकारण्यास पुढे येत आहेत. कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर तर्फे ही मोहीम पुढील काळात नांदगाव खंडे., अमरावती, भातकुली तालुक्यांतील अधिकाधिक गावांमध्ये राबविण्यात येणार असून 'माती वाचवा – शेती वाचवा' हा संदेश प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला असल्याचेही कृषी तज्ज्ञांनी सांगितले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रताप जायले, डॉ अर्चना काकडे,पी.एच. महल्ले, महेश आखुड, राहुल घोगरे, संतोष देशमुख, आकाश धरमकर, सुरेश वैद्य, आरती वर्मा, कैलाश शेखावत, संजय घरडे, प्रणाली देशमुख, स्नेहल कांबळे, डॉ. विशाखा पोहरे, अश्विनी रंगे, ऋषिकेश शिंदे, महेंद्र सेंगर, राहुल जगताप, उमेश तायडे, निशा राठोड, विशाल राऊत, विशाखा राणोटकर, श्याम भुरके, ऋषीराज शेखावत, आशीष रंगारी, सिद्धार्थ गडलिंग हे विशेष परिश्रम घेत आहे.

## आठवडी बाजारात अस्वच्छतेचे साम्राज्य



**अंजनगाव बारी -** स्थानिक आठवडी बाजार परिसरात सध्या अस्वच्छतेचे गंभीर चित्र पाहायला मिळत आहे. बाजारात सर्वत्र प्लास्टिक, कागद व इतर कचऱ्याचे ढीग साचलेले असून स्वच्छतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. बाजारात भटक्या जनावरांचा मुक्त वावर असल्यामुळे कचऱ्याची अधिकच नासधूस होत आहे. यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक प्रशासन तसेच बाजार व्यवस्थापन करणाऱ्यांकडून नियमित स्वच्छता न केल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. बाजारात येणाऱ्या विक्रेते व ग्राहकांनाही या अस्वच्छतेचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

## विद्यापीठातील प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये १५ विद्यार्थ्यांची निवड

### विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे हेच विद्यापीठाचे प्रथम ध्येय - डॉ. अजय लाड

**अमरावती/का.प्र.**

विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे हेच विद्यापीठाचे प्रथम ध्येय आहे, असे प्रतिपादन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभाग आणि एसएए टेक्नॉलॉजी (सावरियासेठ ऑटो ॲन्ड ॲग्रो टेक्नॉलॉजी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्लेसमेंट ड्राईव्ह कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील,



यजुस बायोटेक प्रा. लि. पुणे चे सुधीर लढ्ढा, सावरियासेठ ऑटो ॲन्ड ॲग्रो टेक्नॉलॉजी अकोलाच्या व्यवस्थापकीय संचालक रिध्दी लढ्ढा उपस्थित होते.

डॉ. लाड पुढे म्हणाले, तळागाळातील तरुण जेव्हा चांगल्या प्रकारे शिकतील, तेव्हाच एक चांगली कंपनी तयार होऊ शकते आणि त्यासाठी विद्यापीठाच्यावतीने वेळोवेळी आयोजित होणा-या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.रिध्दी लढ्ढा म्हणाल्या म्हणाल्या, अमरावती शहरातील विद्यार्थ्यांमध्ये अफाट टॅलेंट असून या तरुणाईसोबत काम करण्यासाठी मी अतिशय उत्सुक आहे.प्लँट टिश्यू कल्चर लॅब संबंधित या प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभाग, वनस्पतीशास्त्र विभाग, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग तसेच विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्यक्ष मुलाखतीनंतर १५ विद्यार्थी शॉर्टलिस्ट झाले आहे. पुढच्या राऊंडनंतर त्यांची अंतिम निवड होणार आहे. प्रास्ताविक डॉ. अनिता पाटील, संचालन डॉ. प्रशांत ठाकरे, तर आभार डॉ. सुदर्शन कोवे यांनी मानले.

# वाहनासह साहित्य लंपास करणारे आरोपी मध्यप्रदेशातून अटक

### सुमारे ३.८९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**अमरावती/का.प्र.**

विश्वासघाताने चोरून नेलेली मालमत्ता हस्तगत करत नांदगाव पेठ पोलिसांनी आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पाच आरोपींना मध्यप्रदेशातून अटक करण्यात आली असून, सुमारे ३ लाख ८९ हजार ७०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.कंपनीमध्ये लावलेले वाहन आणि त्यामध्ये असलेले साहित्य आरोपींनी लंपास केले होते. मात्र पोलिसांनी तपास करून या प्रकरणातील पाचही आरोपींना अटक केली.

फिर्यादी मारुती अंबादास इंगोले (रा. निंभी, ता. मोर्शी, जि. अमरावती) यांनी



३० मार्च २०२६ रोजी नांदगावपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांनी आपले मारुती कॅरी वाहन (क्र. MH 27 BH 3964) हे मुंबई येथील हायड्रोमेक सिस्टम प्रा. लि. कंपनीकडे भाडे करारावर दिले होते. कंपनीतील मजूर या वाहनाद्वारे नांदगावपेठ ते माहूली जहांगीर दरम्यान साहित्याची वाहतूक करीत होते.मात्र, ३० मार्च रोजी फिर्यादी साईटवर गेले असता त्यांचे वाहन व त्यातील साहित्य आढळून आले नाही. संबंधित मजुरांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचे मोबाईल बंद असल्याचे दिसून आले. त्यामुळे एकूण ३ लाख ८९ हजार ७०५ रुपयांचा मुद्देमाल विश्वासघाताने चोरून नेल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलमान्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला.

तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक पद्धतीने आरोपींचा माग काढला असता त्यांचे लोकेशन मध्यप्रदेशातील गंधावल (जि. बडवाणी) येथे आढळून आले. त्यानुसार नांदगावपेठ पोलीसांचे पथक तात्काळ रवाना करण्यात आले. पोलिसांनी आरोपींना गंधावल येथून ताब्यात घेतले तसेच चोरीस गेलेली मालमत्ता बंजारी (ता. मनावर, जि. धार, मध्यप्रदेश) येथून हस्तगत करण्यात आली.जप्त मुद्देमालामध्ये मारुती कॅरी वाहन, पाच वेल्डिंग मशीन, सुमारे ४०० मीटर केबल, वेल्डिंग साहित्य, लिफ्टिंग बेल्ट व डिझेलचा समावेश असून एकूण किंमत ३ लाख ८९ हजार ७०५ रुपये आहे.यामध्ये आरोपी अमरनाथकुमार राजवली साहणी (वय २६), प्रमोदकुमार राजवली साहणी (वय ३०), ओमकुमार राजवली साहणी (वय २८), नौशाद अली मोहम्मद ईसा (वय २५) आणि मनोजकुमार संभु मांजी (वय २०) सर्व रा. साहेबगंज, जि. मुझफ्फरनगर, राज्य बिहार यांना अटक केली.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे आणि सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे व सपोनी रितेश राऊत यांचे नेतृत्वात गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि गणेश राऊत, पोहेकॉ राजाभाऊ राऊत, पोकॉ. निलेश साविकार, शोएबुद्दिन सय्यद, वैभव तिखीले, अमित ढोले, गोकुळ दारोकार यांनी पार पाडली.

## संक्षिप्त

### विद्यार्थिनींची चमकदार कामगिरी



**अंजनगाव बारी -** जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथे गायत्री परिवाराअंतर्गत भारतीय संस्कृती ज्ञान परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत इयत्ता ५ ते ८ मधील ३९ तर इयत्ता ९ ते १२ मधील १९ विद्यार्थी सहभागी झाले होते.तालुकास्तरीय निकालात शाळेतील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश मिळवले.तालुकास्तरीय निकालात जनता विद्यालयातील विद्यार्थिनींनी विशेष यश मिळवले आहे. वर्ग ८ 'अ' मधील जानवी विलास दारोकार हिने 'द्वितीय क्रमांक' पटकावला तर वर्ग ७ 'ब' मधील इशिका नरेंद्र तलवारे हिने 'तृतीय क्रमांक' मिळवून शाळेचा मान उंचावला.या यशाबद्दल मुख्याध्यापक विनोद मुगल यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. पर्यवेक्षक गजेंद्र अवघड यांनी सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेमंतजी देव, उपाध्यक्ष आनंदराव इंगोले व राजेश टारपे यांनीही विद्यार्थिनींच्या यशाचे कौतुक करून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थिनींचे अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

### प्लास्टिक चा सर्रास वापर शासनाचे दुर्लक्ष!

**शिराळा -** शिराळा परिसरात प्लास्टिक सर्रास वापर सुरू आहे. शासनाची बंदी असताना कॅरी बॅग वापरणे सुरू आहे. पर्यावरण ला घातक असतांना शासनाच्या दुर्लक्षामुळे वापर सुरू आहे.शासनाची कारवाई करित नाही त्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडत आहे. गायी, म्हशी बक- या प्लास्टिक कचरा खात असल्यामुळे जनावरे दगावत आहे. शासनाने यावर आजपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही. अमरावती तालुक्यातील देवरा देवरी अंतोरा ब्राह्मणवाडा भगत अंजनगाव बारी, शिराळा वलगाव पुसदा, यावली शहिद, डवरगाव माहुली जहाँ यासर्व गांवात प्लास्टीक पन्नी चा वापर सुरू आहे. किराणा दुकाना पासून भाजी पाला मटन मार्केट, कपड्याच्या दुकानात सुध्दा वापर सुरू आहे प्लास्टिक पन्नी कॅरी बॅग बंद करण्याची मागणी शिराळा येथील राजेश भोवाळु व सहकारी यांनी केली आहे.

### चमक येथे उभारले ग्राम प्रवेशद्वार



**अचलपूर -** तालुक्यातील चमक येथील ग्राम प्रवेशद्वाराचे उद्घाटन माजी आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच प्रमोद भोसले, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक नितीन आगे,उपसरपंच देवेंद्र तट्टे प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी मान्यवरांचे शाल,श्रीफ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.याप्रसंगी डॉ. संजय तट्टे, अरविंद तट्टे, नरेंद्र तट्टे, राहुल तट्टे, विजय तट्टे, संजय चरोडे,तुषार शहाणे यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी मंडळी उपस्थित होती.

### वडाळी परिसरातील नागरिक धडकले जिल्हाकचेरीवर

**अमरावती/का.प्र.**

वडाळी प्रभाग क्र. ९ मधील देवीनगर, महादेव खोरी, प्रबुद्ध नगर आदी वस्त्यांतील नागरिकांना पी.आर. (प्रॉपर्टी) कार्ड देण्यात यावे, या मागणीसाठी परिसरातील शेकडो ग्रामस्थ नगरसेविका पंचफुला चव्हाण यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकचेरीवर धडकले.

महानगरपालिका क्षेत्रातील सन १९९५ ते २०११ दरम्यान घोषित झोपडपट्टूयांना पी. आर. कार्ड देण्याचे शासनाचे निर्देश आहेत. यासंदर्भात पाच वर्षांपूर्वी महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षणही करण्यात आले होते. मात्र अद्याप अनेक नागरिकांना पी. आर. कार्ड मिळालेले नाही. वडाळी परिसरातील प्रबुद्ध नगर, देवीनगर, महादेव खोरी, भारत नगर तसेच पाणी टाकी परिसरात मोठ्या प्रमाणावर श्रमिक वर्ग वास्तव्यास असून, अनेक घरे टिनपत्रे, कौलारू व कच्च्या स्वरूपातील आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नागरिकांनी पूर्वी अर्ज केले होते, मात्र ती प्रक्रिया पूर्ण झाली नाही. आता प्रधानमंत्री आवास योजना २.० सुरू झाल्याने नव्याने अर्ज करण्यासाठी पी. आर.कार्ड अनिवार्य असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या वस्त्यांतील नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ मिळण्यासाठी तातडीने पी.आर. कार्ड वितरित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित वस्त्यांसाठी आवश्यक नाहरकत प्रमाणपत्रेही महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्याचे सांगण्यात आले आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी भुमिअभिलेख विभागाला आवश्यक निर्देश देऊन २०११ पासून वास्तव्यास असलेल्या सर्व कुटुंबांना पी. आर. कार्ड देण्यात यावे, अशी मागणी यावेळी पंचफुला चव्हान यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनातून केली आहे.आंदोलनात संजय चव्हान, अमोल गोफणे, अनिल वनवे, सै. सब्बीर सै. इस्माईल मदारी, भैय्या तिरपूडे, लिला अलोने, शोभा पाचपोर, मिरा बाभुळकर, बेबी सहारे, तनुजा सलिम, भाग्यश्री पारधी, सरिता पारधी, दिपाली भोस आदींसह शेकडो महिला पुरूषांचा सहभाग होता.

# अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समितीचे १७ संचालक मंडळ अपात्र

## -भाजप सहकार आघाडीला धक्का

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यात भाजप प्रणीत एकमेव असलेल्या अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाला अपात्र ठरवण्यात आले आहे. या कारवाईमुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली असून,तालुक्यातील भाजपाच्या सहकारातील सत्तेला खिळ बसला आहे.

जिल्हा उप निबंधक कार्यालयात दाखल अपील क्र.०७ व ०८/२०२५ चा निकाल दि.२४ एप्रिल रोजी जाहीर झाला. त्यानुसार बाजार समितीच्या १७ संचालकांना अपात्र ठरवण्यात आले. नियमबाह्य खर्च, महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या कलम ११, १२(१), १३, २९, ३७(२)(५) चा भंग, अर्थसंकल्प विहित मुदतीत मंजूर



न करणे आणि उपविधीचे उल्लंघन या कारणांमुळे जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांचे आदेशान्वये अपात्रतेची कारवाई करण्यात आली. पणन संचालक यांचे कलम ४०(ई) चे निर्देश व बाजार समितीची उपविधी (पान २ वर)

विरोधकांचे राजकीय दबावाला बळी पडुन घेतलेला निर्णय दिसुन येतो, शेतकऱ्यांच्या ऊन्नती विकासाकरीता कटीबद्ध असलेल्या आमचे संचालक मंडळाने करोडो रुपयाचे कामे पुर्णत्वाचे मार्गावर लावली असुन विकासाचे कामात अडथडा आणन्यास टाकलेल्या विरोधकांचे षडयंत्राचा बळी म्हणुन सदर आदेशास म्हणता येईल. विभागीय सह निबंधक कार्यालयात आदेशाला आव्हानित करण्यात येऊन वरीष्ठ न्यायाधीकरण आम्हाला न्याय देईल याची खात्री आहे.

**-जयंत साबळे,** मा.सभापती कृ.ऊ.बा.स.अंजनगाव

# बँकेतच ज्येष्ठ नागरिकाची ५० हजार लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूर बाजार तालुक्यातील सुरळी येथील ज्येष्ठ नागरिकाची बँकेतच चलाखीने ५० हजार रुपयांची चोरी केल्याची धक्कादायक घटना गुरुवार, २३ एप्रिल रोजी दुपारी घडली. या प्रकरणी चांदूर बाजार पोलिस ठाण्यात अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरळी येथील रहिवासी अशोक देशमुख (वय ७२) हे गुरुवारी दुपारी घरून ८० हजार रुपये घेऊन बँकेत पैसे भरण्यासाठी गेले होते. त्यापैकी ३० हजार रुपये त्यांनी एका बँकेत जमा केले. उर्वरित ५० हजार रुपये दुसऱ्या बँकेत भरण्यासाठी त्यांनी बॅगमध्ये ठेवले होते. (पान २ वर)

# मालवाहू वाहनाच्या धडकेत आई-वडीलांसह बालक ठार

## -मंगरूळपीर मार्गावर भीषण अपघात

### -अक्षता टाकण्यापूर्वी काळाने केला घात



**अकोला/प्रतिनिधीः-** नातेवाईकांकडील लग्नामध्ये आनंदाने सहभागी होऊन वधू-वराच्या डोक्यावर अक्षता टाकण्यासाठी निघालेल्या कुटुंबावर मार्गातच काळाने घाला घातला. २४ एप्रिल रोजी नियोजित लग्नासाठी गुरुवारी सायंकाळी दुचाकीने निघालेल्या कुटुंबाला मालवाहू मोटारीने जोरदार धडक दिल्याची घटना वाशीम जिल्ह्यातील वाशीम-मंगरुळपीर मार्गावर पार्डी टाकमोर फाट्याजवळ घडली. या भीषण अपघातात आई-वडिलांसह मुलाचाही करुण अंत झाला. या दुर्घटनेमुळे आनंदावर विरजण पडले असून परिसरात शोककळा पसरली आहे. माहिती नुसार आंब्यांनी भरलेल्या मालवाहू मोटारीने दुचाकीला धडक दिल्याने वारा जहागीर येथील रहिवासी संतोष बबन लांभाडे (वय ४२), त्यांच्या पत्नी कलवती संतोष लांभाडे (वय ३५) आणि मुलगा ईश्वर संतोष लांभाडे (वय १२) हे तिघे आपल्या नातेवाईकाच्या लग्नासाठी तांदळी शेवई येथे जात होते. २४ एप्रिलला सकाळी हे लग्न होणार होते. लग्नासाठी घरातून निघालेल्या या कुटुंबाचा प्रवास अर्ध्यावरच संपला. पार्डी टकमोर फाट्याजवळ त्यांच्या दुचाकीला आंब्यांने भरलेल्या भरधाव मालवाहू वाहनाने समोरून जोरदार धडक दिली.

मालवाहू मोटारीची दुचाकीला अत्यंत वेगात धडक बसली. दुचाकीवरील लांभाडे दाम्पत्य आणि त्यांचा १२ वर्षांचा मुलगा ईश्वर हे तिघेही (पान २ वर)

# मेळघाटमध्ये अवैध वाळू तस्करांवर सर्जिकल स्ट्राइक

## -फिल्मी स्टाईल कारवाईमुळे उडाली खळबळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील मेळघाट परिसरातील अवैध वाळू उत्खननाविरुद्ध प्रशासनाने गुरुवारी रात्री धडाकेबाज कारवाई केली. यामुळे वाळू माफीयांना मोठा धक्का बसला आहे. उपविभागीय अधिकारी शुक्ला यांनी स्वतः पुढाकार घेत फिल्मी स्टाईल कारवाई केली. माहिती नुसार उपविभागीय अधिकारी शुक्ला गुरुवारी रात्री अंधारात दुचाकीवरून परिसराची पाहणी करत होते. त्यावेळी त्यांना गुप्त माहिती मिळाली की सोनाबर्डी वाळू घाटावर वाहतूक सुरू आहे. यामुळे ते थेट घटनास्थळी



पोहोचले. अधिकाऱ्यांच्या येण्याची चाहूल लागतात एक ट्रक वाळू घेऊन तिथून पळ काढण्यात यशस्वी झाला, मात्र एक ट्रॅक्टर प्रशासनाने जप्त केला. ट्रॅक्टर चालकाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर पथक सोनाबर्डी घाटावर पोहचले. तिथे तापी नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याचे उघड झाले. (पान २ वर)

# अकोला, अमरावतीत सूर्याची वक्रदृष्टी

## -तापमान ४४ ते ४५ डिग्रीवर

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्रात उष्णतेची तीव्रता कायम असून विदर्भातील तापमानाने पुन्हा एकदा पंचेचाळीशी गाठली. विदर्भातील अकोला येथे शुक्रवारी ४५ अंश सेल्सिअसची नोंद करण्यात आली. तर अमरावतीमध्ये तापमान ४४.८ डिग्री सेल्सिअस वर पोहोचले आहे.



विदर्भात हिटवेव्हमुळे पूर्वीच हाय अलर्ट घोषित करण्यात आला आहे. पुन्हा एकदा सुर्याची वक्रदृष्टी झाली आहे. आठवड्याच्या सुरुवातीला कमी झालेले तापमान आठवड्याच्या मध्यान्हा नंतर चांगलेच वाढले आहे. शहर आणि जिल्ह्यात वाढत्या तापमानाचे चटके अधिक जाणवत आहेत. अकोला शहरातील तापमान पुन्हा एकदा ४५ अंश सेल्सिअसवर पोहोचले आहे.

तर पाठोपाठ अमरावती शहरातही ४४.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद आहे. वाढत्या तापमानाच्या बाबतीत वर्धा हे शहर ४४.४ अंश सेल्सिअस तापमानासह (पान २ वर)

# मॉडल रेल्वे स्टेशनवर दहशतवाद विरोधी मॉकड्रिल



**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र दिन १ मे आणि व्हीव्हीआयपी सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर शहर पोलीसांनी आज शुक्रवार २४ एप्रिल रोजी सकाळी ११.१५ ते दुपारी १२.१५ वाजता दरम्यान पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या निर्देशाने मॉडल रेल्वे स्टेशनवर दहशतवाद विरोधी मॉकड्रिल घेण्यात आली. या दरम्यान मॉडल रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर उभ्या अमरावती जबलपूर एक्सप्रेसच्या कोच नंबर ७ मध्ये घुसलेल्या दोन दहशतवाद्यांनी प्रवाशांना बंधक बनविले होते. आरसीपी कमांडर अजय जाधव यांच्या नेतृत्वात त्वरित कार्यवाही करून पथकाने एका दहशतवाद्याला अटक केली आणि एकाला ठार मारले. २ प्रवाशांना सुखरूप वाचविण्यात आले. मॉक ड्रिल मध्ये रॅपिड रिस्पॉन्स टीम, डॉग स्कॉड, बीडीडीएस टीम, कोतवाली पोलीस स्टेशन, रेल्वे प्रशासन आरपीएफ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त श्याम घुगे, गणेश शिंदे, रमेश धुमाळ सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजीराव (पान २ वर)

# मालविय चौकातील दुचाकी दुकानात भीषण आग

## ३.५० लाखांचे नुकसान

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक मालविय चौकातींल टू व्हीलर डीलर दुकानात आज शुक्रवारी २४ एप्रिल रोजी दुपारी अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. या आगीत ३ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. अग्निशमन विभागाच्या पथकाने वेळीच घटना स्थळावर पोहोचून आग आटोक्यात आणली. यामुळे मोठा अनर्थ (पान २ वर)



# अलीम नगरात तरुणावर प्राणघातक हल्ला, प्रकृती गंभीर

## -एक अल्पवयीन ताब्यात ,दोघे फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या अलीम नगर परिसरात वटारून पाहिल्यामुळे झालेल्या वादात एका तरुणावर ३ अल्पवयीन मुलांनी चाकूने प्राणघातक हल्ला केल्याची घटना गुरुवारी रात्री समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी एका अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले आहे तर दोन फरार आहे. शहजाद खान गौस खान (वय २८) असे हल्ल्यात गंभीर जखमी तरुणाचे नाव आहे. माहिती नुसार शहजाद खान गौस खान गुरुवारी दुपारी टॅक्स भरण्यासाठी घरून निघाला होता. अलीम नगर येथील अकरम पान ठेल्याजवळ तो उभा होता. त्यावेळी लालखडी आणि पठाण चौक परिसरात राहणारे ३ अल्पवयीन मुले शहजाद खान जवळ आले. त्यांनी वटारून का पाहिले यावरून त्यांच्याशी वाद घातला. हा वाद एवढा वाढला की, आरोपींनी आपल्या जवळील चाकू काढून शहजाद खान यांच्या पोटात (पान २ वर)



# भाजयुमोची पंचवटी चौकात काँग्रेस विरोधात निदर्शने

**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्र सरकारच्यावतीने पारित करण्यात आलेल्या नारीशक्ती वंदन कायद्यावरून राजकीय घमासान पाहायला मिळत आहे. भारतीय जनता युवा मोर्चा ने काँग्रेसच्या विरोधात मोर्चा उघडला आहे. काँग्रेस मुळे हे कायदे अस्तित्वात आले नाही. यामुळे भाजयुमो ने आज शुक्रवार २४ एप्रिल रोजी पंचवटी चौकात काँग्रेसच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी गेली. नारीशक्ती कायद्यामुळे महिला सशक्तिकरण आणि महिलांना अधिकार मिळाले असते. काँग्रेस आणि विरोधी पक्षाने या कायद्याचा विरोध केला. त्यामुळे हा कायदा अस्तित्वात आला नाही. यामुळे काँग्रेसचा निषेध करण्यात आला. भाजयूमोच्या वतींने पंचवटी चौकात काँग्रेस विरोधात जोरदार निर्दशने दिली. यावेळी विक्की शर्मा, सचिन इंगळे, तुषार खेरडे, आकाश पाटील, संकेत शेवणे, साहिल शर्मा, अक्षय भोंगल, अमित कुलवंत, हर्ष शर्मा, योगेश श्रीवास्तव, अश्विन राऊत, अनिकेत तारवानी, आदित्य खैरकर, योगेश श्रीवास्तव, राजेंद्र बागानी, तुषार धनजोडे, श्रेयस देशमुख, संजय काळे संजय आठवले, अनिकेत ठाकरे, (पान २ वर)



# जनगणनेच्या कार्यात नागरिकांना प्रत्यक्ष सहभागाची संधी

## -देशातील पहिल्या 'डिजिटल जनगणने'साठी अमरावती जिल्हा सज्ज

### 'स्व-गणना' सुविधेचा लाभ घेण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारताची लोकसंख्या गणना २०२७ मध्ये घेण्याचा निर्णय जाहीर झाला असून यावेळची जनगणना ही स्वतंत्र भारताची आठवी आणि २१ व्या शतकातील तिसरी जनगणना असणार आहे. विशेष म्हणजे ही भारताची पहिली 'डिजिटल जनगणना' असेल. या ऐतिहासिक प्रक्रियेत नागरिकांना प्रत्यक्ष सहभाग नोंदवता यावा यासाठी 'स्व-गणना' (Self-Enumeration) ही सुविधा पहिल्यांदाच उपलब्ध करून देण्यात आली



असून, अमरावती जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी पत्रकार परिषदेत केले.

ही जनगणना दोन स्वतंत्र टप्प्यात पार पडणार असून पहिल्या टप्प्यात घरयादी व घरगणना, तर दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष लोकसंख्या गणना (पान २ वर)

# नवविवाहित दाम्पत्याचा अपघात,पतीचा मृत्यू


**बेलोरा/प्रतिनिधीः-** नव्या संसाराची स्वप्ने डोळ्यात साठवून बोराळा येथे माहेरी आलेल्या एका नवदाम्पत्यावर काळाने घाला घातला आहे. मोटरसायकल डिव्हायडरला धडकून झालेल्या भीषण अपघातात पतीचा जागीच मृत्यू झाला, तर पत्नी गंभीर जखमी झाली आहे. लग्नाला केवळ दोन महिने झाले असतानाच घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

अमरावती येथील चपराशीपुरा भागातील रहिवासी मृतक नितीन जानरावजी सोळंके यांचे लग्न २५ फेब्रुवारी रोजी बोराळा येथील सुनील पांडुरंग चव्हाण यांच्या कन्या शुभांगी हिच्याशी झाले होते. सध्या हे दाम्पत्य बोराळा येथे आपल्या सासुरवाडीला आले होते. शुक्रवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास नितीन आणि शुभांगी हे दोघे मोटरसायकलने चांदूरबाजार येथे लस्सी पिण्यासाठी गेले होते.

चांदूरबाजारहून परत बोराळ्याकडे येत असताना, दुपारी तीन वाजेच्या सुमारास गावाजवळच असलेल्या डिव्हायडरला त्यांच्या मोटरसायकलची जोरदार धडक बसली. हा अपघात इतका भीषण होता की, नितीन सोळंके यांचा जागीच मृत्यू झाला. तर पत्नी शुभांगी ही गंभीर (पान २ वर)

# युवकाने घेतला गळफास

**मोर्शी/प्रतिनिधीः-** हमाली काम करून आपले व आपल्या कुटुंबीयांचे पालन पोषण करणाऱ्या एका चाळीस वर्षीय युवकाने आपल्या स्वतःच्या घरी मयालीला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना आज दि.२४ एप्रिल रोजी दुपारी १:३० वाजताचे सुमारास शिरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या नेरपिंगळाई येथे घडली.



मृतक इसमाचे नाव राजेश रमेशराव वाघमारे (वय ४० वर्ष रा. नेरपिंगळाई ता.मोर्शी) असे आहे. (पान २ वर)

